अध्याय तेरावा.

श्रीगणेशाय नमः ॥ ॐ नमो जी अनादि हंसा । हंसरूपा जी जगदीशा । तूं सद्गुरु परम हंसा । परमपरेशा परिपूर्णा ॥ १ ॥ उभयपक्षेंवीण देख । तुझे शोभती दोनी पांख । शुद्ध सत्वाहोनि चोख । स्वरूप सुरेख सोज्ज्वळ ॥ २ ॥ हंस बोलिजे शुभ्रवर्ण । तुझी हंसता विलक्षण । सांडोनियां सकळ वर्ण । हंसपण तुज शोभे ॥ ३ ॥ विकासल्या सुवर्णपंकजें । इतर हंसीं तेथें क्रीडिजे । प्रेमें उत्फुल्लित कमळ जें । तुवां क्रीडिजे ते ठायीं ॥ ४ ॥ मानससरोवरीं वस्ती हंसासी । तूं मानसातीत रहिवासी । हंसा उत्पतन आकाशीं । तुझें चिदाकाशीं उड्डाण ॥ ५ ॥ विवेकचंचूचिया मुद्रा । स्वभावें निवडिसी क्षीरनीरां । मग सांडोनियां असारा । शुद्ध सारा सेविसी ॥ ६ ॥ ऐशिया हंसा जी सुकुमारा । मुक्तमोतियांचा तुज चारा । जीं कां वैराग्यशुक्तिद्वारा । चित्सागरामाजीं झालीं ॥ ७ ॥ सर्वथा नातळोनि क्षिती । निरालंब मार्गाप्रती । चालणें चालसी हंसगती । हे गमनशक्ती अभिनव ॥ ८ ॥ अभिन्न स्वभावता निजअंशीं । चिन्मात्रवागीश्वरी तूं वाहसी । हंसवाहिनी आख्या ऐशी । तुझेनि अंशेंसी तीस झाली ॥ ९ ॥ तुझेनि चालविल्या सरस्वती चाले । तुवां बोलविल्या वेद बोले । तुवां चेतविल्या प्राण हाले । तुझेनि वाचाळें वाग्देवी वदे ॥ १० ॥ झाली वागीश्वरी वाग्देवता । तिसी तुझेनि वाचाळता । जेवीं कां वेणु वाजे मधुरता । परी वाजवितां तो भिन्न ॥ ११ ॥ एवं वाच्य वचन वक्ता । तूंचि वागीश्वरी तूंचि वदता । आपुल्या हंसरूपाची कथा । स्वभावतां बोलविसी ॥ १२ ॥ बोलावया महाकवीच्या ठायीं । तुवां वागीश्वरी द्योतिली पाहीं । ते हंसरूपाची नवाई । अभिनव कांहीं बोलवी ॥ १३ ॥ तो

हे ओंकाररूपी अनादि हंसा, हंसरूप जगदीश्वर, परम-परेश, परिपूर्ण परमहंस सद्गुरुराया ! तुला नमस्कार असो. १ दोन पक्ष असल्यावांचूनच तुझे दोन पंख शोभत आहेत. तुझें स्वरूप शुद्ध सत्त्वाहूनहि सुंदर व सोज्ज्वल अहे. २ हंस शुभ्रवर्णाचा असतो, असें बोलतात, पण तुझा हंसपणा कांहीं विलक्षणच आहे. सगळे वर्ण सोडून तुला हंसपणा शोभत आहे. ३ सोन्याच्या कमळांचा विकास झाला म्हणजे इतर हंस तेथें क्रीडा करितात; पण तूं प्रेमानें प्रफुल्लित झालेल्या हृदयकमलांत क्रीडा करितोस. ४ इतर हंस मानससरोवरांत रहातात; पण तूं मनसातीत स्थलीं असतोस. हंस आकाशांत उडतात, व तूं चिदाकाशांत उड्डाण करितोस. ५ तूं आपल्या विवेकरूपी चोंचीनें नित्य व अनित्य या क्षीरनीराचें पृथक्करण करितोस आणि असार टाकून शुद्ध-साराचें सेवन करितोस. ६ अशा सुकुमार हंसराया ! चित्सागरामध्यें झालेलीं वैराग्य शिपींतील मुक्ताफळें हा तुझा चारा आहे. ७ पृथ्वीला स्पर्शहि न करितां तूं निराधार अशा आकाशमार्गानें गमन करितोस. ही तुझी गमनशक्ति मोठी अपूर्व आहे. ८ स्वभावतःच तुझ्याहून भिन्न नसलेल्या वागीश्वरीला तूं वहातोस. तुझ्या अंशामुळेंच तिला 'हंसवासिनी' असें नांव पडलें. ९ तूं चालविलेंस तरच सरस्वती चालते, तूं बोलविलेंस तरच वेद बोलतो, तूं चेतना दिलीस तरच प्राण हलतो व तूं वदविलेंस तर वाग्देवी वक्तृत्व करिते. १० सरस्वती तुझ्यामुळेंच वाग्देवता झाली. मुरली मधुर ध्वनि काढिते; पण ती वाजविणारा जसा वेगळाच असतो, ११ तशी सरस्वती तुझ्यायोगेंच वक्त्री झाली आहे. याप्रमाणें शब्द, भाषण व वक्ता तूंच आहेस. वाग्देवी तूंच आणि भाषण करणाराहि तूंच. आपल्या हंसरूपाची कथाहि तूंच तिच्याकडून बोलवितोस. १२ महाकवींमध्यें तूंच वाग्देवीला प्रकाशित करून त्यांना बोलण्याची स्फूर्ति दिलीस. ती तुझ्या हंसरूपाची विलक्षणता नवीनच कांहीं बोलविते. १३ तो तूं सर्व

तूं सर्व भूतीं समान । हंसस्वरूपीं श्रीजनार्दन । त्याचे वंदितां निजचरण । जन्ममरण पळालें ।। १४ ।। आपभयें पळतां त्यासी । लपणी मिळाली भ्रमापाशीं । जन्ममार्गें मरणासी । ठावू वसतीसी दीधला ।। १५ ।। यालागीं भ्रमामाजीं जो पडला । तो जन्ममरणांसी आतुडला । मग न सुटे कांहीं केल्या । यंत्रीं पडला भ्रमचक्रीं ।। १६ ।। तेथ राहटमाळेच्या परी । जन्ममरणांचे पडे यंत्रीं । एकाची सोसी भरोवरी । तंव दुसरें शिरीं आदळे ।। १७ ।। तें निस्तरावया जन्ममरण । तुज सोहंहंसाचें स्मरण । जैं कां करी सावधान । भ्रममोचन तैं होय ।। १८ ।। तो तूं परमात्मा परमहंसु । परब्रह्मैक पूर्ण परेशू । ब्रह्मपुत्रासी उपदेशु करावया हंसू झालासी ।। १९ ।। तें हंसमुखींचें निरूपण । बोलावया बोलका श्रीशुक जाण । त्या वचनार्थातें लेवून । परम पावन परीक्षिती ।। २० ।। त्या हंसाचें हंसगीत । कृष्ण उद्धवासी सांगत । श्रोतां व्हावें दत्तचित्त । अचुंबित निजबोधू ।। २१ ।। तो हा तेरावा अध्यावो । अत्यादरें सांगे देवो । तें ऐकतां उद्धवो । विषयविलयो देखेल ।। २२ ।। तेरावे अध्यायीं निरूपण । सत्ववृद्धीचें कारण । विद्याउद्भवक्रमू जाण । अतिसुलक्षण सोपारा ।। २३ ।। हंसइतिहासाचा योगू । स्वयें सांगेल श्रीरंगू । तेणें चित्तासी विषयवियोगू । सुगम सांगू सांगेल ।। २४ ।। द्वादशाध्यायाचे अंतीं । करूनि सद्गुरूची भक्ती । पावोनि विद्याकुठारप्राप्ती । छेदावा निश्चितीं जीवाशयो ।। २५ ।। छेदिल्या जीवाचें जीवपण । सकळ सांडावें साधन । हें उद्धवें ऐकूनि जाण । प्रतिवचन नेदीच ।। २६ ।। उद्धवाचे जीवींचा भावो । सखोल हृदयींचा अभिप्रावो । सकळ आकळोनियां सद्भावो । स्वयें श्रीकृष्णदेवो बोलत ।। २७ ।। म्हणसी लागोनि सूत्र त्रिगुण । जीवासी आलें जीवपण । ते अंगीं असतां तीनी गुण । सद्विद्या जाण उपजेना ।। २८ ।। तोंडींचा खिळू नव्हतां दूरी । नारेळजळ न चढे करीं । तेवीं गुण न वचतां निर्धारीं । विद्या कैशापरी उपजेल ।। २९ ।। ऐसा आशंकेचा भावो । जाणोनियां श्रीवासुदेवो । तिहीं श्लोकीं तो पहा हो । गूढाभिप्रावो निरसितू ।। ३० ।।

भूतांमध्यें समान असलेल्या हंसरूपी जनार्दन आहेस. तुझ्या चरणांना वंदन केलें असतां जन्ममरण पळून जातें. १४ तें जेव्हां आपल्याच ठिकाणीं घाबरून पळालें, तेव्हां त्याला भ्रमापाशीं लपून बसण्यास जागा सांपडली. तेव्हां त्यानें मरणाला जन्मापाठीमागें जागा नेमून दिली. १५ यास्तव जो भ्रमांत सांपडला तो जन्ममरणांत अडकलाच; याप्रमाणें भ्रमरूप चक्राच्या यंत्रांत सांपडल्यावर तो त्यांतून कांहीं केल्या सुटत नाहीं. १६ तेथें तो रहाट-गाडग्याच्या माळेप्रमाणें जन्म मरणांच्या फेऱ्यांत सांपडतो. एकाचा लोंढा सोसावा तों दुसरा येऊन मस्तकावर आदळतो. १७ त्या जन्म-मरणांचें निरसन करण्यासाठीं जेव्हां तुज सोहं-हंसाचें स्मरण करितो, तेव्हां तो भ्रमापासून मुक्त होतो. १८ तो तूं परमात्मा, परमहंस, परब्रह्म, एक, पूर्ण परेश, ब्रह्मदेवाच्या पुत्रांना उपदेश करण्यासाठीं हंस झालास. १९ तें हंसाच्या मुखांतील निरूपण सांगण्यासाठीं श्रीशुकाचार्य वक्ता झाला व त्याच्या वचनाचा अर्थ ग्रहण करून परीक्षिति राजा पावन झाला. २० त्या हंसाचें हंसगीत श्रीकृष्ण उद्धवाला सांगत आहे. तरी श्रोत्यांनीं लक्ष देऊन ऐकावें, म्हणजे सहजच आत्मबोध प्राप्त होईल. २१ हा तेरावा अध्याय श्रीकृष्ण अतिशय आदरानें सांगत आहे. तो ऐकून उद्धवाच्या विषयवासनांचा नाश होईल. २२ तेराव्या अध्यायांत सत्त्ववृद्धीचें कारण व अविद्येचें निरसन होऊन विद्या प्रकट होण्याचा क्रम अतिशय सुंदर व सुलभ रीतीनें सांगितला आहे. २३ श्रीकृष्ण स्वतःच हंसाच्या इतिहासाचा योग व त्यांतच चित्ताशीं विषयांचा वियोग होण्याचा प्रकार सोप्या रीतीनें सांगणार आहे. २४ बाराव्या अध्यायाच्या शेवटीं सद्गुरुभक्ति करून विद्याकुठार मिळवून जीवाच्या वासनांचा छेद करावा असें सांगितलें. २५ जीवाचें जीवपण गेलें कीं, सर्व साधनें सोडून द्यावींत, हें भवगद्वचन उद्धवानें नुसतें ऐकून घेतलें, त्यावर तो कांहीं बोलला नाहीं. पण त्याच्या मनांतील गूढ आशय ओळखून श्रीकृष्ण आपणच बोलूं लागले. २७ तूं म्हणशील कीं, त्रिगुणांचें सूत्र लागून जीवाला जीवपण येतें. ते तीन गुण असेपर्यंत सद्विद्या उत्पन्न होणार नाहीं. २८ नारळाच्या तोंडावरील खीळ काढल्यावांचून त्यांतील पाणी जसें हातांत येत नाहीं, त्याप्रमाणें गुण गेल्यावांचून विद्या उत्पन्न होणार नाहीं । २९ ही त्याच्या मनांतील शंका जाणून श्रीवासुदेवानें पुढील तीन श्लोकांनीं निरसन केलें आहे. ३०.

श्री०भ०-सत्त्वं रजस्तम इति गुणा बुद्धेर्न चात्मनः । सत्त्वेनान्यतमौ हन्यात्सत्त्वं सत्त्वेन चैव हि ॥ १ ॥

सत्वरजतमादि गुण । निश्चयेंसीं मायेचे जाण । हें द्वादशाध्यायीं निरूपण । तुज म्यां संपूर्ण सांगीतलें ॥ ३१ ॥ सच्चिदानन्द जो येथ । आत्म्यासीं अभिन्न नित्य । तैसे गुण नव्हती समस्त । ते प्राकृत प्रकृतिकार्यें ॥ ३२ ॥ जें सद तेंचि चिद । जें चिद तोचि आनंद । स्वरूपीं नाहीं त्रिविध भेद । तें एकवद सच्चिदानन्द ॥ ३३ ॥ जेवीं श्वेतता मृदु मधुर । त्रिविध भेदें एक साखर । तेवीं सच्चिदानन्द अविकार । वस्तु साकार एकवद ॥ ३४ ॥ प्रकृति गुणांतें उपजविती । गुणास्तव सबळ प्रकृती । गुणांसी आत्म्यासी संगती । न घडे कल्पांतीं उद्धवा ॥ ३५ ॥ येथ विद्याउत्पत्तिलक्षण । स्वयें सांगे नारायण । करूनि गुणें गुणांचें मर्दन । सद्विद्या जाण साधावी ॥ ३६ ॥ सत्व वाढवून सुरवाडें । जैं रज तम निःशेष झडे । तैं सद्विद्या हाता चढे । सत्वाची वाढी मोडे । निजसत्वेंकरूनी ॥ ३७॥ सर्प लागला होय ज्यासी । विष खादल्या उतार त्यासी । तें विष खातां येरे दिशीं । आत्मघातासी वाढवी ॥ ३८ ॥ तैसें रजतमलोपें सत्व वाढे । वाढलें सत्व बाधकत्वें कुडें । तेही बाधा मी तुजपुढें । अतिनिवाडें सांगेन ॥ ३९ ॥ मी अलिप्त कर्मकार्या । मी ज्ञाता मी महासुखिया । ऐशा वाढवूनि अभिप्राया । गुणें गुणकार्या

(आतां या तेराव्या अध्यायांत सत्त्वगुणाच्या वृद्धीनें विद्येच्या उदयाचा क्रम व हंसाच्या इतिहासानें चित्त व विषय यांच्या वियोगाचें वर्णन केलें आहे.)

—विद्यारूपी कुठारानें लिंगशरीराचा छेद करून साधनांचा त्याग कर, असें गेल्या अध्यायाच्या शेवटीं सांगितलें; पण तम-आदि गुणत्रयपरिणामांचा प्रतिबंध असतांना विद्योत्पत्ति कशी होईल ! अशी आशंका घेऊन भगवान् गुणत्रयाच्या निवृत्तीनें विद्योत्पत्तीचा प्रकार सात श्लोकांनीं सांगतात—

श्रीभगवान् उवाच—श्रीभगवान् म्हणाले, **सत्त्वं रजः तमः इति गुणाः**—सत्त्व, रज व तम असे तीन गुण आहेत. (ते जर सत्-चित्-आनंद याप्रमाणें आत्मधर्मगुण असते तर तें त्याचें स्वरूपच असल्यामुळें त्यांच्या निवृत्तीनें विद्येची उत्पत्ति झाली नसती, पण वस्तुतः तसें नाहीं असें सांगतात—) **बुद्धेः न च आत्मनः**—ते गुण बुद्धीचे म्ह० प्रकृतीचे आहेत, आत्म्याचे नव्हेत. म्हणून, **सत्त्वन अन्यतमौ हन्यात्**—त्यामुळें सत्त्वगुणाच्या वृद्धीनें रजोवृत्ति व तमोवृत्ति यांना मारावें म्ह० त्यांना जिंकावें. **सत्त्वं च सत्त्वेन एव हि**—आणि सत्य, दया इत्यादि वृत्तिरूप सत्त्वाची उपशमात्मक सत्त्वानेंच निवृत्ति करावी. १.

सत्त्व, रज व तम हे निश्चयानें मायेचे गुण आहेत, असें तूं समज. यांचें बाराव्या अध्यायांत सविस्तर निरूपण करून मीं तुला सांगितलें. ३१ सत्, चित् व आनंद हे जसे आत्म्याशीं एकरूप आहेत, तसे सत्त्व, रज व तम हे गुण एकरूप नाहींत. ते प्रकृतीचीं कार्यें असल्यामुळें प्राकृत आहेत. ३२ जें सत् तेंच चित् व जे चित् तेंच आनंद. आत्मस्वरूपांत त्यांचा त्रिविधभेद नाहीं. तें एकरूपानें सच्चिदानंदच आहे. ३३ ज्याप्रमाणें शुभ्रपणा, मऊपणा व मधुरपणा हे तीन्ही गुण साखरेंच एकरूपानेंच असतात, त्याप्रमाणें तें सच्चिदानंद अविकार एकरूप असून आकारानेंहि एकरूपच आहे. ३४ माया सत्त्व, रज व तम या गुणांना उत्पन्न करिते व गुणांमुळें ती प्रबल होते. यास्तव हे उद्धवा ! गुण व आत्मा यांची संगति कदापि घडत नाहीं. ३५ येथें विद्येच्या उत्पत्तीचें लक्षण स्वतः नारायण सांगत आहे. गुणांनीच गुणांचा नाश करून सद्विद्या साध्य करावी. ३६ मोठ्या आवेशानें सत्त्वगुणाची वृद्धि केली असतां रज व तम सत्वर नाहींसे होतात व सद्विद्या हातीं येते आणि स्वरूपबोधानेंच सत्वगुणांची वाढहि खुंटते. ३७ सर्पदंश झाला असतां विष खाऊन त्याचें विष उतरवितां येतें. परंतु एरवीं जर विष खाल्लें तर तें जसें प्राणच घेतें. ३८ त्याप्रमाणें सत्त्वगुणाच्या वाढीनें रज-तमाचा लोप होतो; पण वाढलेला सत्त्वगुण तसाच राहिल्यास बाधक होतो. त्याची बाधा कशी होते, तेंहि मी तुला स्पष्ट करून सांगतों. ३९ ' मी कर्मापासून अलिप्त आहें, मी ज्ञाता व मी अति-

गोंविजे सत्वें ॥ ४० ॥ ऐसा वाढला जो सत्वगुण । त्यासी उपशमात्मक निजसत्वें जाण । समूळ करावें निर्दळण । तैं समाधान पाविजे ॥ ४१ ॥ उद्धवा तूं ऐसें म्हणसी । समानता तिहीं गुणांसी । केवीं वाढी होईल सत्वासी । गुण गुणांसी राखण ॥ ४२ ॥ वाढल्या तमोगुण । नावडे तेव्हां ज्ञानध्यान । नावडे त्याग भोग चंदन । निद्रा दारुण का कलहो ॥ ४३ ॥ वाढल्या रजोगुण । ऐकतां ज्ञाननिरूपण । त्याचें भोगासक्त मन । सदा ध्यान विषयांचें ॥ ४४ ॥ धनलोभ सुदल्या दिठी । पांपरा घेतल्या क्रोध नुठी । हे रजोगुणाची कोटी । लोभिष्ट पोटीं स्त्रीपुत्रा ॥ ४५ ॥ वाढलिया सत्वगुण । स्त्रियादिभोगीं उदासीन । सदा करी भगवच्चिंतन । कां करी कीर्तन हरिभक्ती ॥ ४६ ॥ क्रोधलोभमोहलक्षण । सत्वकाळीं नुठे जाण । परी एकला केवीं वाढे सत्वगुण । गुणांसी राखण गुण होती ॥ ४७ ॥ मागें तम पुढें रज पूर्ण । मध्यें अडकला सत्वगुण । तो कैसेनि वाढेल जाण । अडकलेपण सुबद्ध ॥ ४८ ॥ ऐशी आशंका धरूनि जाण । म्हणसी वाढेना सत्वगुण । तें सत्ववृद्धीचें लक्षण । ऐक संपूर्ण सांगेन ॥ ४९ ॥

सत्त्वाद्धर्मो भवेद्वृद्धात्पुंसो मद्भक्तिलक्षणः । सात्त्विकोपासया सत्त्वं ततो धर्मः प्रवर्तते ॥ २ ॥

ये श्लोकींचें निरूपण । पाहिलें उत्तरार्धव्याख्यान । तेथें सत्ववृद्धीचें कारण । सात्विकसेवन ॥ ५० ॥ सात्विक पदार्थ सेवितां । सत्ववृद्धि होय सर्वथा । सत्वविजयें वर्ततां । पवित्रता जीवाची ॥ ५१ ॥ सत्वउत्कर्षाचें लक्षण । धर्मनिष्ठा स्वधर्माचरण । तैसें तेथील वासनाबंधन । इहामुत्र जाण

शय सुखी आहें ' अशा कल्पना वाढत गेल्या असतां सत्त्वगुणच गुणाच्या कार्यांत गुंतवून टाकितो. ४० याप्रमाणें वाढलेला जो सत्त्वगुण त्याचाहि उपशमात्मक स्वरूपबोधानेंच समूळ नाश करावा. तेव्हांच खरें समाधान प्राप्त होतें. ४१ उद्धवा ! तूं कदाचित् असें म्हणशील कीं, तीन्ही गुण समान असतां, त्यांतील सत्त्वगुणाचीच वाढ कशी होईल ! गुणच गुणांचें रक्षण करितात. ४२ (तर ऐक.) तमोगुण वाढला असतां ज्ञान, ध्यान, त्याग, भोग, चंदन हें कांहीं त्याला आवडत नाहीं. झोंप किंवा जंगी भांडण याची त्याला आवड असते. ४३ रजोगुण वाढला असतां तो जरी ज्ञाननिरूपण ऐकत असला तरी त्याचें भोगासक्त मन सारखें विषय-चिंतन करीत असतें. ४४ त्याच्या दृष्टीस एकदा धनलोभ पडला कीं, मग कोणी वहाण जरी उगारिली तरी त्याला क्रोध येत नाहीं. स्त्री-पुत्रावरील आसक्ति व लोभ हें रजोगुणाचें लक्षण आहे. ४५ सत्त्वगुण वाढला असतां स्त्रियादिकांच्या भोगाविषयीं उदासीन होऊन तो सदैव भगवच्चिंतन किंवा हरिभक्ति करीत असतो. ४६ क्रोध-लोभ-मोह यांचें लक्षण सत्त्वगुणांत उचल खात नाहीं. परंतु एकटा सत्त्वगुण कसा वाढणार ! गुण गुणांचें रक्षण करितात. ४७ मागें तम व पुढें रज या दोहोंच्या कचाटींत सांपडलेला सत्त्वगुण वाढणार कसा ! ४८ अशी शंका घेऊन सत्त्वगुण वाढत नाहीं, असें जर म्हणशील तर सत्त्वगुणाच्या वृद्धीचें लक्षण सविस्तर सांगतों, तें ऐक. ४९.

—अहोपण, या त्रिगुणांच्या वृत्ति परस्पर विनाशक आहेत; तेव्हां एकट्या सत्त्वाच्याच वृद्धीनें इतर वृत्तींना नियमानें प्रतिबंध कसा होणार ! असें विचारशील तर सांगतों—

वृद्धात् सत्त्वात् पुसः मद्भक्तिलक्षणः धर्मः भवेत्—वृद्धि पावलेल्या सत्त्वगुणापासून पुरुषाचा मद्भक्तिलक्षण धर्म उद्भवतो, (माझ्या भक्तीला लक्षित करणारा किंवा माझी भक्ति हाच धर्म उत्पन्न होतो, असा याचा भावार्थ. पण सत्त्वाचीच वृद्धि कशी होते ? उत्तर—) सात्त्विकोपासया—सात्त्विक उपासनेच्या सेवनानें सत्त्वाची वृद्धि होते व, ततः धर्मः प्रवर्तते—त्यापासून सात्त्विक धर्म प्रवृत्त होतो. २.

या श्लोकाच्या निरूपणांत पाहिल्यानें उत्तरार्धाचें व्याख्यान करितों. सात्त्विक वस्तूंचें सेवन हें सत्त्वबुद्धीचें कारण आहे. ५० सात्त्विक पदार्थांचें सेवन केलें असतां सत्त्वगुण सर्वथा वाढतो व सत्त्वगुण वाढला असतां जीवाला पवित्रपणा येतो. ५१ धर्मनिष्ठा व धर्माचरण हेंच सत्त्वगुणाच्या उत्कर्षाचें लक्ष्मण आहे. त्याचप्रमाणें तो इह

वांछीना ॥ ५२ ॥ झालिया शुद्ध अंतःकरण । तेव्हां निःसीम वाढे सत्वगुण । पुरुषासी मद्भक्तिलक्षण । धर्म जाण उपतिष्ठे ॥ ५३ ॥ सत्व वाढल्या धर्मप्रवृत्ती । तैं गुरुभजनीं अतिप्रीती । कां सत्वविग्रही माझी मूर्ती । ते ठायीं भक्ती उल्हासे ॥ ५४ ॥ कायिक वाचिक मानसिक । मदर्पण करी स्वाभाविक । मजवेगळा आणिक । भावार्थे देख स्फुरेना ॥ ५५ ॥ गुरु भगवंत अभिन्न । हें ते काळीं प्रकटे चिन्ह । ते अतिसत्वाची बोळखण । हे धर्म पूर्ण सात्विक ॥ ५६ ॥

धर्मो रजस्तमो हन्यात् सत्त्ववृद्धिरनुत्तमः । आशु नश्यति तन्मूलो ह्यधर्म उभये हते ॥ ३ ॥

ऐसा वाढलिया सात्विक धर्म । तैं सत्ववृद्धि सर्वोत्तम । जे सत्वीं प्रकटे पुरुषोत्तम । विश्रामधाम मुमुक्षां ॥ ५७ ॥ एवं सत्ववृत्तीं वाढला धर्म । तो तत्काळ नाशी अधर्म । अधर्माचें मूळ रजतम । त्यांचें रूपनाम उरों नेदी ॥ ५८ ॥ सात्विकसेवनें सत्ववृद्धी । तेणें सद्विद्येची उपलब्धी । हे उपायाची विधानविधी । कृष्ण कृपानिधी बोलिला ॥ ५९ ॥ करावें सात्विकसेवन । ते तात्विक पदार्थ कोण कोण । ऐक त्यांचेंही निरूपण । दशलक्षण सांगेन ॥ ६० ॥

आगमोऽपः प्रजा देशः कालः कर्म च जन्म च । ध्यानं मन्त्रोऽथ संस्कारो दशैते गुणहेतवः ॥ ४ ॥

गुणवृद्धीचें कारण । आगम म्हणिजे शास्त्र जाण । आप म्हणिजें तें जीवन । आवडतें स्थान तो देशू ॥ ६१ ॥ ऐक प्रजांचें विंदान । जाण म्हणिजे त्रिविध जन । जैशी ज्याची संगती जाण । तैसें

व परलोकांतीलहि विषयांची इच्छा करीत नाहीं. ५२ अंतःकरण शुद्ध झालें असतां सत्त्वगुण अमर्याद वाढतो. पुरुषाला मद्भक्तिलक्षणधर्म प्राप्त होतो. ५३ त्यामुळें गुरुभजनाची आवड अतिशय वाढते व माझ्या सत्त्वाकार मूर्तीमध्यें भक्तीचा विकास होतो. ५४ तो कायिक, वाचिक व मानसिक कर्म स्वभावतःच मदर्पण करितो. माझ्यावांचून दुसरी कल्पनाहि त्याच्या मनांत येत नाहीं. ५५ त्यावेळीं गुरु व भगवान् हे भिन्न नाहींत, असें त्याच्या प्रत्ययास येतें. ही वृद्धि पावलेल्या सत्त्वाची खूण आहे. तोच पूर्ण सात्त्विक धर्म होय. ५६.

धर्मः रजः तमः हन्यात्–तो धर्म रज व तम या दोहोंनाहि पराभूत करितो. कारण, सत्त्ववृद्धिः अनुत्तमः–सत्त्वगुणाची वृद्धि हाच सर्वोत्तम धर्म आहे. उभये हते तन्मूलः हि अधर्मः आशु नश्यति–आणि त्या दोन गुणांचा नाश झाला असतां तन्मूलकच अधर्म (म्ह० राग-द्वेषादि व प्रमाद-आलस्यादि या राजस व तामस वृत्तींनींच होणारा अधर्म) सत्वर नाश पावतो. ३.

असा सात्त्विक धर्म वाढविला असतां सर्वोत्तम सत्त्वाची वाढ होते व त्या सत्त्वांत मुमुक्षूंच्या विश्रांतीचें स्थान असा पुरुषोत्तम प्रकट होतो. ५७ याप्रमाणें सत्त्ववृत्तींत धर्म वाढला असतां अधर्माचा नाश होतो. अधर्माचें मूळ जे रज व तम त्यांचें नांव-रूपहि उरत नाहीं. ५८ सात्त्विक पदार्थांच्या सेवनानें सत्त्वगुण वाढतो व त्यानें आत्मज्ञान उपलब्ध होतें. त्या उपायाचें विधान कृपानिधि श्रीकृष्णानें सांगितलें. ५९ सात्त्विक पदार्थ कोठचे ! त्यांच्याहि दहा लक्षणांचें व्याख्यान करून सांगतों, तें ऐक. ६०.

—सात्त्विक उपासनेनें सत्त्वगुणाची वृद्धि होते, असें वर सांगितलें आहे. यास्तव आतां तेच सत्त्ववृद्धीचे हेतु दाखविण्यासाठीं अगोदर सामान्यतः तीन्ही गुणांच्या वृद्धीचे हेतु सांगतात—

'आगमः०......एते दश गुणहेतवः'–शास्त्र, जल, पुत्र, वाराणसी इत्यादि देश, वसंतादि काल, वेदोक्त कर्म, देवादिकांचा जन्म व ध्यान, द्वादशाक्षरादितमंत्र, जातकर्मादि संस्कार हे दहा त्रिगुणांच्या उत्पत्तीचे हेतु आहेत. ४.

सत्व, रज व तम, या तीन गुणांच्या वृद्धीचें कारण आगम म्हणजे शास्त्र होय, असें तूं समज. आप म्हणजे पाणी देश म्हणजे आपलें आवडतें स्थान. ६१ आतां प्रजेचें लक्षण ऐक. प्रजा म्हणजे तीन प्रकारचे

लक्षण तो पावे ॥ ६२ ॥ काळ म्हणिजे दिवसभाग । कर्म म्हणिजे जें करी अंग । जन्म म्हणिजे दीक्षा सांग । मंत्राचें लिंग यथारुचि ॥ ६३ ॥ कर्त्याचा जेथ अत्यादरू । त्या नांव बोलिजे संस्कारू । हा दशलक्षणप्रकारू । गुणवृद्धिविचारू तो ऐक ॥ ६४ ॥ येथ सत्यवृद्धीसी प्रस्तुत । साधकांसी शास्त्र निवृत्त । उपनिषद्भागेंसीं वेदांत । त्याचा मतितार्थ सेवावा ॥ ६५ ॥ आप म्हणिजे जळपवित्रता । गौतमीभागीरथ्यादि पुण्यसरिता । ज्यांचा अवचटें शिंतोडा लागतां । पाप सर्वथा उरेना ॥ ६६ ॥ कां माझ्या प्रतिमांचें चरणामृत । ज्यालागीं ब्रह्मादिक आर्तभूत । किंवा शालिग्रामशिळेचें तीर्थ । सकळ दुरित निवारी ॥ ६७ ॥ जेणें सकळ तीर्थें होती पावन । तें ब्राह्मणाचें चरणतीर्थ जाण । स्वयें वंदी श्रीनारायण । निजहृदयीं चरण वाहतसे ॥ ६८ ॥ भलतैसें हो कां पाणी । जें लागलें सद्गुरुचरणीं । तें सकळ तीर्थां शिरोमणी । सेवितां तत्क्षणीं उद्धरी ॥ ६९ ॥ सत्ववृद्धीचें कारण आप । तें इयें तीर्थीं जाण पुण्यरूप । सेवितां सत्ववृद्धीचें स्वरूप । आपेंआप प्रकाशे ॥ ७० ॥ प्रजा म्हणिजे महाजन । सेवावे साधुनिवृत्त जन । ज्यांचे संगतीस्तव जाण । उद्धरण जडजीवां ॥ ७१ ॥ सत्ववृद्धीसी कारण । मुख्यत्वें सत्संगतीचि जाण । त्या सत्संगाचें महिमान । केलें निरूपण द्वादशीं ॥ ७२ ॥ देशू पुण्यभूमिका सिद्धिस्थळ । विजनवासू एकांतशीळ । जेथ बैसतांचि तत्काळ । सत्वासी बळ चढो-वढीं ॥ ७३ ॥ एकांतीं स्थिरावल्या आसन । सहजें वाढे सत्वगुण । मनीं हव्यासू चढतां जाण । वस्तु चिद्घन साधावया ॥ ७४ ॥ साधकांसी काळ यथोचित । अवश्य ब्राह्मयमुहूर्त । का जे काळीं उद्वेग-रहित । हर्षयुक्त मन होय ॥ ७५ ॥ प्रेमयुक्त अंतःकरणें । जो काळ जाय कथाश्रवणें । कां जयंत्यादि महापूजा करणें । जागरणें हरिदिनीं ॥ ७६ ॥ थोर काळाची सार्थकता । हरिकीर्तनीं गातां नाचतां ।

लोक. जशी ज्याला संगति असते तशा लक्षणाला तो प्राप्त होतो. ६२ काळ म्हणजे दिवसाचा भाग. आपण देहानें जें करितों तें कर्म. जन्म म्हणजे अंगासह दीक्षा. आपल्या आवडीप्रमाणें मंत्राचें लक्षण समजावें. ६३ कर्त्याचा ज्यामध्यें अतिशय आदर असेल त्याला संस्कार असें म्हणतात. अशीं हीं दहा प्रकारचीं लक्षणें आहेत. आतां गुणाच्या वृद्धीचा विचार तूं ऐक. ६४ प्रस्तुत सत्ववृद्धीसाठीं साधकाला निवृत्तिपर वेदान्तशास्त्र विहित आहे. यास्तव त्यानें उपनिषद्भागांसह वेदान्ताचा मथितार्थ ग्रहण करावा. आप म्ह० जलाचा पवित्रपणा. गोदावरी, भागीरथी इत्यादि पवित्र नद्यांच्या पाण्याचा सहज एक शिंतोडा जरी उडाला तरी पाप सर्वथा नाहींसें होतें. ६६ किंवा ज्याच्यासाठीं ब्रह्मदेवादिकहि आशाळभूत होऊन रहातात, तें माझ्या प्रतिमांचें चरणामृत, किंवा शालिग्रामाचें तीर्थहि सगळ्या पातकांचा नाश करितें. ६७ ज्यानें सर्व तीर्थेंहि पावन होतात तें ब्राह्मणांचें चरणातीर्थ श्रीनारायणहि वंद्य मानितो व त्यांचे चरण हृदयावर धारण करितो. ६८ कसलेंहि कां पाणी असेना ! त्याला सद्गुरुचरणांचा स्पर्श होतांच तें सर्व तीर्थोदकांत श्रेष्ठ होते सेवन करितांच तें तत्काल उद्धार करितें. ६९ सत्त्ववृद्धीचें कारण जल आहे. तें या तीर्थामुळें पावन होतें व त्याच्या सेवनानें सत्त्ववृद्धीचें स्वरूप सहजच प्रकट होतें. ७० प्रजा म्हणजे श्रेष्ठ सज्जन. संत व विरक्त जन यांची सेवा करावी. त्यांच्या संगतीनेंच जड जीवांचा उद्धार होतो. ७१ सत्संगतीच मुख्यतः सत्त्ववृद्धीचें कारण आहे. त्या सत्संगाच्या महिम्याचें निरूपण बाराव्या अध्यायांत केलें आहे. ७२ नैमिषारण्यादि पुण्यभूमि किंवा सिद्धि प्राप्त करून घेण्याची जागा हा देश होय. त्या देशांतील एकान्त व निर्जन प्रदेशीं बसतांच सत्त्वगुण तत्काल प्रबल होतो. ७३ एकान्तांत आसन स्थिर झालें असतां सत्त्वगुण सहज वाढतो व चिद्घन परब्रह्माला प्राप्त होण्यासाठीं मनाची उत्सुकता होते. ७४ ब्राह्म-मुहूर्त-म्ह० रात्रीचा शेवटचा मुहूर्त-पहांट हाच साधकाला योग्य काळ आहे. कारण त्यावेळीं मन उद्वेगरहित व प्रसन्न असतें. प्रेमयुक्त अंतःकरणानें कथा श्रवण करण्यांत जो काळ जातो किंवा देवांच्या जयंत्या व महापूजा करण्यांत व एकादशीला जागरण करण्यांत जो काळ जातो, ७६ तीच काळाची खरी सार्थकता आहे. हरीकीर्तनांत गाणें व

त्या काळाचा महिमा तत्त्वतां । माझेन सर्वथा न बोलवे ॥ ७७ ॥ निरभिमान कीर्तन करणें । निर्लोभ गाणें नाचणें । तो काळ वंदिजे म्यां श्रीकृष्णें । महिमा कोणें बोलावा ॥ ७८ ॥ कर्म म्हणिजे तें निवृत्त । जें आशापाशफळरहित । कां क्रिया जे उपकारार्थ । सात्विक निश्चित तें कर्म ॥ ७९ ॥ गुरूपासोनि दीक्षाग्रहण । तें पुरुषासी नवें जन्म जाण । गुरु मायबाप संपूर्ण । तें ऐक लक्षण उद्धवा ॥ ८० ॥ उपजलिया बाळकासी तत्त्वतां । पंचविध जाण पिता । जनिता आणि उपनेता । तिजा प्रतिपाळिता अन्नदानें ॥ ८१ ॥ जो भयापासूनि सोडविता । जो बंधविमोचन करविता । जो देहाचें मरण चुकविता । तोही पिता शास्त्रार्थें ॥ ८२ ॥ यांवेगळा पांचवा पिता । जो झाडणी करी पंचभूतां । मृत्यूपासून सोडविता । जो गर्भव्यथा निवारी ॥ ८३ ॥ ज्याचे देखिलिया चरण । बांधूं न शके भवबंधन । तो सद्गुरु पिता जाण । भाग्येंवीण न पाविजे ॥ ८४ ॥ उपजल्या बाळकासी सर्वथा । वेगळालीं माता पिता । एक वीर्यातें निक्षेपिता । धारणपोषणता जननीची ॥ ८५ ॥ तैसा सद्गुरु नव्हे पिता । निजवीर्य न वेंचितां । योनिद्वारें नुपजवितां । जननी जनिता स्वयें झाला ॥ ८६ ॥ उदराबाहेरीं घातल्यापाठीं । माता पुत्रस्नेहें कळवळा उठी । बाहेरिलें सूनि आपुले पोटीं । निजस्नेहें गोमटी गुरुमाता ॥ ८७ ॥ यालागीं शिष्यासी तत्त्वतां । सद्गुरूचि माता पिता । निजस्नेहें वाढविता । तदात्मता अभेदें ॥ ८८ ॥ मागील पिते जे चौघेजण । ते याचे सावत्र बाप जाण । माता पिता भिन्नभिन्न । सखेपण त्या कैंचें ॥ ८९ ॥ यालागीं सद्गुरु जो सकृपू । तो सच्छिष्यासी सखा बापू । पित्यापुत्रांमाजीं अल्पू । कांहीं विकल्पू उपजेना ॥ ९० ॥ त्या सद्गुरूपासून जाण । शैवीवैष्णवीदीक्षाग्रहण । अथवा उपदेशी निर्गुण । चैतन्यघन निजबोधें ॥ ९१ ॥ ऐक दीक्षानामाची युक्ती । दे चारी पुरुषार्थ चारी मुक्ती । निःशेष अविद्येची नाशी स्थिती । दीक्षाव्युत्पत्ती त्या नांव ॥ ९२ ॥ एवं दीक्षाजन्माची जे कथा । उद्धवा सांगीतली म्यां

नाचणें यांत जो काल जातो, त्या काळाच्या महिम्याचें वर्णन करण्यासहि मी समर्थ नाहीं. ७७ अभिमानरहित होऊन कीर्तन करणें, लोभरहित होऊन गाणें व नाचणें यांत ज्या काळाचा उपयोग होतो त्या काळाला मी श्रीकृष्णहि वंदन करितों. तेव्हां त्याचें माहात्म्य काय सांगावें ! ७८ जें निष्काम, आशापाशफलरहित किंवा परोपकारार्थ केलेलें सात्विक कर्म तेंच येथील कर्म आहे, असें तूं निश्चयानें जाण. ७९ गुरूपासून दीक्षा घेणें हा पुरुषाचा नवा जन्मच आहे. गुरु पूर्णपणें आई-बापच आहे. हे उद्धवा ! पित्याचें लक्षण ऐक. ८० जन्मलेल्या बालकाचे एकंदर पांच जनक असतात. एक जन्म देणारा, दुसरा उपनयन करणारा, तिसरा पोषण करणारा ८१ आणि जो भयापासून सोडवितो, बंधमुक्त करितो व देहाचें मरण चुकवितो, त्यालाहि शास्त्रानें पिताच म्हटलें आहे. ८२ याशिवाय आणखी एक पांचवा पिता आहे. जो पंचभूतांना घालवून मृत्यूपासून सोडवितो आणि गर्भवास चुकवितो, ८३ ज्याचे चरण दृष्टीस पडताच संसारबंध बाधत नाहीं. सद्गुरुरूपी पिता मात्र भाग्यावांचून लाभत नाहीं. ८४ उत्पन्न झालेल्या बालकाची माता व पिता या भिन्न व्यक्ति असतात; पित्यापासून गर्भसंभव व माता त्याचें धारण पोषण करिते; ८५ परंतु सद्गुरु पिता तसा नाहीं. तो आपलें वीर्य खर्च न करितां व योनिद्वारा बाहेर पडावयास न लावितां आत्मप्रेमानें स्वतःच जनक-जननी होतो. ८६ गर्भातून बाहेर पडल्यावर मग आईला पुत्रप्रेमाचा मोठा कळवळा येतो; परंतु गुरुमाउली बाहेरील सर्व दोष पोटांत घालून खरा स्नेह करिते. ८७ यास्तव सद्गुरूच शिष्याचे वास्तविक माता-पिता आहेत. तो आत्मप्रेमानें त्याला वाढवितो. अभिन्नपणानें तादात्म्य देतो. ८८ आरंभीं सांगितलेले चौघे जनक सावत्र बापच समजावे. त्यांचे आई-बाप दोघेहि भिन्न असल्यावर मग त्यांना सखेपणा कोठचा ! ८९ यास्तव कृपाळु सद्गुरूच सच्छिष्याचा सख्खा पिता आहे. त्यामुळें पिता-पुत्रांत केव्हांहि भेदभाव उपजत नाहीं. ९० त्या सद्गुरूपासून तो शैवी किंवा वैष्णवी दीक्षा घेतो किंवा आत्मज्ञानासाठीं निर्गुण चैतन्यघनाचा उपदेश घेतो. ९१ आतां दीक्षेचें लक्षण ऐक. जी चारी पुरुषार्थ व चारी मुक्ति देते, अविद्येचा समूळ नाश करिते, तिलाच दीक्षा असें म्हणतात. ९२ हे उद्धवा ! याप्रमाणें दीक्षाजन्माची कथा मीं तुला

तत्त्वतां । ध्याननिष्ठ जे सात्विकता । ऐक आतां सांगेन ॥ ९३ ॥ सत्वोपाधि शरीर साचें । चैतन्यघन स्वरूप ज्याचें । तो श्रीविष्णु ध्येय सात्विकांचें । ध्यान त्याचें करावें ॥ ९४ ॥ अथवा धवळधाम गोक्षीर- । कर्पूरगौर पंचवक्त्र । ध्यानीं आणावा शंकर । संसारपार तरावया ॥ ९५ ॥ या मूर्तीचें ध्यान करितां । हारपे ध्येय ध्यान ध्याता । ठसावे चैतन्यघनता । सात्विकता हें ध्यान ॥ ९६ ॥ जैशी दीक्षा तैसें ध्यान । हें आगमशास्त्रींचें प्रमाण । त्या ध्यानाचें पर्यवसान । चैतन्यघन पावावें ॥ ९७ ॥ केवळ जें चैतन्यघन । तें सद्गुरुस्वरूप जाण । त्याचें करावें नित्य ध्यान । अनुसंधान निजनिष्ठा ॥ ९८ ॥ पंचभूतदेहाची मूस । तेथ ओतिला ब्रह्मरस । गुरुस्वरूपा सविलास । ध्यान रात्रंदिवस करावें त्याचें ॥ ९९ ॥ सात्विकांचें जें कां ध्यान । ते हें तूं उद्धवा जाण । आतां मंत्रांचें मंत्रग्रहण । तेंही निरूपण अवधारीं ॥ १०० ॥ सकळ मंत्रांची जननी । जे द्विजन्मा करी तत्क्षणीं । गायत्रीच्या मंत्रग्रहणीं । ब्राह्मणपणीं अधिकारू ॥ १ ॥ जे सकळ मंत्रांचा राजा । जे वांट्या आली असे द्विजां । जिचेनि धाके द्विजपूजा । मज अधोक्षजा करणें पडे ॥ २ ॥ ते गायत्री स्वभावतां । आली असे ब्राह्मणांच्या हाता । तिची उपेक्षा करितां । लौल्यें दरिद्रता पावले ॥ ३ ॥ गायत्रीनिष्ठ जो ब्राह्मण । त्याचे मस्तकीं मी वंदीं चरण । मंत्रीं गायत्री श्रेष्ठ जाण । वेद प्रमाण ये अर्थीं ॥ ४ ॥ गायत्री रिघाल्या-वीण कांहीं । इतर मंत्रीं रिघमू नाहीं । मुख्यत्व ते गायत्रीच्या ठायीं । ते लागले पाहीं सकळ मंत्र ॥ ५ ॥ नव्हतां गायत्रीसंबंध । मुख्य रिघों न शके वेद । इतर मंत्रा केवीं संवाद । वदां वंद्य गायत्री ॥ ६ ॥ गायत्रीचें गुह्य परम । चिन्मात्रैक परमब्रह्म । तो मंत्र ब्राह्मणासीच सुगम । परी तेही वर्म चुकले ॥ ७ ॥ एवं गायत्रीमंत्र ब्रह्मपूर्ण । सकळ सिद्धींचें कारण । शैववैष्णवमंत्रग्रहण । तेणें त्वरित जाण सत्वशुद्धी

सांगितली. आतां ध्याननिष्ठा नांवाची जी सात्त्विकता, ती सांगतों, ऐक. ९३ सत्त्वोपाधि हें ज्याचें शरीर आहे व चैतन्यघन हें ज्याचें स्वरूप आहे. तो श्रीविष्णु सात्त्विकांचें ध्येय आहे. त्याचें ध्यान करावें. ९४ किंवा संसार-सागर तरून जाण्यासाठीं गायीच्या दुधाप्रमाणें व कापरासारख्या शुभ्र वर्ण कैलासांत राहणाऱ्या पंचमुखी श्रीशंकराचें ध्यान करावें. ९५ या मूर्तीचें ध्यान केलें असतां ध्येय, ध्यान व ध्याता हीं नाहींशीं होतात व चैतन्यघनच मनांत ठसतो. हेंच सात्त्विकतेचें ध्यान होय. ९६ जशी दीक्षा तसें ध्यान, हें आगमशास्त्रांतील प्रमाण आहे त्या ध्यानाचें पर्यवसान शेवटीं चैतन्यघन परमात्म्यांतच होतें. ९७ केवळ चैतन्यघन जें सद्गुरूचें स्वरूप, त्याचेंच एकनिष्ठेनें व दृढ अनुसंधानानें नित्य ध्यान करावें. ९८ पंचभूतात्मक जो देह त्याची मूस करून त्यांत ब्रह्मरस ओतावा व त्याची जी सद्गुरुरूपी आकृति बनते, तिचेंच रात्रंदिवस ध्यान करावें. ९९ उद्धवा ! हेंच सात्त्विकांचें ध्यान आहे, असें तूं समज. आतां मंत्राच्या ग्रहणाचें निरूपण ऐक १०० सर्व मंत्राची जननी जी गायत्री तीच पुरुषाचे दोन जन्म करविते. त्याच गायत्रीमुळें ब्राह्मणपणाचा अधिकार प्राप्त होतो. १ सगळ्या मंत्रांचा राजाच असा हा गायत्री मंत्र द्विजांच्या वाट्याला आला आहे. मी श्रीकृष्णहि तिच्याच भीतीनें द्विजांची पूजा करितों. २ ती गायत्री स्वभावतःच ब्राह्मणांच्या हातीं आली आहे. जे तिची उपेक्षा करितात ते लोभामुळें दरिद्री होतात. ३ जे ब्राह्मण गायत्रीनिष्ठ असतात, त्यांच्या चरणांना मी शिरसा वंदन करितों. सर्व मंत्रांत गायत्री श्रेष्ठ आहे, याविषयीं वेद प्रमाण आहे. ४ गायत्रीचा उपदेश झाल्यावांचून इतर मंत्राची प्राप्ति होत नाहीं. यास्तव गायत्रीलाच मुख्यत्व आहे. त्यामुळें सर्व मंत्र तिच्याच अनुरोधानें रहातात. ५ गायत्रीचा संबंध झाल्यावांचून पुरुषामध्यें मुख्य वेद प्रवेश करूं शकत नाहीं. मग इतर मंत्रांची काय कथा ! वेदांनाहि गायत्री वंद्य आहे. ६ चिन्मात्र एक परब्रह्मच आहे. हेंच गायत्रीमंत्राचें गूढ रहस्य आहे. तो मंत्र ब्राह्मणांना सुलभ असूनहि ते त्याचें खरें वर्म जाणण्यास चुकले. ७ याप्रमाणें गायत्रीमंत्र पूर्ण परब्रह्म असून तो सर्व सिद्धींचें कारण आहे. शैव-वैष्णवमंत्रांच्या ग्रहणांनींहि सत्वर सत्त्वशुद्धि होते. ८ सत्त्वशुद्धि झाली कीं,

॥ ८ ॥ सत्वशुद्धीचे परिपाटीं । शैववैष्णवमंत्रकोटी । तेणें सत्वशुद्धी उठाउठीं । होय निजात्मदृष्टी साधकां ॥ ९ ॥ मंत्रग्रहणविचार । उद्धवा जाण हा साचार । आतां बोलिला जो संस्कार । तोही प्रकार परियेसीं ॥ ११० ॥ मनाचे संकल्पविकल्प । तोडावया अतिसाक्षेप । येचि अर्थीचा खटाटोप । महासाटोप जो मांडी ॥ ११ ॥ संकल्पु उठूंचि न लाहे । जेथें उठी तेथें ठेंचित जाये । विवेकाचेनि बळें पाहें । मोकळु होय मनाचा ॥ १२ ॥ परमात्मनिष्ठापरवडी । अखंड मनाची मोडी पाडी । उसंत घेवों नेदी अर्धघडी । स्मरणनिरवडी मन राखे ॥ १३ ॥ वैराग्यबळें दमी मन । तेणें भेणें करी हरिचिंतन । दासी नुलंघी स्वामीचें वचन । तैसें स्मरणाधीन मन करी ॥ १४ ॥ इंद्रियें पाहती नाना पदार्थां । मन पाहे आणिका अर्था । जागृतीं स्वप्नीं स्वभावतां । अखंडतां हरि स्मरे ॥ १५ ॥ ऐशा संस्कारें संस्कारिलें मन । निमिषोन्मिषीं हरिचिंतन । श्वासोच्छ्वासांचें गमनागमन । सोहंध्यान त्या ठायीं ॥ १६ ॥ स्वाभाविक स्मरणादरु । या नांव आत्मसंस्कारु । हा सत्ववृद्धीचा प्रकारु । शाङ्‌र्गधरु बोलिला ॥ १७ ॥ आत्मशुद्धीचें महाकारण । बोलिलों तें हें दशलक्षण । साधकीं सेवावया जाण । विशद निरूपण म्यां केलें ॥ १८ ॥ जेणें खवळला वाढे तमोगुण । तें तमोवृध्दीचें दशलक्षण । केवळ त्यागावया जाण । तेंही निरूपण सांगेन ॥ १९ ॥ तेथींचा आगम आभिचारिक । वेदविरुद्ध मार्ग देख । वारुणी माध्वी मद्योदक । आवश्यक सेविती ॥ १२० ॥ जे उभयभ्रष्ट पाखंडी । वेषधारी वृथा मुंडी । त्यांचे संगतीची अतिगोडी । जेथ अपरवडी विधिवेदां ॥ २१ ॥ द्वेष चोहटा का परद्वार । तेथेंचि बैसका निरंतर । काळ तो त्यासी मध्यरात्र । तैं व्यापार कर्मांचा ॥ २२ ॥ क्रियारंभु जारण मारण । मोहन स्तंभन उच्चाटण । कां करावें वशीकरण । हें कर्म जाण तामस ॥ २३ ॥ जन्म म्हणिजे दीक्षाग्रहण ।

कोट्यवधि शैव–वैष्णवमंत्र साध्य होतात. साधकांची सत्त्वशुद्धि तत्काल होऊन त्यांना आत्मदृष्टीहि प्राप्त होते. ९ हे उद्धवा ! हा मंत्रग्रहणाचा विचार झाला. आतां ज्याला संस्कार म्हणतात. त्याचाहि प्रकार ऐक. ११० मनाचें संकल्प-विकल्प तोडावयास जो मोठ्या नेटानें प्रयत्न करीत असतो, ११ त्याच्या मनांत संकल्प उठतच नाहीं व जरी उद्भवला तरी साधक त्याला तेथेंच दाबून टाकितो. तो सर्वदा विचारदृष्टीनें पहात असल्यामुळें मोकळ्या मनाचा बनतो. १२ परमात्मनिष्ठेच्या भरांत तो सतत मनाला आंवरीत असतो. अर्धा-क्षणहि विसावा न घेतां तो मनाला एकसारखें परमात्मचिंतनांतच गुंतवून ठेवितो. १३ तो वैराग्यबळानें मनाचें दमन करून त्याच्या भीतीनें हरिचिंतन करीत असतो. दासी ज्याप्रमाणें धन्याच्या शब्दांचें उल्लंघन करीत नाहीं, त्याप्रमाणें तो मनाला हरिस्मरणाच्या अधीन करितो. १४ इंद्रियें जरी अनेकप्रकारचे पदार्थ पहात असलीं तरी साधकाचें मन दुसऱ्या कशाकडेहि लक्ष ठेवीत नाहीं. तें जागृति व स्वप्नांतहि स्वभावतःच सतत हरिस्मरण करीत असतें. १५ मनाला असा संस्कार झाला असतां तें निमिषोन्मेषांच्या वेळींहि हरिस्मरण करीत असतें. श्वासोच्छ्वास, जाणें, येणें, या सर्व कर्मांत त्याला 'सोहं' ध्यान लागून रहातें, १६ असा जो स्वभावतःच हरिस्मरणाचा आदर त्याला आत्मसंस्कार असें म्हणतात. हा सत्त्वशुद्धीचा दशविध प्रकार श्रीकृष्णांनीं सांगितला, १७ हें आत्मशुद्धीचें महासाधन आहे. त्याचें साधकांनीं सेवन करावें म्हणून मीं हें दशलक्षण तुला स्पष्ट करून सांगितलें, १८ आतां ज्यायोगें खवळलेला तमोगुण वाढतो त्या तमोगुणवृद्धीचें लक्षण मी तुला केवळ त्यांचा त्याग करण्यासाठींच सांगतों. १९ तमोगुणाचें जारण मारणादि पाखंडी शास्त्र आहे. त्यांचा मार्ग वेदांच्या विरुद्ध आहे. ते दारू, मोहाची दारू, ताडी व माडी वगैरे अवश्य सेवन करितात. १२० उभयभ्रष्ट पाखंडी, वेषधारी, वृथा मुंडण केलेले ढोंगी व जेथें वेद व वेदरहित कर्में यांस किंमत नाहीं, अशांच्या संगतीची त्यांना फार आवड; २१ द्वेष, जुगार व परस्त्री, अशा ठिकाणी त्यांची निरंतर बैठक; व त्यांच्या या कर्मांचा व्यवहार मध्यरात्रीं चालतो. २२ जारण, मारण, मोहन, स्तंभन, उच्चाटन किंवा वशीकरण हें सर्व तामस कर्म जाणावें. २३ जन्म म्हणजे दीक्षाग्रहण. प्रेत-भूत-पिशाच या विधेनें प्रेत-भूत यांची

प्रेतभूतपिशाचविद्या जाण । करितां प्रेतभूतआराधन । प्रेतजन्म जाण तामसां ॥ २४ ॥ जेथ तमोगुण प्रधान । तो क्रोधयुक्त पुरुष जाण । सदा शत्रूचें करी ध्यान । करावया हनन उद्यतू ॥ २५ ॥ तामसी मंत्र मुकी मैळी । अथवा उच्छिष्टचांडाळी । कां प्रेतदेवता कंकाळी । मंत्रशैली हे तेथें ॥ २६ ॥ संस्कार दगड माती । माझें घर हे माझी क्षिती । स्वप्नीं निजेला घाली भिंती । एवढी आसक्ती गृहाची ॥ २७ ॥ घर करावया अशक्त । तरी तें खिंडेरां अतिस्मरत । सदा दगड माती राखत । नांदतें तेथ येवों नेदी ॥ २८ ॥ देहालागीं गेह करणें घडे । तेही देह कष्टवी अतिदुर्वाडें । तामससंस्कारें रोकडें । केवळ वेडे गृहासक्तीं ॥ २९ ॥ गृहासक्तीचा व्यापारू । जो मरणांत न सोडी नरू । तो जाण तामससंस्कारू । त्याचा संसारू तो माती ॥ १३० ॥ जेणें थोरावे तमोगुण । तें हें जाण दशलक्षण । ऐक राजसाचें चिन्ह । त्याचें भिन्न स्वरूप ॥ ३१ ॥ करावें सत्वाच्या अंगीकारा । त्यागावा तमोगुण दुसरा । पुढें चाविरा मागें लातिरा । ऐक तिसरा रजोगुण ॥ ३२ ॥ हो कां शाहाणी सिंदळी जे नारी । ते पुरुषाचें मन बरें धरी । मग ठकोनि जाय व्यभिचारी । तैसी परी रजोगुणा ॥ ३३ ॥ जैसें कां कुचर घोडें । बरें दिसे परी आडवीं अडे । कांहीं केल्या न चले पुढें । मागिलीकडे सरों लागे ॥ ३४ ॥ तैसी रजोगुणाची स्थिती । त्यागू न संभवे कल्पांतीं । धर्म करितो केवळ स्फीती । मनीं आसक्ती कामाची ॥ ३५ ॥ सर्वस्व घ्यावया संवचोरू । सवें धांवें होऊनि नफरू । तैसा रजोगुणाचा विचारू । कामनासंसारू वाढवी ॥ ३६ ॥ धर्म करी कामासक्ती । केलें भोगवी निश्चितीं । पाडी जन्ममरणआवर्तीं । कदा कल्पांतीं सुटेना ॥ ३७ ॥ सात्विक तरले माझेनि भजनें । तामस तरले मद्विरोधध्यानें । राजसाचें जन्ममरणधरणें । रजोगुणें उठीना ॥ ३८ ॥ जेणें प्रबल वाढ रजोगुणा । त्या सांगेन मी दशलक्षणां । केवळ

आराधना केलीं असतां त्या तामस जनांस प्रेतयोनि प्राप्त होते. २४ ज्याच्या अंगीं तमोगुण अधिक असतो तो पुरुष क्रोधयुक्त होतो. तो निरंतर शत्रूचें ध्यान करीत असतो व त्याचा प्राण घेण्यास तयार होतो. २५ मुकी, मैळी, उच्छिष्ट चांडाळी या देवतांचें किंवा प्रेतदेवता कंकाळी यांना प्रसन्न करण्याचे तामस मंत्र असतात. २६ दगड माती, हें माझें घर, ही माझी जमीन, असे त्याचे संस्कार असतात. तो निजला असतां स्वप्नांतहि घराच्या भिंती बांधित असतो. एवढी त्याची घरावर आसक्ति असते. २७ त्याला घर बांधण्याचें सामर्थ्य नसलें तर गांवाबाहेर बखळींत बसून दगडमाती राखितो. तेथें कोणाला फिरकूं देत नाहीं. २८ ज्या देहासाठीं घर करावयाचें, त्या देहालाच अतिकष्ट देतो. तामस संस्कारामुळें घरावरील आसक्तीचें त्याला वेडच लागलेलें असतें. २९ घराच्या आसक्तीनें होणारा जो व्यवहार तो मरेपर्यंत न सोडणें हा तामस संस्कार आहे, असें जाण. त्याचा संसार मृत्तिकामय आहे. १३० ज्यायोगें तमोगुण प्रबल होतो, तीं हीं दहा लक्षणें समजावीं, राजसगुणांचीं लक्षणें याहून भिन्न आहेत. ३१ सत्त्वगुणाचा स्वीकार करावा. दुसरा जो तमोगुण त्याचा त्याग करावा. आतां पुढें चावरा व मागें लाथाळणारा असा तिसरा रजोगुण ऐक. ३२ हुषार पण चवचाल अशी जी स्त्री असते ती पुरुषाचें मन तत्काल वळविते व मग त्याला फसवून व्यभिचार करिते. तशी रजोगुणाची स्थिति आहे. ३३ एखादें चुकार तट्टू जसें दिसायला मोठें देखणें असतें, पण चालतांना मार्गांत अडते, व कांहीं केल्या पुढें पाऊल टाकीत नाहीं. मागें मागेंच सरत असतें. ३४ त्याप्रमाणें रजोगुणाची अवस्था आहे. कल्पांतींहि त्याच्याकडून त्याग घडत नाहीं व केवळ दंभानें तो धर्म करीत असतो. मनांत तर कामाची आसक्ति असते. ३५ सोबतीला असलेला चोर जसा सर्वस्व लुटून नेण्याच्या इच्छेनें एखाद्या सेवकासारखा पुढें-पुढें नाचत जसा असतो, त्याप्रमाणें रजोगुण कामनारूपी संसार वाढवितो. ३६ तो कामासक्तीनेंच धर्म करितो व त्या कर्माचें फल त्याला निश्चयानें भोगावें लागतें. याप्रमाणें तो जन्म-मरणाच्या भोंवऱ्यांत सांपडतो. त्यांतून तो कल्पांतींहि बाहेर पडत नाहीं. ३७ सात्त्विक जन माझ्या भजनानें तरले. तामस माझी विरोधीभक्ति करून तरले. परंतु रजोगुणामुळें राजसाचें जन्म-मरणाचें धरणें कांहीं उठत नाहीं. ३८ ज्यायोगें रजोगुणाची वाढ

त्यागावया। काम्यकल्पना या निरूपणा अवधारी॥ ३९॥ राजसाचें प्रवृत्तिशास्त्र। जें केवळ कामनापर। जेणें होय इहामुत्र। तेथें अत्यादर राजसा॥ १४०॥ आप म्हणिजे तें तंव जळ। वेळा वाळा सुपरिमळ। कर्पूरयुक्त अतिशीतळ। प्रिय प्रबळ तें राजसा॥ ४१॥ प्रजासंगती त्याची ऐक। राजवर्गी सभानायक। व्यवहारीं चतुर अतिरंजक। प्रवृत्ति लोकप्रिय त्यासी॥ ४२॥ राजद्वारीं कां सभेमाझारीं। बैसावें पारीं अथवा वेव्हारीं। कां मंडपतोरणाभीतरीं। सन्मानें करीं उपविष्ट॥ ४३॥ वेळु न गमे जैं घरिंच्याघरीं। तैं क्रमी चौहाटा नगरीं। कां बैसे बुद्धिबळांवरी। अत्यादरीं सादर॥ ४४॥ ऐक रजोगुणाची वेळ। सूर्योदयाउपरि जो काळ। कां राजस जे सांजवेळ। ते ते काळ प्रिय त्यांसी॥ ४५॥ राजसांचें सकाम कर्म। धनधान्यार्थ करिती धर्म। वासना ते पशुपुत्रकाम। स्वप्नीं निष्काम नेणती॥ ४६॥ राजसांसी काम गहन। कामासक्ती दीक्षाग्रहण। तेंचि त्यांचें जन्म जाण। सदा ध्यान स्त्रियेचें॥ ४७॥ मंत्र घ्यावा अभिलाखें। जेणें सन्मान होय लौकिकें। ज्याचा सुगरावा थोर देखे। तो मंत्र आवश्यकें आदरी॥ ४८॥ संस्कार अतिराजस। शरीरभोगांचे विलास। नाना परिमळ बहुवस। उत्तम वास सुधूत॥ ४९॥ संस्काराची अंतरानिष्ठा। लौकिकीं व्हावी देहप्रतिष्ठा। माझी आज्ञा वंद्य वरिष्ठां। सभेचे चौहटां मी पूज्य॥ १५०॥ रजोगुण दशलक्षण। उद्धवा त्याची ही वोळखण। राजसासी जन्ममरण। सर्वथा जाण सोडीना॥ ५१॥ सात्विक त्याग करी विवेकनिष्ठें। तामस त्याग करी कडकडाटें। राजसासी त्याग न घडे स्पष्टें। द्रव्यदारालोभिष्टें लोभाळू॥ ५२॥ तीहीं गुणांचें लक्षण। म्यां सांगीतलें भिन्नभिन्न। तिहींचें सर्वसाधारण। सांगेन चिन्ह तें ऐक॥ ५३॥

प्रबळ होते, तीं दहा लक्षणें काम्यकल्पनेचा त्याग करण्यासाठीं मी सांगतों, तीं ऐक. ३९ राजसाचें प्रवृत्तिशास्त्र केवल कामनापर आहे. ज्यायोगें इहलोकीं व परलोकीं सुख प्राप्त होईल, त्याविषयीं राजस जनांस अति आदर असतो. १४० आप म्ह० केवळ पाणी. त्याला वेलदोडा, वाळा इत्यादि सुगंध लावून कापुरानें युक्त व अतिशय थंडगार केलें कीं, तें राजसांना फार प्रिय वाटतें. ४१ त्यांस कोणाची संगति आवडते, तें ऐक. राजासारखे दरबारी लोक, व्यवहारचतुर, व लोकरंजन करणारे यांचा सहवास त्यांना आवडतो. ४२ दरबारांत किंवा सभागृहांत, पारावर किंवा चावडीवर, मंडप, तोरणें, वेशी यांवर ते मोठ्या सन्मानानें बसतात. ४३ घरीं बसून वेळ जाईनासा झाला कीं, गांवाच्या चव्हाट्यावर जाऊन बसतात. किंवा मोठ्या आवडीनें बुद्धिबळाचा डाव मांडितात. ४४ आतां रजोगुणाची वेळ ऐक. सूर्योदयानंतरचा जो राजस काळ तो संध्याकाळ म्हणून त्यांना प्रिय असतो. ४५ राजस लोकांचें सकाम कर्म असतें. ते धन-धान्यादिकांच्या प्राप्तीसाठीं धर्म करितात. त्यांची पशु-पुत्र इत्यादिकांवर आसक्ति असते. निष्कामपणा त्यांना स्वप्नांतहि ठाऊक नसतो. ४६ राजसांची इच्छा फार प्रबळ असते. कामासक्तीनेंच ते मंत्रोपदेश वगैरे दीक्षा घेतात. तोच त्यांचा जन्म, असें तूं जाण. निरंतर त्यांस स्त्रीचा ध्यास असतो. ४७ ते मनांत कांहीं तरी अभिलाष ठेवूनच मंत्रग्रहण करितात. ज्यायोगें लौकिकांत सन्मान होईल, प्रतिष्ठा वाढेल, लोक आपल्याला वश होतील, त्याच मंत्राचा ते अवश्य आदर करितात. ४८ त्यांचे सर्व संस्कार अतिशय राजस असतात. त्यांत सर्व शरीरभोगाचे विलास असतात. नानाप्रकारचीं सुगंधीं द्रव्यें, स्वच्छ धुवट वस्त्रें याचेंच विचार त्यांच्या मनांत घोळत असतात. ४९ त्या संस्कारामध्यें लौकिकांत माझी प्रतिष्ठा व्हावी, थोरा-मोठ्यांनीं माझी आज्ञा वंद्य मानावी. सभेंत माझा बहुमान व्हावा', अशी त्यांची उत्कट इच्छा असते. १५० हे उद्धवा! रजोगुणाच्या दहा लक्षणांचेंच हें स्वरूप आहे. राजसांना जन्म-मरण कधींच सुटत नाहीं. ५१ त्याची ही खूण आहे. सात्विक विवेकनिष्ठ होऊन त्याग करितो. तामस आरडा-ओरड करून त्याग करितो. परंतु राजस द्रव्य व स्त्री यांच्या लोभानें कधींच त्याग करीत नाहीं. ५२ या तीन गुणांचें भिन्न भिन्न लक्षण मीं तुला सांगितलें आतां तीन्हींचें सर्वसाधारण लक्षण सांगतों, ते ऐक. १५३.

तत्तत्सात्त्विकमेवैषां यद्यद्वृद्धाः प्रचक्षते । निन्दन्ति तामसं यत्तद्राजसं तदुपेक्षितम् ॥ ५ ॥

विवेकवृद्ध वृद्धाचारें । ज्यातें स्तविती अत्यादरें । तें तें सात्विक जाण खरें । निजनिर्धारें निश्चित ॥ ५४ ॥ विवेकियाचे अनुवादा । ज्या पदार्थांची करिती निंदा । ते ते जाण तामसबाधा । माझ्या निजबोधा मानलें ॥ ५५ ॥ ज्यातें स्तवित ना निंदित । जीवें भावें उपेक्षित । तें राजस जाण निश्चित । बाधा अद्‌भुत तयाची ॥ ५६ ॥ जैसें कां विखें रांधिलें अन्न । वरिवरी गोड अंतरीं मरण । तैसा जाण राजस गुण । अतर्क्य बंधन तयाचें ॥ ५७ ॥ राजसासी ज्ञानबोधू । करितां थोंटावला वेदू । त्याचे उपदेशीं ब्रह्मा मंदू । माझेनिही बोधू न करवे ॥ ५८ ॥ याचिलागीं रजोगुण । विवेकीं सांडिला उपेक्षून । उपेक्षेचें हेंच कारण । तुज म्यां जाण सांगीतलें ॥ ५९ ॥ यालागीं सात्विक सेवन । साधकीं अवश्य करावें जाण । सात्विकसेवनाचा गुण । तुज मी संपूर्ण सांगेन ॥ १६० ॥

सात्त्विकान्येव सेवेत पुमान् सत्त्वविवृद्धये । ततो धर्मस्ततो ज्ञानं यावत्स्मृतिरपोहनम् ॥ ६ ॥

---यांतील सात्त्विकादिकांचा निर्णय सांगतात----

एषां यत् यत् वृद्धाः प्रचक्षते तत् तत् एव सात्त्विकं–यांतील ज्याची ज्याची शास्त्रज्ञ प्रशंसा करितात, तें तेंच सात्त्विक, यत निन्दति तत् तामसं–ज्याची निंदा करितात ते तामस व, यत् उपेक्षितं तत् राजसं-ज्याची उपेक्षा करितात तें राजस. ५.

विवेकानें वृद्ध व आचारानें श्रेष्ठ असलेले लोक ज्याची अतिशय आदरानें स्तुति करितात, तें तें सर्व खरें सात्त्विक आहे, असें तूं खात्रीनें समज. ५४ विवेकी लोकांच्या कथा-वार्तांमध्यें ज्या ज्या वस्तूंची निंदा केलेली असते ती सर्व तामस बाधा आहे, असें जाण व तें मलाहि मान्य आहे. ५५ ज्याची स्तुतीहि करीत नाहींत, किंवा निंदाहि करीत नाहीं, तर जीवा-भावानें केवळ उपेक्षा करितात तें निश्चयानें राजस समज. त्याची बाधा विलक्षण असते. ५६ ज्याप्रमाणें विष मिसळलेलें अन्न शिजविलें असतां तें वरून गोड लागतें, पण त्याच्या पोटांत मूर्तिमंत मरण भरलेलें असतें, त्याप्रमाणें हा राजस गुण आहे. त्याचें बंधन अतर्क्य आहे. ५७ राजस लोकांना ज्ञानाचा बोध करितांना वेदहि कुंठित झाला. त्यांना उपदेश करितांना ब्रह्मदेवहि 'माझ्याच्यानें त्यांना बोध करवत नाहीं' असें म्हणून थकला. ५८ याच कारणानें विचारी जनांनीं रजोगुणाची उपेक्षा करून त्याला सोडून दिलें. उपेक्षेचें हें कारण तुला मीं सांगितलें. ५९ यास्तव साधकानें सात्त्विक सेवन अवश्य करावें. सात्त्विकसेवनांतील गुण तुला मी आता सविस्तर सांगतों. १६०.

पुमान् सत्त्वविवृद्धये सात्त्विकानि एव सेवेत–पुरुषानें सत्त्ववृद्धीसाठीं सात्त्विक हेतूंचेंच सेवन करावें. (म्ह० उपनिषदादि निवृत्त शास्त्रांचेंच सेवन करावें. प्रवृत्तिशास्त्र म्ह० कर्मकांड व जैन बौद्ध इत्यादिकांचीं पाखंडशास्त्रें यांचें सेवन करूं नये. तीर्थजलाचेंच सेवन करावें. कृत्रिम सुवासिक जल, मद्य इत्यादिकांचें सेवन करूं नये. प्रजा म्ह० पुत्र किंवा लोक त्यांतील निवृत्तमार्गीयांचेंच सेवन करावें. प्रवृत्तमार्गी व दुराचरणी यांचें सेवन करूं नये. एकान्त देशाचें सेवन करावें. राजमार्ग, जुगारीचे अड्डे, नाटकें व तमाशे इत्यादि प्रदेशांचें सेवन करूं नये. ध्यानासाठीं ब्राह्ममुहूर्त, म्ह० रात्रीचा शेवटचा प्रहर, प्रातःकाळ इत्यादिकांचें सेवन करावें. प्रदोष काल, म्ह० रात्रीचा पहिला प्रहर इत्यादि राजस व तामस कालांचें सेवन करू नये. नित्यकर्मांचें सेवन करावें, काम्य व जारण-मारण इत्यादि निषिद्धकर्मांचें सेवन करू नये. वैष्णव, शैव इत्यादि संप्रदायाची दीक्षा घेणें, हा जन्म; शाक्तादिक क्षुद्र दीक्षारूप जन्म नव्हे; श्रीविष्णूचें ध्यान; कामिनी शत्रु यांचें ध्यान नव्हे. प्रणवादि हा मंत्र; काम्यादिक क्षुद्र मंत्र नव्हे, चित्तशोधक संस्कार; केवल देह, गृह इत्यादिकांचे संस्कार नव्हे, या दहा सात्त्विक गुणहेतूंचें सत्त्ववृद्धीसाठीं सेवन करावें.) ततः धर्मः ततः ज्ञानं–सत्त्ववृद्धि झाल्यानें धर्म व धर्मापासून ज्ञान होतें. (अहोपण, महावाक्य श्रवणापासूनच ज्ञान होतें. त्यासाठीं सत्त्ववृद्धि व धर्म यांची काय आवश्यकता आहे ! उत्तर–) यावत् स्मृतिः अपोहनं–जोंवर आत्म्याचें अपरोक्ष ज्ञान होईं व जोंवर स्थूल सूक्ष्म देह व त्यांचे कारणभूत गुण यांचें निरसन होईं तोंपर्यंत ज्ञान होतें. (असा याचा भावार्थ.) ६.

सात्विक द्रव्यें सेवितां । सत्ववृद्धी होय तत्त्वतां । सत्ववृद्धी पुरुषीं होतां । धर्म स्वभावतां प्रवर्ते ।। ६१ ।। धर्मप्रवृत्ति माझें भजन । माझ्या भक्तिउल्हासें जाण । भक्तांसी मी होयें प्रसन्न । तैं स्वभावें ज्ञान प्रकाशे ।। ६२ ।। तत्त्वमस्यादि वाक्यव्युत्पत्ती । ते गुरुद्वारा ज्ञानाची प्राप्ती । तरी सत्वशुद्धित्वें धर्मभक्ती । कोणे अर्थीं सेवावी ।। ६३ ।। ऐसा विकल्प जरी तूं धरिसी । उद्धवा ऐक त्याही विचारासी । यथार्थ सांगेन तुजपाशीं । सत्वशुद्धीसी उपयोगू ।। ६४ ।। केवळ सत्वशुद्धीविण । जाहल्या गुरुवाक्याचें श्रवण । तें पां हाटगाण्याऐसें जाण । अनोळखपण स्वस्वरूपा ।। ६५ ।। आंधळें उपजलें जे कुशीं । स्तनपान करी अहर्निशीं । परी तें न देखे माउलीसी । दशा तैशी उपदेशा ।। ६६ ।। इंद्रियें सचेतनमेळीं । भगवंत सर्वांते प्रतिपाळी । त्यातें न देखती विषयांधळीं । अतिअंध झालीं चित्तशुद्धीविण ।। ६७ ।। अजागळां लोंबते जाण । मिथ्या भाषण म्हणती ते स्तन । त्यापरी सत्वशुद्धीविण । वृथा जाण उपदेश ।। ६८ ।। वाहते उदकीं लिहिले लेख । तळीं अक्षर नुमटे एक । तेवीं सत्वशुद्धीविण देख । निजज्ञान सुटंक प्रकटेना ।। ६९ ।। झाल्या आपादतां सत्वशुद्धी । जंव प्रकटेना धर्मबुद्धी । तंव निजज्ञानाची नव्हे सिद्धी । जेवीं ग्रहणामधीं चंद्रमा ।। १७० ।। ऐकतां हरिकथाश्रवण । बाष्प रोमांच स्वेद रुदन । रुका वेंचितां जाय प्राण । तेथेंही ब्रह्मज्ञान प्रकटेना ।। ७१ ।। हृदयींचा लोभ जंव न तुटे । तंव निश्चयज्ञान कैंचें भेटे । सत्वशुद्धिधर्मू जैं प्रकटे । तैं निजज्ञानवेटें सुपंथीं लागे ।। ७२ ।। ते चालतां धर्मपंथीं । जैं माझी भक्ति होय सांगाती । तैं चोरांची न पडे गुंती । शीघ्रगती मज पावे ।। ७३ ।। ते भक्तीचा सांडितां सांगातू । पुढील अनोळख महापंथू । तेथ कामक्रोध करिती घातू । विकल्पआवर्तू बुडविती ।। ७४ ।। भाग्येंवीण माझी भक्ती ।

सात्विक द्रव्यांचें सेवन केलें असतां खरोखर सत्त्वगुणाची वृद्धि होते व पुरुषांमध्यें सत्त्वगुण वाढला कीं, त्याची स्वभावतःच धर्माकडे प्रवृत्ति होते. ६१ आणि धर्मप्रवृत्ति हेंच माझें भजन आहे. माझ्या भक्तीच्या उल्हासानें मी भक्तांवर प्रसन्न होतों त्यावेळीं सहज ज्ञान प्रकट होतें. ६२ 'तत्त्वमसि०' इत्यादि वचनांचा अर्थ गुरूच्या द्वारां समजून घेतला असतां ज्ञानप्राप्ति होते. तर मग सत्त्वशुद्धीसाठीं धर्मभक्ति कां सेवावी ! ६३ असा विकल्प जर तुझ्या मनांत येईल तर, हे उद्धवा ! त्याविषयीं देखील सत्त्वशुद्धीचा यथार्थ उपयोग मी तुला सांगतों. ६४ चित्तशुद्धि झाल्यावांचून केवळ गुरुवाक्य ऐकणें, म्हणजे तें बाजारांतील गाणें ऐकण्यासारखेंच होय. त्यानें आत्मस्वरूप जाणतां येत नाहीं. ६५ जन्मांध मूल आईच्या कुशींत शिरून जरी सारखें स्तनपान करीत असलें तरी त्याला आपली माता जशी पहातां येत नाहीं, त्याप्रमाणें चित्तशुद्धीवांचून घेतलेल्या गुरूपदेशाची स्थिति होते. ६६ इंद्रियसमूहांत जिवंतपणा ठेवून भगवानच सर्वांचा सांभाळ करीत असतो. परंतु विषयांध लोक त्याला पहात नाहींत. ते चित्तशुद्धीवांचून अत्यंत आंधळे झालेले असतात. ६७ शेळीच्या गळ्यांत लोंबकळणाऱ्या ग्रंथीला 'स्तन' हें खोटेंच नांव असतें; त्याप्रमाणें चित्तशुद्धीवांचून उपदेश व्यर्थ आहे असें जाण. ६८ वहात्या पाण्यावर अक्षरें लिहिलीं तर त्यांतील एकहि अक्षर जसें बुडावर उमटत नाहीं, त्याप्रमाणें चित्तशुद्धीवांचून खरें आमज्ञान प्रकट होत नाहीं. ६९ ज्याप्रमाणें ग्रहण लागल्यावर चंद्र दिसत नाहीं, त्याप्रमाणें चित्तशुद्धि होऊन जोंवर धर्मबुद्धि प्रकट झाली नाहीं, तोंवर आत्मज्ञान प्राप्त होत नाहीं. १७० किंवा हरिकीर्तन ऐकत असतां अंगावर रोमांच उभे रहातात, डोळ्यांत अश्रु येतात, कंठ दाटून येतो, रडूं कोसळतें, पण एक पैसा खर्च करण्याची वेळ आली म्हणजे मात्र त्यांचा प्राणच जायला होतो. अशा ठिकाणींहि ब्रह्मज्ञान प्रकट होत नाहीं. ७१ जोंपर्यंत अंतःकरणांतील लोभ गेला नाहीं, तोंपर्यंत निश्चित ज्ञानाचीहि भेट होत नाहीं. चित्तशुद्धीनें जेव्हां धर्म प्रकट होतो तेव्हांच आत्मज्ञानाचा सरळ मार्ग सांपडतो. ७२ ते धर्ममार्गानें जाऊं लागले कीं, माझी भक्ति त्यांना सोबत करिते. चोर त्यांना वाटेंत अडवूं शकत नाहींत. त्यामुळें ते शीघ्रगतीनें येऊन मला मिळतात. ७३ पण त्या भक्तीची संगत जर कां सोडिली तर पुढला बिकट मार्ग सांपडत नाहीं. वाटेंत काम-क्रोधादि घात करितात व विकल्परूपी भोंवऱ्यांत बुडवितात. ७४ थोर भाग्य असल्यावांचून माझी भक्ति केव्हांहि सोबतीला

प्राण्यासी नव्हे गा सांगाती । जिचे संगें चालतां पंथीं । अल्पही गुंती पडेना ।। ७५ ।। माझे भक्तीसवें महाशूर । नावाणिगे नवविध वीर । सन्नद्धबद्ध सदा समोर । महाझुंझार निजबोधें ।। ७६ ।। यालागीं माझे भक्तीविण । सहस्रधा केल्या श्रवण मनन । माझी प्राप्ती नव्हे जाण । भजनें पूर्ण मत्प्राप्ती ।। ७७।। सर्व भूतीं भगवद्भावो । या नांव मुख्यभक्ति पहा वो । ते सांगाती झालिया स्वयमेवो । कामक्रोधमोहो न शकती बाधूं ।। ७८ ।। साक्षेपें नेऊनि घागरी । पालथी घातल्या गंगासागरीं । जळबिंदू रिघेना भीतरीं । तैशी परी महावाक्या ।। ७९ ।। यालागीं अत्यादरेंसीं जाण । धर्मयुक्त माझें भजन । करितां मी होय प्रसन्न । मत्प्रसादें ज्ञान प्रकाशे ।। १८० ।। लोभ ठेऊनि अर्थस्वार्थीं । कोरडी करितां माझी भक्ती । मी प्रसन्न नव्हें श्रीपती । जाण निश्चितीं उद्धवा ।। ८१ ।। जो धनें मनें काया वचनें । वेंचूनि भजे मजकारणें । त्यासीच म्यां प्रसन्न होणें । जेवीं चंद्रकिरणें चकोरां ।। ८२ ।। व्याली धेनु वत्सा वोरसे । तेवीं मी तुष्टें अतिसंतोषें । तेणें माझेनि प्रसादवशें । माझें ज्ञान प्रकाशे मद्भक्तां ।। ८३ ।। सगुण सुंदर आणि पतिव्रता । अतिशयें पढियंती होय कांता । तिसी सर्वस्व दे न मागतां भर्ता । तेवीं मी मद्भक्तां प्रसन्न ।। ८४ ।। माझेनि प्रसादें प्रकाशे ज्ञान। 'स्मृति' तीतें म्हणणें जाण । सविलास अविद्यानिरसन। 'अपोहन' या नांव ।। ८५ ।। गुणास्तव देह जाण । देहास्तव उपजे ज्ञान । तेणें ज्ञानें गुणनिर्दळण । देहनिरसन न घडे म्हणसी ।। ८६ ।। हे गोष्टी तूं म्हणसी कुडी । कीं पक्षी आपुलें पांख मोडी । नारळ नारळीतें तोडी । स्वमांसाची गोडी व्याघ्र चाखे ।। ८७ ।। हें न घडतें जैं घडों बैसे । तैं देहींचेनि ज्ञानें गुणदेह नासे । हा विकल्पू धरिसी मानसें । ऐक अनायासें तो निरासू ।। ८८ ।।

मिळत नाहीं, बरें ! तिच्या संगतीनें चाललें असतां यत्किंचित्‌हि अडथळा येत नाहीं. ७५ माझ्या भक्तीबरोबर मोठे नांवाजलेले नऊ प्रकारचे वीर कंबर बांधून सर्वदा आत्मबोधानें सज्ज असतात. ७६ यास्तव माझ्या भक्तीवांचून हजारों प्रकारें जरी श्रवण, मनन केलें तरी माझी प्राप्ति होत नाहीं. केवळ भजनानें माझी पूर्णप्राप्ति होते. ७७ सर्व प्राण्यांमध्यें भगवद्भाव ठेवणें यालाच मुख्य भक्ति म्हणतात. पहा ! तीच भक्ति बरोबर असली कीं, मग काम-क्रोध-मोह मुळींच बाधूं शकत नाहींत. ७८ घागर नेऊन गंगेंत किंवा समुद्रांत मोठ्या आवेशानें पालथी घातली, तर त्यांत पाण्याचा एक थेंबहि जसा शिरत नाहीं, त्याप्रमाणें महावाक्याची स्थिति होते. ७९ यास्तव अतिशय आदरानें माझें धर्मयुक्त भजन केलें असतां मी प्रसन्न होतों व माझ्या प्रसन्नतेनें ज्ञान प्रकट होतें. १८० धनावर किंवा स्वार्थावर दृष्टि ठेवून माझी कोरडी भक्ति केली असतां मी प्रसन्न होत नाहीं, हें तूं निश्चयानें जाण. ८१ उद्धवा ! जो धन, मन, काया व वाचा माझ्यासाठीं झिजवितो, त्यांवरच मी चकोरावर चंद्रकिरण जसे प्रसन्न होतात तसा प्रसन्न होतों. ८२ गाय व्याल्याबरोबर आपल्या वासराला जशी प्रेमानें दूध सोडिते, तसा मी संतुष्ट होऊन प्रसन्न होतों व माझ्या प्रसादानें माझ्या भक्तांना माझें ज्ञान होतें. ८३ गुणवती, रूपवती, पतिव्रता व अतिशय लाडकी अशा स्त्रीला पति जसा न मागतां सर्वस्व देतो, त्याप्रमाणें मी माझ्या भक्तांवर प्रसन्न होतों. ८४ माझ्या प्रसादानें ज्ञान प्रकाशतें. त्यालाच स्मृति असें म्हणतात. मोहासह अविद्यानिरसन याला 'अपोहन' असें म्हणतात. ८५ गुणामुळें देह होतो. देहामुळें ज्ञान उत्पन्न होतें; पण त्या ज्ञानानें गुणांचा नाश होऊन देहनिरास घडत नाहीं. ८६ असें जर म्हणशील तर ही गोष्ट खोटी आहे. ज्याप्रमाणें पक्ष्यानें आपलेच पंख उपटून टाकावे, किंवा नारळानें माडालाच तोडावें किंवा वाघानें स्वतःच्या अंगांतील मांसाची गोडी चाखावी, ८७ या कधीं न घडणाऱ्या विपरीत गोष्टी जशा घडत नाहींत, त्याप्रमाणें देहांतील ज्ञानानें गुणांचा व देहाचा नाश होत नाहीं. असा विकल्प जर तुझ्या मनांत येत असेल तर त्याचें अनायासानें निरसन ऐक. १८८.

वेणुसंघर्षजो वह्निर्दग्ध्वा शाम्यति तद्वनम् । एवं गुणव्यत्ययजो देहः शाम्यति तत्क्रियः ॥ ७ ॥

दैवें वायूच्या कल्लोळीं । परस्परें वेळूजाळी । स्वजातिकांचणी इंगळी । पेटली हे होळी वनाची करी ॥ ८९ ॥ अग्नि उपजला जे कांडीं । तेंही कांडें जाळूनि सांडी । वनीं नुरवूनियां काडी । स्वयें राखोंडी होऊनि विझे ॥ १९० ॥ तेवीं वैराग्याभ्यासवायूंनीं । होतां त्रिगुणांची कांचणी । तेथें प्रकटला ज्ञानाग्नी । अविद्यावनीं दाहकू ॥ ९१ ॥ तो हरिगुरुकृपा खवळला । वृत्तिरूपें प्रज्वळला । देह द्वयेंसीं लागला । प्रवर्तला गुणांतें जाळूं ॥ ९२ ॥ जळाल्या आशातृष्णेच्या पाळी । जळालीं कामलोभांची कोल्हीं । क्रोधव्याघ्राची होळी झाली । आगी लागली मदगजा ॥ ९३ ॥ जाळिली स्नेहाची आरांटी । जाळिली असत्याची बोरांटी । जाळिला मोहअजगरू उठाउठी । जाळिला शेवटीं काळविट काळू ॥ ९४ ॥ उठिला अहंकाराचा सोरू । धरितां न धरे अनिवारू । तोही जाळिला दुर्धरू । वणवा चौफेरू कोंडला ॥ ९५ ॥ पळूनि जावया पुरता । अणुभरी ठावो नुरेचि रिता । एवं जळाला तो पळतपळतां । अहंसोरु सर्वथा निमाला ॥ ९६ ॥ नवल अग्नीचें विंदाण । आपणिया जाळी आपण । दाहकशक्तीतें जाळून । स्वस्वरूपीं जाण उपरमे ॥ ९७ ॥ ऐसें ऐकोनि निरूपण । उद्धवासी विस्मयो गहन । जनास केवढी नागवण । आपणिया आपण बोढवली ॥ ९८ ॥ नश्वरदेहाचिये साठीं । पाविजे परब्रह्माची पुष्टी । ते सांडूनियां करंटीं । विषयनिष्ठीं मरमरों मरती ॥ ९९ ॥ सात्विक सेवनें सत्ववृद्धी । तेणें

—'अहोपण, गुणसंबंधानें उत्पन्न झालेला हा देह, आपल्या आश्रयभूत गुणांचा त्यापासूनच उत्पन्न झालेल्या विद्येनें निरास करून स्वतःहि शांत कसा होईल'! उत्तर—

वेणुसंगर्षजः वह्निः तत् वनं दग्ध्वा शाम्यति—वेळूंच्या परस्पर संघर्षणामुळें म्ह० वेळूच्या बेटांतील प्रत्येक वासा वाऱ्यामुळें एकमेकावर घासून त्यापासून उत्पन्न झालेला अग्नि जसा स्वतःच उत्पन्न झालेल्या ज्वालांनीं तें सर्व वन जाळून शेवटीं आपोआप शांत होतो, एवं गुणव्यत्ययजः देहः तत्क्रियः श्याम्यति—त्याप्रमाणें गुणांच्या विकारापासून उत्पन्न झालेला देह अग्नीप्रमाणेंच व्यापार करून शांत होतो. ७.

दैवयोगानें वाऱ्याच्या सोसाट्यानें वेळू एकमेकांस जाळितात. एकमेकांवर घांसून त्यांतून उत्पन्न झालेली बारीकशी ठिणगी पेटून सगळ्या वनाला जाळून भस्म करिते. ८९ त्याच्या ज्या कांड्यांत अग्नि उत्पन्न होतो, तें कांडेंहि तो जाळून टाकितो. त्या वनांत गवताची एक काडीहि शिल्लक ठेवीत नाहीं व शेवटीं स्वतः राखुंडी होऊन विझतो. १९० त्याप्रमाणें वैराग्य व अभ्यासरूपी वायूनें त्रिगुणांचा फडशा उडतो. तेथें ज्ञानाग्नि प्रकट झाला कीं, तो सगळ्या अविद्यारूपी वनाला जाळून टाकितो. ९१ तो हरिरूपी गुरुकृपेनें खवळतो, वृत्तिरूपानें प्रज्वलित होतो व स्थूल-सूक्ष्म देहाला लागून तीन्ही गुणांना जाळण्यास प्रवृत्त होतो. ९२ आशा-तृष्णेचे समूह जळून जातात. काम-लोभरूपी कोल्हीं भस्म होतात. क्रोधरूपी वाघांची होळी होते. मदरूपी हत्तीला आग लागते. ९३ स्नेहरूपी सराटे, असत्यरूपी बोरीचे कांटे, मोहरूपी अजगर या सर्वांस तत्काल जाळून शेवटीं काळरूपी काळविटाला जाळून टाकितो. ९४ अहंकाररुपी वराह एकदा जागृत झाला कीं कोणालाहि धरितां येत नाहीं, इतका तो अनिवार होतो. अशा त्या दुर्धर अहंकाररूपी वराहाला तो जाळून टाकितो. चोहोंकडून वणव्यांत कोंडल्यामुळें याला ९५ पळून जाण्यास रेसभरहि जागा सांपडत नाहीं. याप्रमाणें तो अहंकाररूपी रानडुक्कर पळतां पळतां होरपळून भस्म होऊन जातो. ९६ अग्नीची करणी कशी विलक्षण आहे पहा! आपणच आपल्याला जाळितो, दाहक शक्तीला जाळितो व आपल्या स्वरूपांतच लीन होतो. ९७ असें निरूपण ऐकून उद्धवाला मोठें आश्चर्य वाटलें. (तो मनांत म्हणाला कीं) लोक आपणच आपला नाश कसा करीत असतात पहा! ९८ या नाशिवंत देहाच्या योगानें परब्रह्माची पुष्टि मिळते, पण ती मिळविण्याचें सोडून हे मंदमति लोक विषयासक्त होऊन त्यांच्या प्राप्तीसाठीं मर मर, मरत असतात. ९९ सात्त्विकसेवनानें सत्त्ववृद्धि होते व त्यायोगें दुर्लभ सिद्धि प्राप्त होतात. त्या टाकून हे मूर्खलोक

अलभ्य लाभे सिद्धी । ते सांडोनियां दुर्बुद्धी । विषयविधीं रातले ॥ २०० ॥ केवढा नाडू मांडला लोकां । ऐशी जीवींची आशंका । यालागीं यदुनायका । आदरें देखा पुसत ॥ १ ॥

उ० उ०—विदन्ति मर्त्याः प्रायेण विषयान्पदमापदाम् । तथापि भुंजते कृष्ण तत्कथं श्वखराजवत् ॥ ८ ॥

उद्धव म्हणे श्रीमुकुंदा । ऐक सर्वज्ञा गोविंदा । विषयांची पदोपदीं आपदा । सर्वां सर्वदा कळलीसे ॥ २ ॥ जो झाला विषयाधीन । तो सर्वां सर्वत्र सदा दीन । ऐसें जाणतजाणतां जन । आसक्ती गहन विषयांची ॥ ३ ॥ जैसें कां श्वान आणि खर अज । तैसे विषयांसी लोक निर्लज्ज । सांडूनि स्वहिताचें काज । कां विषयांचे भोज नाचती ॥ ४ ॥ शुनी वसवसोनि पाठीं लागे । श्वान सवेंच लागे मागें । पुच्छ हालवूनि हुंगे । लाज नेघे जनाची ॥ ५ ॥ काणा कुंटा व्याधिव्याप्त । चीपकांठकरा गळां वाहत । तोहि शुनीमागें धांवत । कामासक्त अविचार ॥ ६ ॥ शुनी सक्रोधें वसवसी । तें गोड लागे श्वानासी । जीवित बांधलें तिच्या पुंसीं । तीमागमागेंसीं हिंडतू ॥ ७ ॥ अंगीं अंगा होतां भेटी । सक्रोध शुनी लागे पाठीं । तरी न सोडी पुसांटी । कुंकांत उठी कामासी ॥ ८ ॥ ऐशा संकटीं जैं भोगू चढे । तैं भोगासवेंचि अडकोनी पडे । हड हड करिती चहूंकडे । जगापुढें फजीती ॥ ९ ॥ निंदेचें सैंघ वाजती धोंडे । मूर्ख तेही थुंकिती तोंडें । ऐसेंचि पुरुषासही घडे । तरीही आवडे अतिकामू ॥ २१० ॥ श्वानाचें हेंड तत्काळ सुटे । मनुष्याचें आकल्प न सुटे । स्त्रीलोभाळू अतिलोभिष्ठें । तीलागीं संकटें नाना सोशी ॥ ११ ॥ नातरी गाढवाच्या परी । दूरी देखोनियां खरी ।

विषयविधींतच रमतात. २०० हा लोकांनीं केवढा अनर्थ मांडला आहे ! मनांत अशी आशंका आली असतां उद्धव मोठ्या आदरानें यदुश्रेष्ठ श्रीकृष्णास विचारीत आहे. २०१.

—'अहोपण, इंद्रियांचें नियमन करून सात्त्विक गुणहेतूंचेंच सेवन केल्यानें एवढा मोठा पुरुषार्थ जरी साधत असला तरी राजसादि विषय दुःखरूप आहेत, असें जाणणारेहि त्यांचें सेवन कसें करितात' ! असें उद्धव विचारितो—

उद्धवः उवाच—उद्धव म्हणाला—मर्त्याः प्रायेण विषयान् आपदां पदं विदन्ति—विषय संकटांचें स्थान आहेत असें मनुष्य प्रायः जाणतात. तथापि कृष्ण—तथापि हे कृष्णा, श्वखराजवत् कथं भुंजते—ते श्वान, खर व अज यांप्रमाणें त्यांचा भोग कसा घेतात ! [कुत्रा कुत्रीकडून वसूदिशी अंगावर येऊन चावला जात असला तरी, गाढव गाढवीकडून दुगाण्यांनीं ताडण केला जात असला तरी, बकरा खाटिकाकडून मारण्यासाठीं नेला जात असला तरी विषयासक्त होतो हें प्रसिद्ध आहे.] ८.

उद्धव म्हणाला, हे श्रीमुकुंदा, सर्वज्ञ गोविंदा ! विषयांचें संकट पावलो-पावलीं कसें येतें हें सर्वांना कळलें आहे. २ जो विषयाधीन झाला तो सर्वदा, सर्वांपाशीं, सर्व ठिकाणीं दीनच असतो, असें लोक जाणत असूनहि त्यांना विषयांची भयंकर आसक्ति असते. ३ कुत्रा, गाढव व बोकड यांप्रमाणें विषयांसाठीं लोक निर्लज्ज बनतात. आपल्या हिताचें कर्म टाकून विषयाचें सोंग घेऊन नाचतात. ४ कुत्री भुंकून भुंकून जरी गुरगुरत असलीं तरी कुत्रा तिच्या मागेंमागें जातो व शेपटी हलवून हुंगत असतो. लोकांची मुळींच लाज धरीत नाहीं. ५ आंधळा, दूत भरलेला, रोगग्रस्त, गळ्यांत फुटक्या मडक्याचा कांठ अडकलेला असा कुत्राहि कुत्रीच्या मागें धांवत जातो. असा तो कामासक्त अविचारी बनतो. ६ कुत्री रागानें अंगावर येत असते. पण तें कुत्र्याला मोठें गोड वाटतें. तिच्या शेपटीला जीवित बांधून तिच्या मागेंमागें तो हिंडत असतो. ७ अंगाचा स्पर्श होतांच रागावलेली कुत्री त्याच्या पाठीस लागते, तरी तो तिचा पिच्छा सोडीत नाहीं. कूं कूं करीत कामासक्त होतो. ८ अशा संकटांत त्याची इच्छा जरी पूर्ण झाली तरी लोक चोहोंकडून हड हड करितात. अशी त्याची जगांत फजिती होते. ९ पोरें दगड मारितात. मूर्खलोकहि त्याच्यावर थुंकतात. पुरुषाची तशीच स्थिति होते. तरीहि त्याला कामाची अति आवड असते. २१० कुत्र्यांचा वियोग कांहीं वेळानें तरी होतो; परंतु मनुष्याचा संयोग 'कल्पपर्यंत सुटत नाहीं. स्त्रैण पुरुष स्त्रीच्या आसक्तीनें तिच्यासाठीं नानाप्रकारचीं संकटें सोशितो. ११ किंवा गाढव जसा

भुंकत धांवे तीवरी । लाज न धरी सर्वथा ॥ १२ ॥ खरी पळे पुढेंपुढें । खरू धांवे वाडेंकोडें । लाता हाणोनि फोडी जाभाडें । तरी पुढेंपुढें धसों लागे ॥ १३ ॥ लाता हाणे उरावरी । तरी तिची प्रीति धरी । ऐशिया स्त्रियांचे घराचारीं । खराच्या परी नांदती ॥ १४ ॥ नातरी बोकडाची गति जैशी । तैशी दशा दिसे पुरुषासीं । मारूं आणिल्या पशु हत्याऱ्यापाशीं । तरी शेळ्यांसी सेवित ॥ १५ ॥ स्वयाती मारितां देखे । अनुताप नेघे तेणें दुःखें । मृत्यूसमीपही अभिलाखें । कामसुखें वांछिती ॥ १६ ॥ पूर्ण मृत्यूची पायरी । तें वार्धक्य वाजलें उरीं । तरी धांवे विषयावरी । आठवू न धरी मरणाचा ॥ १७ ॥ मेष मारूं आणिला घातकें । निजसख्यांतें मारितां देखे । ते न मनूनियां यथासुखें । अजीशीं हरिखें रमों धांवे ॥ १८ ॥ मेष श्वान आणि खर । हे ऋतुकाळींचि विषयतत्पर । त्याहूनि विशेषेंसीं नर । कामी दुर्धर सर्वदा ॥ १९ ॥ गर्भसंभवल्यापाठीं । श्वानही स्त्रीभोगासी नुठी । पुरुषाची अभिनव गोठी । गरोदर गोमटी भोगिती ॥ २२० ॥ गाढवगाढवीसी बुंथड । न करी अलंकार मोतड । मनुष्यासी स्त्रियेचें कोड । तिचें वालभ वाड वाढवी ॥ २१ ॥ दांडा गोंडा मूद वेणी । टिळकुवरी रत्नखेवणी । नाकींचें हालों दे सुपाणी । हें मनुष्यपणीं वालभ ॥ २२ ॥ जरी प्रसूतिकाळ निकट । गाड्याएवढें वाढलें पोट । तरी कामचारी विवेकनष्ट । रमताती दुष्ट स्त्रियांसीं ॥ २३ ॥ अस्थि मांस विष्ठा मूत । तेणें कामिनी पूर्ण भरित । ते कुश्चळीं जन कामासक्त । जाणोनि होत कां देवा ॥ २४ ॥ याप्रश्नाचें प्रत्युत्तर । तीं श्लोकीं सांगे शार्ङ्गधर । कामासक्तीचा विचार । ऐक सादर उद्धवा ॥ २५ ॥

गाढवीला पहातांच तिच्याकडे ओरडत जातो, कोणाची लाज धरीत नाहीं. १२ गाढवी पुढें पळत असते व हा तिच्या मागें मोठ्या त्वरेनें लागतो. ती लाथा झाडून त्याचें तोंड फोडितें, तरीहि तो मोठ्या धिटाईनें घुसतो. १३ ती छातीवर लाथा हाणते तरीहि तो तिच्यावर प्रीति करितो. कामासक्त पुरुषहि स्त्रीच्या घरीं या गाढवासारखाच वागत असतो. १४ किंवा बोकडाची जी स्थिति तीच अवस्था पुरुषाची होते. बोकड जसा मानेवर सुरा ठेविला तरी शेळीला भोगीत असतो, १५ त्याप्रमाणें आपल्या स्वजातीयांचें मरण पहात असूनहि, त्यांच्या दुःखानें त्यास पश्चात्तापहि होत नाहीं. मृत्यु पुढें येऊन उभा राहिला तरी तो मोठ्या आसक्तीनें कामसुखाची इच्छा करितो. १६ मृत्यूची शेवटली पायरी असें जें वृद्धपण तेंहि येऊन जरी उरावर बसलें, तरी तो विषयाकडेच धांवत असतो. मरणाची आठवणहि त्याला रहात नाहीं. १७ खाटिक बकऱ्याला मारायला घेऊन आला तरी तो आपल्या सोबत्यांना मारितांना प्रत्यक्ष पहात असूनहि तें मनावर घेत नाहीं व मोठ्या आनंदानें शेळीबरोबर क्रीडा करण्यास धांवत असतो. १८ बोकड, कुत्रा व गाढव हे केवल ऋतुकाळींच विषयासक्त असतात; परंतु पुरुष त्यांच्याहूनहि अधिक लंपट असतो. तो सदासर्वदा कामासक्त असतो. १९ गर्भ राहिल्यानंतर कुत्राहि कुत्रीला स्पर्श करीत नाहीं; परंतु पुरुषाची वार्ता मोठी विचित्र. तो गर्भिणीलाहि भोगितो. २२० गाढव गाढवीच्या गोंधळांत तिला दागिन्यांनीं सजवीत तरी नाहीं, परंतु पुरुषाला स्त्रीची इतकी आवड असते कीं, तो तिचें कोड पुरविण्यासाठीं भयंकर यातायात करीत असतो ! २१ तिच्या वेणींत गोंडा, मूद, रत्नजडित बिंदी-बिजवरा, पाणीदार मोत्यांची ठसठशीत नथ, त्या मोत्यांचें पाणी हालूं देत नाहीं, असें तिला सजवितो. ही मनुष्यजन्माची आवड. २२ स्त्रीचा प्रसूतिकाळ जरी येऊन ठेपला, पोट गाड्याएवढें पुढें आलें तरी तो कामासक्त, अविचारी, दुर्जन तिच्याशीं रममाण होतो. २३ हे देवा ! स्त्रीचा देह, हाडें, मांस, मूत्र पुरीष यांनीं युक्त आहे, हें पूर्णपणें जाणत असूनहि हे कामांध अशा घाणींत कां बरें लोलुप होतात ! २४ उद्धवाच्या या प्रश्नाचें उत्तर श्रीकृष्ण पुढील तीन श्लोकांनीं सांगत आहे. हे उद्धवा ! त्या कामासक्तीविषयींचा विचार आतां ऐक. २२५.

श्री० उ०— अहमित्यन्यथाबुद्धिः प्रमत्तस्य यथा हृदि । उत्सर्पति रजो घोरं ततो वैकारिकं मनः ॥ ९ ॥

मोहप्रमत्त विवेकशून्य । त्या पुरुषांच्या ठायीं जाण । देहात्मवादें अभिमान । रजोगुणें खवळला ॥ २६ ॥ जैसा मदिरापानें उन्मत्तू । विसरूनि आपुला निजस्वार्थू । मग अन्योन्य अनर्थू । आत्मघातू करूं धांवे ॥ २७ ॥ तेवीं शुद्ध बुद्ध नित्यमुक्तु । हा विसरोनि निजस्वार्थु । रजोगुणें लोलंगतु । कामासक्तु नरू कीजे ॥ २८ ॥ रजीं रंगल्या अभिमान । दुःखरूप दारुण । दुर्धर वाढे रजोगुण । विकारी मन तेणें होय ॥ २९ ॥

रजोयुक्तस्य मनसः संकल्पः सविकल्पकः । ततः कामो गुणध्यानाद्दुःसहः स्याद्धि दुर्मतेः ॥ १० ॥

जैं रजोयुक्त झालें मन । तैं संकल्पविकल्प गहन । एकांतीं घातल्या आसन । ध्यानीं चिंतन स्त्रियेचें ॥ २३० ॥ रजोगुणें कामासक्ती । होय दुष्ट वासना दुर्मती । कामावांचूनि चित्तीं । आणिक स्फूर्ती स्फुरेना ॥ ३१ ॥ जनीं वनीं आणि विजनीं । जागृतीं सुषुप्तीं स्वप्नीं । ध्यानीं मनीं चिंतनीं । स्त्रीवांचूनी स्मरेना ॥ ३२ ॥ कामिनीकामाचा अध्यास । हावभाव अतिविलास । गुण लावण्य सुरतरस । आसक्त मानस ते ठायीं ॥ ३३ ॥ रतिसुखाचा आराम । कामिनीक्रीडेचा संभ्रम । तेणें दुर्धर झाला जो काम । तयासि नियम चालेना ॥ ३४ ॥ धनधान्यपुत्रसुख । वांछी इहलोक परलोक । हा रजोगुणाचा देख । अलोलिक अतिकामू ॥ ३५ ॥

—ते मूढ मिथ्या अभिनिवेशानें भोग घेतात, असें भगवान् तीन श्लोकांनीं सकारण सांगतात—

श्रीभगवान् उवाच—श्रीभगवान् म्हणाले—**प्रमत्तस्य अहं इति अन्यथा बुद्धिः हृदि यथा उत्सर्पति ततः वैकारिकं मनः घोरं रजः** (उत्सर्पति)- विवेकशून्य पुरुषाची देहाच्या ठिकाणीं 'मी' अशी मिथ्या बुद्धि हृदयांत जशी उद्भवते तसेंच त्या अहंबुद्धीमुळें सत्त्वप्रधानहि मनाला दुःखात्मक रज व्यापितें. ९.

मोहमदानें मत्त झालेल्या विवेकशून्य पुरुषांत देहात्मवादामुळें अभिमान उत्पन्न होऊन रजोगुण खवळतो. २६ ज्याप्रमाणें एखादा मद्यपी दारू पिऊन उन्मत्त झाला म्हणजे आपलें खरें हित विसरून वाटेल तसा वागतो व आत्मघात करण्यास प्रवृत्त होतो, २७ त्याप्रमाणें शुद्ध-बुद्ध-नित्य-मुक्त होण्यांतच आपलें आत्यंतिक हित आहे, हें विसरून पुरुष रजोगुणामुळें कामासक्त बनतो. २८ एकदां अभिमान रजोगुणांत मिळाला कीं तो दुःखरूपी रजोगुण भयंकर वाढतो व त्यामुळें मन विकारवश होतें. २२९.

रजोयुक्तस्य मनसः सविकल्पकः संकल्पः स्यात्—रजोगुणानें युक्त असलेल्या मनाचा 'हें भोग्य चांगलें आहे व हें वाईट आहे' अशा विकल्पासह संकल्प होतो. **ततः दुर्मतेः गुणध्यानात् दुःसहः कामः स्यात् हि**— त्या संकल्पामुळें दुर्बुद्धि पुरुषाच्या 'कायहो याचें रूप आहे ! कायहो याचा भाव आहे' अशा गुणचिंतनानें दुर्धर काम उद्भवतो. १०.

मन एकदां रजोगुणांनीं युक्त झालें कीं मग भयंकर संकल्प-विकल्प उठतात. एकान्तांत आसन घालून बसलें असतांहि ध्यानामध्यें मन स्त्रीचेंच चिंतन करीत असतें. २३० रजोगुणानेंच कामासक्ति वाढते. दुष्टवासना व दुर्बुद्धि उत्पन्न होते. त्यामुळें त्याच्या मनाला कामावांचून दुसरें कांहीं सुचत नाहीं. ३१ जनांत, वनांत, एकान्तांत, जागृतींत झोंपेंत, स्वप्नांत, ध्यानीं, मनीं, चिंतनांत त्याला स्त्रीवांचून दुसरें कांहीं आवडत नाहीं. ३२ त्याला स्त्रीसंगाचाच ध्यास लागून रहातो. तिचे हाव-भाव, नटणें, मुरडणें, गुण, रूप इत्यादि विलासांतच त्याचें मन आसक्त होऊन रहातें. ३३ रतिसुखाच्या आनंदांत व स्त्रीक्रीडेचें वेड यांत काम एकदां प्रबळ झाला कीं, मग त्याला कांहींच नियम रहात नाहीं. ३४ तो धन-धान्य, पुत्रसुख, इहलोक, परलोक यांची इच्छा करीत असतो. असा रजोगुणानें प्रबळ झालेला काम अलौकिक आहे, पहा ! २३५.

करोति कामवशगः कर्माण्यविजितेन्द्रियः । दुःखोदर्काणि संपश्यन् रजोवेगविमोहितः ॥ ११ ॥

जेथ रजाचा वेग उदित । तेथ कामग्रहो खवळे अद्भुत । जो पुरुष झाला कामग्रस्त । तो सदा अंकित कामाचा ॥ ३६ ॥ ज्यासी विवेक नाहीं मानसीं । तो जाण पां कामाची आंदणी दासी । काम नाचवी जैसें त्यासी । तेणें विकारेंसी नाचत ॥ ३७ ॥ कामांकित झालिया पुढें । सकाम कर्म करणें पडे । याचें उत्तरोत्तर दुःख वाढे । अतिदुर्वाडें गर्वितु ॥ ३८ ॥ रजोगुणें अतिमोहित । यालागीं अजितेंद्रिय अयुक्त । जन्ममरणांचा अंकित । कर्मे करीत तद्रूपें ॥ ३९ ॥ रजोगुणाचा अतिबाध । तेणें जन केले विषयांध । रजरागी महामंद । जाण प्रसिद्ध उद्धवा ॥ २४० ॥ रजें बांधल्यापाठीं जाण । होय महामोहाचें संचरण । तेव्हां भ्रमाचें वाउधाण । सैरा तमोगुण उल्हासे ॥ ४१ ॥ ऐशी प्राणियांची मती । उद्धवा जाण निश्चितीं । यालागीं काम ते सेविती । नव्हे विरक्ती विषयांची ॥ ४२ ॥ तुज ऐसें वाटेल चित्तीं । बुडाली तरणोपायस्थिती । खुंटली प्राण्यांची परम गती । विषयासक्ती अनिवार ॥ ४३ ॥ जीवा अविद्याविषयसंबंधू । याचा बाधू अतिसुबद्धू । अविद्यायोग अनादिसिद्धू । तेणें दृढ भेदू जीवासी ॥ ४४ ॥ अंतःकरणही अनादी । प्रवाहरूपें त्याची सिद्धी । तेणें दृढ झाली विषयबुद्धी । त्याग त्रिशुद्धी घडेना ॥ ४५॥ सत्वीं उत्पन्न अंतःकरण । परी तें प्रकृतिकार्य जाण । तेथें भोगाध्यासें रजोगुण खवळला कोण आवरी ॥ ४६ ॥ विषयीं बांधिले विवेकी । तो विषयत्याग नव्हे ये लोकीं । उद्धवा तुझी आशंका हेच कीं । ऐक तेविखीं उपावो ॥ ४७ ॥ विवेकियांच्या ठायीं । विषयबुद्धि नुपजे पाहीं । विक्षेपू झाल्या कंहींबहीं । अभ्यासू तिंहीं करावा ४८ ॥

अविजितेंद्रियः कामवशगः रजोवेगविमोहितः दुःखोदर्काणि कर्माणि करोति–ज्यानें आपलीं इंद्रियें स्वाधीन ठेविलेलीं नसतात असा पुरुष कामबश होऊन पहात असूनहि रजोगुणांच्या वेगानें मोहित होत्साता दुःख हेंच फल देणारीं कर्में करितो. ११.

जेथें रजोगुणाचा वेग जोरानें उचल खातो तेथें कामरूपी ग्रह अतिशय खवळतो. जो पुरुष कामासक्त होतो, तो सर्वदा कामाचा अंकितच होऊन रहातो. ३६ ज्याच्या मनांत विवेक नाहीं, तो कामाची आंदण दिलेली दासी बनतो. काम त्याला जसा नाचवील, तसा तो त्या विकारानें नाचत असतो. ३७ एकदां कामाधीन झाल्यावर त्याला सकाम कर्म करणें भाग पडतें. उत्तरोत्तर त्याचें दुःख वाढत जातें व तो अति गर्वी बनतो. ३८ रजोगुणानें अतिमोहित झाल्यामुळें तो जितेंद्रिय होत नाहीं. तो युक्त नसतो व तद्रूप कर्में करीत जन्म-मरणाच्या अंकित होऊन रहातो. ३९ अशी ही रजोगुणाची बाधा आहे. त्यानें लोकांना विषयांध बनविलें आहे. हे उद्धवा ! रजोगुणी लोक महामंद असतात, हें प्रसिद्धच आहे. २४० एकदां रजोगुणानें बांधून टाकिलें कीं, त्याच्या पाठोपाठ महामोह संचार करितो, भ्रमाची वावटळ उठते व तमोगुण मोठ्या उल्हासानें पसरतो. ४१ हे उद्धवा ! प्राण्यांची मति अशी असते, हें लक्षांत ठेव. जे कामाचें सेवन करितात त्यांना विषयवैराग्य येत नाहीं. ४२ तुला असें वाटेल कीं, आतां तरणोपायच बुडाला, प्राण्याची परमगति खुंटली, विषयासक्ति अनिवार आहे. ४३ जीवाशीं अविद्येचा व विषयांचा संबंध होतो. त्यांची बाधा अतिशय प्रबळ आहे. अविद्यायोग अनादिसिद्धि असल्यामुळें जीवाचा दृढ भेद होतो. ४४ अंतःकरणहि अनादीच आहे. प्रवाहरूपानें त्याची सिद्धि होते. त्यामुळें विषयासक्ति दृढ होते व तिचा त्याग घडत नाहीं. ४५ सत्त्वगुणापासून अंतःकरण उत्पन्न होतें खरें, परंतु तें मायेचें कार्य आहे. भोगाच्या इच्छेनें रजोगुण खवळला असतां त्याला कोण आवरणार ! ४६ विवेकी पुरुषहि विषयांनीं बद्ध झाले आहेत. त्यामुळें विषयत्याग या लोकीं घडत नाहीं. हे उद्धवा ! हीच ना तुझी आशंका आहे. तर मग आतां त्याचाहि उपाय ऐक. ४७ वास्तविक विवेकी लोकांच्या मनांत विषयासक्ति उद्भवतच नाहीं व जर कधीं काळीं विषयविक्षेप झाला तर त्यानें विवेकाचा अभ्यास करावा. २४८,

रजस्तमोभ्यां यदपि विद्वान्विक्षिप्तधीः पुनः । अतन्द्रितो मनो युञ्जन् दोषदृष्टिर्न सज्जते ॥ १२ ॥

हो कां रजतमांचेनि गुणें । जरी बुद्धी विक्षिप्त केली तेणें । तरी आळस सांडूनि सज्ञानें । आवरणें मनातें ॥ ४९ ॥ अस्थिमांसाचा घडिला । विष्ठामूत्रांचा कोथळा । स्त्री विचारितां कांटाळा । नरकजिव्हाळा तो भोगू ॥ २५० ॥ भोगीं दावूनि दोषदृष्टी । मनासी विषयांची तुटी । करावी गा उठाउठी । नेमूनि निहटीं मनातें ॥ ५१ ॥ ऐसेनिही मन अतिदुर्धर । नियमासी नावरे अनावर । साधकांसी अतिदुस्तर । अशक्त नर ये अर्थी ॥ ५२ ॥ तरी ऐक बापा सावधान । मनोनिग्रहाचें लक्षण । तेंही सांगेन साधन । जेणें प्रकारें मन आकळे ॥ ५३ ॥

अप्रमत्तोऽनुयुञ्जीत मनो मय्यर्पयन् शनैः । अनिर्विण्णो यथाकालं जितश्वासो जितासनः ॥ १३ ॥

आळस निद्रेसी दवडूनि दूरी । जो सावधान निजवृत्ति धरी । माझें चिद्रूप निर्धारीं । शनैः-शनैः करी अभ्यासू ॥ ५४ ॥ अभ्यासीं प्रथम भूमिका । शिकावी आसनगाढिका । मूळबंध अतिनेटका । आसनजयो देखा शिकावा ॥ ५५ ॥ आसनजयो आल्या हाता । सहजें चढे योगपंथा । तेथें प्राणापानसमता । अभ्यासितां हों लागे ॥ ५६ ॥ विषय ते मनाआधीन । मन पवनासी वश्य जाण । अभ्यासें वश केला पवन । सहजें मन स्थिरावे ॥ ५७ ॥ यापरी जो हळूहळू । अभ्यासें सार्थक करी काळू । अविरक्त परी प्रबळू । होय सुकाळू परमार्थी ॥ ५८ ॥ हरिचिंतनीं एकाग्र मन । तैं एक होती

—'असें जर असेल तर कोणाच्याच दुःखाची निवृत्ति होणें शक्य नाहीं,' अशी आशंका घेऊन भगवान् म्हणतात—

यदपि रजस्तमोभ्यां विक्षिप्तधीः—जरी रज व तम यांच्या योगानें एखादा पुरुष मूढबुद्धि झाला. [तथापि] विद्वान् पुनः अतन्द्रितः मनः युञ्जन् दोषदृष्टिः न सज्जते—तरी विद्वान पुनरपि आळस सोडून मनाचा विरोध करणारा व विषयांतील दोषांचा विचार करणारा असा होत्साता विषयांमध्यें आसक्त होत नाहीं. १२.

जरी रजोगुण व तमोगुण यांनीं बुद्धि चंचल झाली, तरी विचारी माणसानें आळस न करितां मनाला आवरावें. ४९ विचार केला असतां स्त्री हाडा-मांसाची बनलेली मल-मूत्राची पोतडी असल्यामुळें ती कंटाळवाणी व नरकाचें साधनच आहे. २५० तिच्या भोगामध्यें अशी दोषदृष्टि ठेवून सावधानपणानें मनाचें नियमन करून त्याला विषयांपासून सत्त्वर फिरवावें. परंतु मन अत्यंत चंचल आहे. इतकेंहि करून तें नियमानें आवरतां येत नाहीं. साधकालाहि तें अति दुस्तर होतें. पुरुष या कामीं असमर्थ होतो. ५२ तरी बाबा उद्धवा! आतां मनोनिग्रहाचें लक्षण ऐक. ज्या योगें मनाला स्वाधीन ठेवितां येतें, तेंहि साधन सांगतों, ऐक. २५३.

——विषयदोषदर्शनानेंहि मनाचा निरोध करण्यास असमर्थ असलेल्या पुरुषासाठीं अनायासानें मनोनिरोधाचा उपाय सांगतात——

अप्रमत्तः अनिर्विण्ण यथाकालं जितश्वासः जितासनः मनः मयिः शनैः अर्पयन् अनुयुंजीत—बेसावध न होतां व आळस न करितां त्रिकालीं स्नान करून वायूचा व आसनाचा जय संपादन करून आपलें मन परमानंदरूप अशा माझ्या ठिकाणीं हळूहळू अर्पण करीत मनःसमाधान करावें. १३.

आळसरूपी निद्रेस दूर घालवून जो सावधान चित्तानें ब्रह्मभावना करितो व माझ्या चिद्रूपाचा हळूहळू अभ्यास करितो, ५४ त्यानें आसन स्थिर करून आसनजय मिळविणें ही अभ्यासाची पहिली पायरी शिकावी. ५५ एकदां आसनजय साध्य झाला कीं, तो सहज योगारूढ होतो व अभ्यास करूं लागलें असतां प्राणापान समान होतात. ५६ विषय मनाच्या अधीन असतात. मन वायूच्या वश असतें. करितां अभ्यासानें प्राणापान वायूस स्थिर केलें असतां मन सहजच स्थिर होतें. ५७ याप्रमाणें जो हळूहळू अभ्यास करून काळाचें सार्थक करितो, तो संसारी मनुष्य सुद्धां परमार्थासाठीं आतुर होतो. ५८ हरिचिंतनांत मन एकाग्र केलें असतां प्राणापान

प्राणापान । हाचि पवनजयो पूर्ण योग-साधन सहजेंची ॥ ५९ ॥ तव प्राणापान सम जोडी । षट्चक्रांचे पदर फोडी । तैं विषयांतें चित्त सांडी । विषयो बोसंडी चित्तातें ॥ २६० ॥ यापरी या अभ्यासवाटे । सकाम कामाचा तटका तुटे । सनकादिक येणें परिपाठें । म्यां आत्मनिष्ठे लाविले ॥ ६१ ॥

एतावान्योग आदिष्टो मच्छिष्यैः सनकादिभिः । सर्वतो मन आकृष्य मय्यद्धावेश्यते यथा ॥ १४ ॥

येणेंचि उपदेशें देख । माझे शिष्य सनकादिक । अभ्यासबळे अलौलिक । निजात्मसुख पावले ॥ ६२ ॥ तो उपदेश कोण म्हणसी । जे वियोग चित्तविषयांसी । हें म्यां सांगोनियां त्यांसी । आत्माभ्यासीं लाविले ॥ ६३ ॥ मन जेथें जेथें जाये । तेथें तेथें वस्तूचि आहे । येणें अभ्यासें लवलाहें । सनकादिक पाहें सिद्ध झाले ॥ ६४ ॥ चित्तासी विषयांचा वियोगू । हा सनकादिकीं साधिला योगू । त्यांसी उपदेशावया सांगू । मी स्वयें श्रीरंगू उपदेष्टा ॥ ६५ ॥ तें ऐकोनि उद्धव पाहीं । विचारी आपुलिया ठायीं । मी श्रीकृष्णावेगळा कांहीं नाहीं । सनकादिक कंहीं उपदेशिले ॥ ६६ ॥ सनकादिक ब्रह्मशीळ । पूर्वीं जाहले बहुकाळ । कृष्ण ये काळींचें देवकीबाळ । गुरुत्व केवळ घडे कैसें ॥ ६७ ॥

उ० उ० यदा त्वं सनकादिभ्यो येन रूपेण केशव । योगमादिष्टवानेतद्रूपमिच्छामि वेदितुम् ॥ १५ ॥

एक होतात. हाच पूर्ण वायुजय होय. याच्या योगानें योगसाधन सहजच घडतें. ५९ मग प्राणापानांची समान जोडी षट्चक्राच्या आवरणाचा भेद करिते. त्यावेळीं चित्त विषयांना सोडितें व विषय चित्ताला सोडितात. २६० याप्रमाणें या अभ्यासाच्या योगानें सकाम पुरुषाचा कामसंबंध सुटतो. याच मार्गानें मीं सनकादिकांस आत्मनिष्ठ केलें. २६१.

विषयांशीं नित्य संबद्ध झालेल्या मनाचें विषयवियोगानें ईश्वरनिष्ठत्व संभवत नाहीं, असें मानणाऱ्या उद्धवाला मनाच्या ईश्वरनिष्ठत्वाची संभवनियता पटवून देण्यासाठीं पूर्व इतिहासाचा हवाला देतात—

मच्छिष्यैः सनकादिभिः मनः सर्वथा आकृष्य यथा अद्धा मयि आवेश्यते एतावान् योगः आदिष्टः—माझे शिष्य जे सनकादिक त्यांच्याकडून सर्व विषयांपासून मनाचें आकर्षण करून यथाविधि साक्षात् माझ्या ठिकाणींच ते प्रविष्ट केलें जातें, अशा स्वरूपाचा हा योग मी तुला सांगितला. १४

याच उपदेशानें माझे शिष्य सनकादिक अलौकिक अभ्यासाच्या बळानें आत्मसुखाला प्राप्त झाले. ६२ ‘तो उपदेश कोणता !’ असें जर विचारशील तर ऐक. चित्त व विषय यांची भेट होऊं न देणें हाच उपदेश करून मी त्यांना आत्माभ्यास करावयास लाविलें. ६३ जेथें जेथें मन जाईल तें ब्रह्मस्वरूपच आहे, अशा दृढ अभ्यासानेंच सनकादिक सिद्ध बनले, ६४ चित्ताशीं विषयांचा वियोग करणें हा योग सनकादिकांना साधला. त्यांना उपदेश करणारा मी स्वतः श्रीरंगच आहें. ६५ हें ऐकून उद्धव आपल्याशींच विचार करूं लागला कीं, मी श्रीकृष्णाहून वेगळा नाहीं, असें असतां त्यानें सनकादिकांस उपदेश कसा केला ! ६६ ब्रह्मनिष्ठ सनकादिक किती तरी प्राचीन काळीं होऊन गेले व श्रीकृष्ण अलीकडचा देवकीचा पुत्र; असें असतां त्याचा गुरुपणा कसा संभवतो. २६७.

—भगवानानें सनकादिकांना आपले शिष्य म्हटलें, तें ऐकून ‘सनकादिक फार प्राचीन ब्रह्मकुमार आहेत, तेव्हां याच रूपानें भगवानानें त्यांना योग सांगणें शक्य नाहीं,’ असें समजून उद्धव पुढील श्लोकानें प्रश्न करितो—

उद्धवः उवाच—उद्धव म्हणाला, केशव—हे श्रीकृष्णा ! त्वं सनकादिभ्यः यदा येन रूपेण योगं आदिष्टवान्—तूं सनकादिकांना जेव्हां व ज्या रूपानें योग सांगितलास, एतत् रूपं वेदितुं इच्छामि—तें रूप व तो काल जाणण्याची मी इच्छा करितों. १५.

उद्धव म्हणे गा केशवा । सनकादिकांसी केव्हां । उपदेश केला गा तुवां । जवळी तेव्हां मी कां नव्हतों ॥ ६८ ॥ येणेंचि रूपें हृषीकेशी । योग सांगितला तयांसी । किंवा रूपांतरें म्हणसी । तें जाणावयासी मज इच्छा ॥ ६९ ॥ कोण काळ समयो कोण । कोण योग कैसा प्रश्न । तें कृपा करोनि आपण । मज संपूर्ण सांगावें ॥ २७० ॥ ऐकोनि उद्धवाचा प्रश्न । कृपें कळवळला नारायण । हंसइतिहासनिरूपण । आपुलें आपण सांगत ॥ ७१ ॥

श्रीभ०-पुत्रा हिरण्यगर्भस्य मानसाः सनकादयः । पप्रच्छुः पितरं सूक्ष्मां योगस्यैकान्तिकीं गतिं ॥ १६ ॥

ब्रह्मयाचे मानसपुत्र । महाप्रसिद्ध सनत्कुमार । तिंहीं सत्यलोकीं प्रश्न थोर । अतिदुस्तर पूशिला ॥ ७२ ॥ अतिसूक्ष्म योगगती । दुर्ज्ञेय स्वरूपस्थिति । परम कठिण प्रश्नोक्ती । पित्याप्रती पूशिली ॥ ७३ ॥

सन० ऊ० गुणेष्वाविशते चेतो गुणाश्चेतसि च प्रभो । कथमन्योन्यसंत्यागो मुमुक्षोरतितितीर्षोः ॥ १७ ॥

सनकादिक पुसत । विषयांच्या ठायीं चित्त । स्वभावें असे विषयासक्त । तें विषयीं सततें आवेशलें ॥ ७४ ॥ तैसेचि विषय पाहीं । प्रवेशले चित्ताच्या ठायीं । वासनारूपें जडले तेही । निघों कंहीं नेणती ॥ ७५ ॥ फळ काळ दोनी नाहीं । तरी तैंचे आंब्रे गोड पाहीं । ऐसे विषय चित्ताचे ठायीं । रिघाले कंहीं न निघती ॥ ७६ ॥ पर्णिली कांता माहेरा जाये । चित्तीं रिघाली दूरी न राहे । यापरी विषयो पाहें । जडला ठाये चित्तासी ॥ ७७ ॥ चित्त विषयो अन्योन्यत्यागू । मुमुक्षां केवीं घडे चांगू । ये उपायीं उपाययोगू । स्वामीनें सांगू सांगावा ॥ ७८ ॥

उद्धव म्हणाला, अरे केशवा ! तूं सनकादिकांना उपदेश केव्हां रे केलास ! त्यावेळीं मी तुझ्या जवळ नव्हतों का ! ६८ हे हृषीकेशा ! तूं याच रूपानें त्यांना उपदेश केलास किंवा दुसरें रूप धारण केलें होतेंस ! हें जाणण्याची मला इच्छा आहे. ६९ तो काळ कोणता ! ती वेळ कोणती ! कोणता योग होता व त्यांचा प्रश्न काय होता ! हें सर्व कृपा करून मला सविस्तर सांग. २७० उद्धवाचा हा प्रश्न ऐकून श्रीकृष्ण दयेनें कळवळला व हंसाची कथा आपणच सांगूं लागला. २७१.

श्रीभगवान् उवाच–श्री भगवान् म्हणाले, हिरण्यगर्भस्य मानसाः पुत्राः सनकादयः–ब्रह्मदेवाचे मानस पुत्र सनकादिक, पितरं योगस्य सूक्ष्मां ऐकान्तिकीं गतिं पप्रच्छुः– आपल्या पित्याला योगाची दुर्ज्ञेय, पराकाष्ठा विचारिते झाले. १६.

ब्रह्मदेवाच्या सात मानसपुत्रांतील सनत्कुमार प्रसिद्ध आहे. त्यानें सत्यलोकांत मोठा गहन प्रश्न विचारिला होता. ७२ योगाची गति अति सूक्ष्म आहे व आत्मस्वरूपास्थिति दुर्ज्ञेय आहे; तें जाणण्यासाठीं त्यानें अति कठिण प्रश्न आपल्या पित्याला म्ह० ब्रह्मदेवाला विचारिला. २७३.

सनकादयः ऊचुः–सनकादिक म्हणाले, प्रभो–हे भगवान्, गुणेषु चेतः आविशते–विषयांमध्यें स्वाभाविक रागादि दोषामुळें चित्त प्रवेश करिते, गुणाः च चेतसि–आणि ते अनुभूत विषयवासनारूपानें चित्तांत प्रवेश करितात, अतितितीर्षोः मुमुक्षोः कथं अन्योन्यसंत्यागः– तेव्हां विषयांचे अतिक्रमण करणाऱ्याची इच्छा करणाऱ्या मुमुक्षूचा चित्त व विषय यांचा परस्पर त्याग कसा संभवतो ! १७.

सनकादिकांनीं ब्रह्मदेवाला विचारिलें कीं, चित्त स्वतःच विषयांमध्यें आसक्त असल्यामुळें तें सतत विषयांतच गुंतलेलें असतें. ७४ त्याचप्रमाणें विषयांनींहि एकदा चित्तांत प्रवेश केला म्हणजे वासनारूपानें ते चिकटतात व तेथून परत फिरण्याचें तें जाणत नाहींत. ७५ आंब्याचें फळ व ऋतु हीं दोन्हीं नसलीं तरी आंबा केव्हांहि गोडच; त्याप्रमाणे विषय एकदा चित्ताला जडले कीं, मग तेथून केव्हांहि बाहेर निघत नाहींत. ७६ विवाहित स्त्री माहेरी जरी गेली, तरी ती मनानें कांहीं पतीपासून दूर नसते. ७७ त्याप्रमाणें विषय चित्ताला चिकटून रहातो. चित्त व विषय यांचा परस्पर त्याग मुमुक्षूंना चांगल्याप्रकारें कोणत्या साधनानें घडतो, याविषयीं एखादा उपाययोग स्वामींनीं सांगावा. २७८.

श्रीभ०–एवं पृष्टो महादेवः स्वयंभूर्भूतभावनः । ध्यायमानः प्रश्नबीजं नाभ्यपद्यत कर्मधीः ॥ १८ ॥

ज्यासी अग्रपूजेचा सन्मान । श्रेष्ठ देवामाजीं महिमान । महादेव म्हणावया कारण । ब्रह्मयासी जाण या हेतू ॥ ७९ ॥ जो आंगें स्रजी चराचर । जो वेदांचें निजमंदिर । त्या ब्रह्मयाप्रति अतिगंभीर । प्रश्न महाथोर पुत्रीं केला ॥ २८० ॥ त्या प्रश्नाची प्रश्नोत्तरविधी । ब्रह्मयासी न कळे त्रिशुद्धी । कर्मजड झाली बुद्धी । बोधकसिद्धी स्फुरेना ॥ ८१ ॥ प्रश्न अत्यंत सखोल पडिला । तेणें ब्रह्मा वेडावला ठेला । कांहीं न बोलवे जी बोला । तो चिंतूं लागला मज तेव्हां ॥ ८२ ॥ सनकदिकांची प्रश्नावस्था । सत्यलोकीं समस्तां देखतां । न कळे न म्हणवे सर्वथा । सांगों जातां नव्हे बोध ॥ ८३ ॥ ऐसें ब्रह्मयासी दुर्घट। कांहीं न बोलवे स्पष्ट । परम देखोनि संकट । मी ज्ञानवरिष्ठ चिंतिलों ॥ ८४ ॥

स मामचिन्तयद्देवः प्रश्नापारं तितीर्षया । तस्याहं हंसरूपेण सकाशमगमं तदा ॥ १९ ॥

निरसावया पुत्राचें अज्ञान । आणि तरावया त्यांचा प्रश्न । ब्रह्मा करी माझें चिंतन । तेव्हां माझेंही मन कळवळलें ॥ ८५ ॥ ब्रह्मा माझे पोटींचे बाळ । त्यासी कर्मजाड्यें आलें पडळ । तें निरसावया तत्काळ । हंस केवळ मी जाहलों ॥ ८६ ॥ प्रश्न केला अपरंपरा । जो परमहंसाचें परम सार । त्याचा पावावया परपार । हंसरूपधर मी जाहलों ॥ ८७ ॥ नातळे वर्णव्यक्तिविलास । तो मी श्वेतवर्ण स्वप्रकाश । स्वयें झालो राजहंस । ब्रह्मापुत्रांस उपदेशावया ॥ ८८ ॥ सृष्टि स्रजावयाचे विधी ।

श्रीभगवान् उवाच–श्रीभगवान् म्हणाले, एवं पृष्टः महादेवः स्वयंभूः भूतभावनः ध्यायमानः–याप्रमाणें विचारिला गेलेला तो महान् देवहि, स्वयंभूहि, भूतांचा स्रष्टाहि व विचार करीत असूनहि, प्रश्नबीजं न अभ्यपद्यत–या प्रश्नाचें बीज म्ह० ज्याच्या अज्ञानामुळें हा यांचा प्रश्न आहे, तें तत्त्व जाणण्यास समर्थ झाला नाहीं. (यतः) कर्मधीः–कारण त्याची बुद्धि कर्मामुळें विक्षिप्त झाली होती. १८.

ब्रह्मदेवाला अग्रपूजेचा मान आहे. त्याचा महिमा सर्व देवांमध्यें श्रेष्ठ आहे. यास्तव त्याला सर्व देवांतील श्रेष्ठ देव म्हटलें आहे. ७९ ज्यानें स्वतः हें चराचर विश्व निर्माण केलें, जो वेदांचें केवळ माहेरघरच, अशा ब्रह्मदेवाला त्याच्या विद्वान् पुत्रानें अतिशय गंभीर प्रश्न केला. २८० त्या प्रश्नाचें यथार्थ उत्तरहि त्याला देववेना. त्याची बुद्धि कर्मामुळें जड झाली होती. त्यामुळें त्याला ज्ञानोपदेश स्फुरेना. ८१ प्रश्न तर अतिशय गंभीर. त्यानें ब्रह्मदेव वेडा होऊन गेला, त्याला कांहीं बोलवेना. तेव्हां त्यानें माझें चिंतन केलें. ८२ 'सनकादिकांच्या प्रश्नाचें उत्तर मला कळत नाहीं,' असें त्याला सत्यलोकांत सर्वांसमोर बोलवेना. बरें, उत्तर द्यावें, तर त्याचा बोध होणार नाहीं. ८३ अशी ब्रह्मदेवाची मोठी बिकट स्थिति झाली. त्याला स्पष्ट कांहींच बोलवेना, असें दारुण संकट पाहून त्यानें ज्ञानांत श्रेष्ठ असलेल्या माझें चिंतन केलें. २८४.

सः देवः प्रश्नपारं तितीर्षया मां अचिन्तयत्–तेव्हां तो देव प्रश्नाचा पार म्ह० उत्तर किंवा अभिप्राय जाणण्याच्या इच्छेनें माझें चिंतन करिता झाला. तदा अहं हंसरूपेण तस्य सकाशं अगमम्–तेव्हां मी हंसरूपानें त्या ब्रह्मदेवाजवळ गेलों. [जसा हंस दूध व पाणी यांचें पृथक्करण करण्यास समर्थ असतो, तसा मी गुण व चित्त यांचें पृथक्करण करण्यास समर्थ आहे, असें सुचविण्यासाठीं हंसरूपानें त्याच्याजवळ गेलों. १९.

पुत्राचें अज्ञान जावें व स्वतः त्याच्या प्रश्नाचें उत्तर देण्यास समर्थ व्हावें यासाठीं ब्रह्मदेवानें माझें चिंतन करितांच माझेंहि मन कळवळलें. ८५ ब्रह्मदेव माझ्याच पोटचें मूल. कर्मजाड्यामुळें त्याच्या डोळ्यांवर अज्ञानपटल येऊन त्याला उत्तर दिसेना. त्याचें तें अज्ञानपटल नाहींसें करण्यासाठीं मी तत्काल हंस झालों. ८६ प्रश्न फार गहन असल्यामुळें तो परमहंसाचें परमतत्त्व होता. त्या प्रश्नाचें उल्लंघन करून पार जाण्यासाठीं मीं हंसाचें रूप धारण केलें. ८७ ज्याचा आकार व वर्ण कळत नाहीं, असा मी शुभ्रवर्ण स्वयंप्रकाश स्वतःच ब्रह्मपुत्रांना उपदेश करण्यासाठीं राजहंस झालों. ८८ प्रजापति सृष्टि उत्पन्न करण्यासाठीं विधींच्या मागें लागला. त्यामुळें त्याची बुद्धि कर्मजड झाली

विधाता लागला त्रिशुद्धी । तेणें कर्मजड झाली बुद्धी । निजज्ञानसिद्धी विसरला ॥ ८९ ॥ जो म्हणे मी कर्माधिकारी । तेव्हांचि तो देहधारी । तो परमार्थाचे नगरीं । न सरे निर्धारी बाह्यमुद्रा ॥ २९० ॥ ' न कर्मणा न प्रजया ' ऐसी वेदोक्ती । कर्म निषेधें त्यागवी श्रुती । तेणें कर्मे ब्रह्मप्राप्ती । जे म्हणती ते अज्ञान ज्ञाते ॥ ९१ ॥ म्यां उपदेशिलें ब्रह्मयासी । शेखीं कर्मजाड्य आलें त्यासी । केवळ कर्मे कर्मठासी । मुक्ति तयासी कैसेनी ॥ ९२ ॥ ब्रह्मा अदृष्टद्रष्टा लोकीं तिहीं । तो कर्मजाड्यें झाला विषयी । इतरांचा तो पाड कायी । ठकले ये ठायीं सज्ञान ॥ ९३ ॥ सांगतां पुत्रांचा प्रश्न । उजळेल ब्रह्मयाचें निजज्ञान । ऐसें साधोनियां विंदान । सत्यलोकीं जाण उतरलो ॥ ९४ ॥ प्रश्नकर्ते सनकादिक । वक्ता सत्यलोकनायक । दोहींसीही पडली अटक । ते काळीं देख मी आलों ॥ ९५ ॥ नासों नेदितां साचार । हंस निवडी क्षीरनीर । तैसें निवडावया सारासार । ज्ञानचतुर मी राजहंस ॥ ९६ ॥ पूर्वपुण्य-संचयेंवीण । विमानेवीण स्वयें गमन । सत्यलोकीं आगमन । कोणाचेंही जाण कदा नव्हे ॥ ९७ ॥ मी पापपुण्यातीत पाहीं । यालागीं मज पुण्य नाहीं । पाखीं कां चालोनी पायीं । तो मी सर्वां ठायीं सर्वगतू ॥ ९८ ॥ त्या सत्यलोकां मी अवचितां । हंसस्वरूपें झालो येता । त्या मज देखोनियां समस्तां । परमाश्चर्यता वाटली ॥ ९९ ॥

दृष्ट्वा मां त उपव्रज्य कृत्वा पादाभिवन्दनम् । ब्रह्माणमग्रतः कृत्वा पप्रच्छुः को भवानिति ॥ २० ॥

परब्रह्मैक परम मूर्ती । मज येतां देखोनि हंसस्थितीं । उभे ठाकोनि सामोरे येती । चरण वंदिती साष्टांग ॥ ३०० ॥ ब्रह्मसदनीं वेद मूर्तिमंत । पुण्यही मूर्तिमंत तेथ । सत्यलोकीं मूर्तिमंत सत्य । तपादि समस्त मूर्तिमंतें ॥ १ ॥ त्या समस्तां देखतां जाण । ब्रह्मानें पुसावें तूं कोण । पुसल्या येईल नेणतेपण ।

व आपल्या ज्ञानसिद्धीला तो विसरला. ८९ जो ' मी कर्माधिकारी ' असें म्हणतो, तोच देहधारी होतो. तो केवळ बाह्य स्वरूपानें परमार्थनगरींत कधीं प्रवेशहि करूं शकत नाहीं. २९० ' न कर्मणा न प्रजया० ' म्ह० कर्मानें नाहीं व प्रजेनें नाहीं. असें वेदवचन आहे. ही श्रुति निषेध करून कर्माचा त्याग करविते. अशा त्या कर्माच्या योगानें ब्रह्मप्राप्ति होते असें म्हणणारे पंडित खरोखरच अज्ञानी होत. ९१ मीं ब्रह्मदेवाला उपदेश केला; पण शेवटीं त्यालाहि कर्मठपणामुळें उत्पन्न होणारें बुद्धिमांद्य आलेंच. तेव्हां केवळ कर्मे करणाऱ्या कर्मठांना मुक्ति कोठची मिळणार ! ९२ ब्रह्मदेव त्रैलोक्यांतील सर्व अदृष्ट जणाणारा असून तोहि जर कर्मजाड्यामुळें विषयी झाला, तर मग इतरांचा काय पाड ! या बाबतींत मोठमोठे ज्ञातेहि फसले ! ९३ पुत्रांच्या प्रश्नाचें उत्तर देण्याच्या निमित्तानें स्वतः ब्रह्मदेवाच्या ज्ञानालाहि उजळा चढेल, अशी संधि पाहून मी सत्यलोकीं जाऊन उतरलों. ९४ प्रश्न विचारणारे सनकादिक व उत्तर देणारा ब्रह्मदेव हे दोघेहि कुंठित झाले असतां मी त्यावेळीं तेथें जाऊन पोंचलों. ९५ हंस जसा दूध न बिघडवितां त्यांतील पाणी वेगळें करितो, त्याप्रमाणें सारासाराची निवड करण्यांत मी ज्ञानचतुर राजहंस आहें. (चित्त व विषय हीं परस्परांत गुंतलेलीं असल्यामुळें त्यांना वेगळें करण्यासाठीं भगवानांनीं हंसरूप धारण केलें होतें.) ९६ पूर्वजन्मींच्या पुण्याचा संचय असल्यावांचून कोणालाहि केव्हांहि विमानाशिवाय स्वतःच सत्यलोकांत जातां येणें शक्य नाहीं. ९७ मी पुण्य व पाप यांहून अतीत आहें, यास्तव माझ्याजवळ पुण्य नाहीं. पंखांनीं उडून किंवा पायांनीं चालून मी सर्वत्र संचार करितों. त्या सत्यलोकांत हंसरूपानें अकस्मात् आलेल्या मला पहातांच सर्वांस अत्यंत आश्चर्य वाटलें. २९९.

मां दृष्ट्वा—मला पाहून, **ते उपव्रज्य**—ते जवळ येऊन, **पादाभिवन्दनं कृत्वा**—माझ्या चरणांवर लोटांगण घालून, **ब्रह्माणं अग्रतः कृत्वा**—व ब्रह्मदेवाला पुढें करून, **' कः भवान्**—आपण कोण **' इति पप्रच्छुः**—असें विचारिते झाले. १९.

परब्रह्मरूप, एक व परम मूर्ति अशा मला हंसरूपानें आलेलें पहातांच ते सर्व उठून सामोरे आले व त्यांनीं माझ्या चरणांचें शिरसावंदन केलें. ३०० ब्रह्मलोकीं वेद व पुण्य हीं दोन्ही साक्षात् रहातात व त्याच सत्यलोकीं सत्य, तप इत्यादि मूर्तिमंत असतात. १ तेथें ब्रह्मदेवानें मला ' तूं कोण ! ' असें जर विचारिलें असतें, तर त्याच्याकडे

यालागीं मौन धरोनि ठेला ॥ २ ॥ ब्रह्मया पुढें करूनि जाण । सनकादिकीं आपण । मज केला गा तिहीं प्रश्न । तुम्ही कोण कोठील ॥ ३ ॥

इत्यहं मुनिभिः पृष्टस्तत्त्वजिज्ञासुभिस्तदा । यदवोचमहं तेभ्यस्तदुद्धव निबोध मे ॥ २१ ॥

ब्रह्मयासी पुसिला जो प्रश्न । त्याचा तत्त्वार्थ जाणावया जाण । मज पुशिलें तिंहीं तूं कोण । अतिविचक्षण जिज्ञासू ॥ ४ ॥ त्यासी स्थूळ लिंग कारण । यावेगळी वस्तु चिद्‌घन । सांगावया प्रश्नखंडण । तीं श्लोकीं जाण म्यां केलें ॥ ५ ॥ करोनियां प्रश्नखंडन । नित्यानित्य विवेकज्ञान । त्यांसी म्यां सांगीतलें जाण । तेंचि निरूपण तूं ऐक ॥ ६ ॥ सनकादिकांसमान । उद्धवा तुज मी मानीं जाण । यालागीं त्यांचें ज्ञानकथन । ऐक सांगेन म्हणतसें ॥ ७ ॥ तें अतिश्रेष्ठ जुनाट ज्ञान । उद्धवा परिसें सावधान । ऐसें ऐकोनियां वचन । येरें मनाचे कान पसरले ॥ ८ ॥ देहद्वय सांडोनि मागें । उद्धव श्रवण झाला सर्वांगें । यालागीं स्वयें श्रीरंगें । गुह्य ज्ञान स्वांगें सांगीतलें ॥ ९ ॥ देवालयीं लागे रत्नखाणी । त्यांमाजीं सांपडला स्पर्शमणी । अमृत स्रवे त्यापासोनी । तैसा सभाग्यपणीं उद्धवू ॥ ३१० ॥ सांगता श्रीमहाभागवता । श्रीकृष्णासारिखा वक्ता । त्याहीमाजी हंसगीतकथा । आदरें सांगता हरि झाला ॥ ११ ॥ सनकादिकांची जे प्राप्ती । ते दाटूनि उद्धवाचे हातीं । स्वयें देतसे श्रीपती । त्याचें भाग्य किती वर्णावें ॥ १२ ॥ ब्रह्मरूप स्वयें वक्ता । तोही उपदेशीं ब्रह्मकथा । गुरु ब्रह्मचि स्वभावतां । हे सभाग्यता उद्धवीं ॥ १३ ॥ यालागीं निजभाग्यें भाग्यवंतू । जगीं उद्धवचि अतिविख्यातू । ज्यालागीं स्वयें जगन्नाथू । ज्ञानसमर्थू तुष्टला ॥ १४ ॥

अजाणतेपणा आला असता. म्हणून तो मौन धरून उभा राहिला. २ तेव्हां ब्रह्मदेवाला पुढें करून सनकादिकांनीं ' तुम्ही कोण ! कोठून आला ! ' असा मला प्रश्न केला. ३०३.

तदा तत्त्वजिज्ञासुभिः मुनिभिः अहं इति पृष्टः—त्यावेळीं तत्त्वजिज्ञासु मुनींकडून मी असें विचारिलों गेलों. उद्धव– हे उद्धवा ! अहं तेभ्यः यत् अवोचं तत् मे (वचनं) निबोध—मी त्यांना जें सांगितलें तें माझें वचन ऐक. २१.

सनकादिकांनीं ब्रह्मदेवाला जो प्रश्न विचारिला होता त्याचा तत्त्वार्थ जाणण्यासाठीं त्या अति चतुर जिज्ञासूंनीं मला ' आपण कोण ! ' असा प्रश्न केला. ४ तेव्हां स्थूल, सूक्ष्म व कारण शरीर यांहून चिद्घन परमात्मा भिन्न आहे, हें सांगण्यासाठीं मीं पुढील तीन श्लोकांनीं त्यांच्या प्रश्नाचें खंडण केलें. ५ त्यांस नित्यानित्यविवेकज्ञान सांगितलें, तेंच निरूपण तूं आतां ऐक. ६ हे उद्धवा ! मी तुला सनकादिकांसारखाच मानितों. म्हणून त्यांना सांगितलेल्या कथेंतील ज्ञान तुलाहि सांगेन म्हणतों, तरी तें ऐक. ७ हे उद्धवा ! तें पुरातन, अतिश्रेष्ठ ज्ञान लक्ष देऊन ऐक. श्रीकृष्णाचे हे शब्द ऐकतांच उद्धवानें आपलें सगळें मन ऐकण्याकडे लावून तो कान देऊन बसला. ८ तो दोन्ही देहांचें भान विसरून सर्वांगानें श्रवणेंद्रिय बनला. तेव्हां श्रीरंगानें स्वतः स्वमुखानें गुप्त ज्ञान सांगितलें. ९ देवळामध्यें रत्नांची खाण लागावी, त्यांत परीस सांपडावा व अमृताचा स्राव व्हावा त्याप्रमाणें उद्धव भाग्यवान् होता. ३१० श्रीमहाभागवत सांगणारा श्रीकृष्णासारखा वक्ता व त्यांतहि हंसगीताची कथा ! श्रीहरि ती मोठ्या आदरानें सांगूं लागला. ११ सनकदिकांना जी प्राप्ति झाली ती स्वतः श्रीहरि मुद्दाम उद्धवाच्या हातीं देऊं लागला तेव्हां त्यांच्या भाग्याचें वर्णन किती करावें ! वक्ता स्वतः ब्रह्मरूप व तोहि ब्रह्मकथेचा उपदेश करूं लागला. गुरु स्वभावतःच ब्रह्म असणें हें उद्धवाचें केवढें भाग्य ! १३ ज्याच्यावर स्वतः ज्ञानसमर्थ जगन्नाथ संतुष्ट झाला, त्या भाग्यवान् उद्धवाचें थोर भाग्य जगांत प्रसिद्ध आहे. ३१४.

॥ हं० उ० ॥ वस्तुनो यद्यनानात्वमात्मनः प्रश्न ईदृशः । कथं घटेत वो विप्रा वक्तुर्वा मे क आश्रयः ॥२२॥

परमात्मा अवघा एक । तेथ ' मी तूं ' हें न रिघे देख । ' तूं कोण ' हें जें वाचिक । वृथा शाब्दिक वाचाळ ॥ १५ ॥ तुम्हीं केला जो प्रश्न । त्यासी द्यावया प्रतिवचन । वक्त्यासी आश्रयो नाहीं जाण । मीतूंपण दिसेना ॥ १६ ॥ तुम्हीं पुशिलें नेणोन । म्यां काय सांगावें जाणोन । मुळीं नाहीं मीतूंपण । पुशिला प्रश्न तो मिथ्या ॥ १७ ॥ नामरूपवर्णव्यक्ती । नाहीं स्वजाति विजाती । विप्र हो तुमची वचनोक्ती । न घडे निश्चितीं सत्यत्वें ॥ १८ ॥ चारी पुरुषार्थ पूर्ण करिती । हे विप्रनामाची परमख्याती । त्या तुम्हांस ज्ञानाची प्रश्नोक्ती । न घडे निश्चितीं विप्र हो ॥ १९ ॥ असावें जरी बहुपण । तरी पुसणें घडे तू कोण । आत्म्याचे ठायीं ऐसा प्रश्न । न घडे जाण सर्वथा ॥ ३२० ॥ प्रश्न न घडे आत्म्याच्या ठायीं । जरी म्हणाल देहाविषयीं । तेंही न घडे गा पाहीं । तो देहाचे ठायीं योजेना ॥ २१ ॥

पंचात्मकेशु भूतेषु समानेषु च वस्तुतः । को भवानिति वः प्रश्नो वाचारंभो ह्यनर्थकः ॥ २३ ॥

आदि ब्रह्मा अंतीं मशक । देह तितुका पांचभौतिक । तेथ तूं कोण म्हणावया देख । वेगळीक दिसेना ॥ २२ ॥ कटक कुंडलें मुकुट माळा । करमुद्रिका कटिमेखळा । अलंकार पाहतां डोळां ।

—देहादिकांहून अगदीं पृथक् असलेल्या आत्म्याचें ज्ञान झालें असतां आत्मनिष्ठ झालेल्या पुरुषाच्या रागद्वेषांचा असंभव होतो व विषय त्यामुळें व चित्त यांचा वियोग आपोआपच होतो, हें सांगण्यासाठीं प्रश्नाच्या खंडनाचें निमित्त करूनच हंस पुढील तीन श्लोकांनीं आत्मानात्मविवेक सांगतो—

हंस उवाच—हंस म्हणाला— [हा तुमचा प्रश्न आत्म्याविषयीं आहे कीं, त्याची उपाधि असा जो भूतसंघ त्यांविषयीं आहे !] यदि आत्मनः तर्हि—जर आत्म्याविषयीं असेल तर, तस्य वस्तुनः अनानात्वं—त्या परमार्थरूप वस्तूला अनानात्व म्ह० एकत्व आहे. विप्राः वः ईदृशः प्रश्नः कथं घटेत—अहो ब्राह्मणहो ! तुम्ही केलेला हा अशा प्रकारचा म्ह० अनेकांतील तुम्ही एक कोण अशा स्वरूपाचा प्रश्न कसा संभवेल ! वक्तुः वा मे कः आश्रयः—किंवा उत्तर देणारा जो मी त्या माझा कोण आश्रय आहे ! [म्हणजे आत्मा जर निर्विशेष आहे, तर जाति, गुण इत्यादि कोणत्या विशेषाचा आश्रय करून मीं उत्तर द्यावें ! असा याचा भावार्थ.] २२.

(हंसानें उत्तर दिलें कीं,) परमात्मा सगळा एक आहे. तेथें ' मी-तूं ' याचा प्रवेशच नाहीं. तेव्हां ' तूं कोण ' हा जो प्रश्न केलास ती केवळ शाब्दिक बडबड आहे. १५ तुम्ही जो प्रश्न केलांत त्याचे उत्तर देण्यास वक्त्याला आधारच नाहीं. कारण त्याला ' मी-तूंपणा ' दिसत नाहीं. १६ तुम्ही न जाणतां विचारलेंत; पण मी जाणत असून काय सांगूं ! ' मी, तूं ' पणाच मुळीं नाहीं. तुम्ही विचारिलेला प्रश्नच मिथ्या आहे. १७ नाम-रूप; वर्ण-व्यक्ति, स्वजाति-विजाति हें कांहीं नाहीं. यास्तव हे विप्रहो ! तुमचा प्रश्न खरा होऊं शकत नाहीं. १८ चारी पुरुषार्थ पूर्ण करणारी, अशी ब्राह्मणनांवाची प्रसिद्धि आहे. तेव्हां तुम्ही ज्ञानाविषयीं असा प्रश्न करणें योग्य नव्हे. १९ जेथें अनेकत्व असेल, तेथें ' तूं कोण ' असें विचारणें संभवतें. आत्म्याच्या ठिकाणीं असा प्रश्न केव्हाहि युक्त नाहीं. २० ' आत्म्याविषयीं जरी प्रश्न संभवत नसला, तरी देहाविषयीं तर संभवतोना ! ' असें जर म्हणाला तर तेंहि योग्य नाहीं. कारण देहाला तो प्रश्न लागूं होत नाहीं. ३२१.

पंचात्मकेशु भूतेषु समानेषु—देवमनुष्यादिकांचे देह पंचभूतात्मक आहेत, त्यामुळें समान आहेत. शिवाय, वस्तुतः—परम कारणरूपानेंहि ते अभिन्न आहेत, यास्तव कः भवान्—' आपण कोण, ' इति वः प्रश्नः—असा तुमचा प्रश्न, वाचारंभ—भूतसंघाविषयीं जरी असला तरी तो केवळ वाणीनेंच आरंभिलेला आहे, हि अनर्थकः—कारण तो व्यर्थ आहे. [विकार केवळ वाङ्मात्र आहेत, घटादि हें केवल नाम आहे, मृत्तिकाच केवल सत्य आहे, अशा अर्थाची छान्दोग्य श्रुति आहे. छा. भा. ६. १. ४. पृ. ४१३.] २३.

आब्रह्मस्तंबपर्यंत म्ह० ब्रह्मदेवापासून सूक्ष्म जंतूपर्यंत जेवढीं शरीरें आहेत, तेवढीं सगळीं पांचभौतिक आहेत. त्यांत ' तूं कोण ' असें विचारण्यास निराळी जागाच नाहीं. २२ हातांतील कडें, कानांतील कुंडलें,

सुवर्णावेगळा अंशु नाहीं ॥ २३ ॥ कां घडा गाडगे बेळणी । परळ रांजण माथणी । हें मृत्तिकेवांचुनी। आन कांहीं असेना ॥ २४ ॥ तेवी सर्व देहीं देहत्वें जाण । पांचभौतिक समसमान । तेथ म्हणावया तूं कोण । वेगळेपण असेना ॥ २५ ॥ वस्तु वस्तुत्वें समसमान । भूतें भूतत्वें समान जाण । तेथ प्रश्नोक्ति वाचारंभण । 'तूं कोण' हें अनर्थू ॥ २६ ॥ हो का आपणियां आपण । जो कोणी पुसेल तूं कोण । तो अतिभ्रमें भुलला जाण । निजात्मज्ञान विसरला ॥ २७ ॥ विचारितां प्रश्नाचा अर्थू । एवढा दिसतसे अनर्थू । कांहीं भासेना परमार्थू । तूं कोण हा व्यर्थू प्रश्न तुमचा ॥ २८ ॥ देहासी तूं कोण ऐसें । आत्मा जैं स्वयें पुसे । तैं आत्मत्वा लागलें पिसे । अतिभ्रंशें भूलला ॥ २९ ॥ दोराअंगीं सर्प नसें । त्यावरी तो भ्रमें भासे । त्या सर्पातें दोरू पुसे । तूं कोण ऐसें तें मिथ्या ॥ ३३० ॥ या रीतीं त्यांचें प्रश्नखंडन । उद्धवा तैं म्यां केलें जाण । तेणें भेदाचें निरसन । वचनोक्तीं जाण दाविलें ॥ ३१ ॥ प्रश्नखंडणाचे अर्थे । कैंची करणें कैंचीं भूतें । भेद नाहीं जीवशिवांतें । हेंही त्यांतें सूचिलें ॥ ३२ ॥ याहीवरी जे कथा गहन । परम करणेंसीं अभिन्न । त्यांसी म्यां सांगीतलें निजज्ञान । ऐक सावधान उद्धवा ॥ ३३ ॥

मनसा वचसा दृष्ट्या गृह्यतेऽन्यैरपीन्द्रियैः । अहमेव न मत्तोऽन्यदिति बुध्यध्वमञ्जसा ॥ २४ ॥

मजवेगळा तिळाइतुका । रिता ठावो नाहीं देखा । तेथ व्याप्य आणि व्यापका । अभिन्नत्व देखा सहजचि ॥ ३४ ॥ मनाच्या संकल्पा आलें जें जाण । त्यासी शाब्दिक म्हणती भिन्न । माझ्या स्वरूपाचा विवर्त तें मन । हे अभिन्न खूण कळेना ॥ ३५ ॥ मन लक्षितां सावधान । सर्वथा लक्षेना तें जाण ।

मस्तकावरील मुकूट, गळ्यांतील माळा, बोटांतील अंगठ्या व कमरेची मेखला, हे सर्व अलंकार पाहूं गेलें असतां त्यांत जसा सोन्यावांचून दुसरा कसलाहि अंश दिसत नाहीं, २३ किंवा घडा, मडकें, वेळणी, परळ रांजण, डेरा इत्यादि भांडीं मातीचींच बनविलेलीं असतात. तिच्यावांचून त्यांत दुसरें काहीं नसतें. २४ त्याप्रमाणें सर्व देहांमध्येंहि पांच भूतें देहत्वानें समसमान असतात. त्यांत 'तूं कोण' असें विचारावयास वेगळेपणाच नाहीं. २५ आत्मतत्त्व वस्तुत्वानें सर्वत्र सम; भूतें भूतत्वानें सम; तेथें 'तूं कोण' असा वाङ्मात्र प्रश्न संभवत नाहीं. २६ जो कोणी स्वतःच स्वतःला 'तूं कोण' असा प्रश्न विचारतो तो आत्मज्ञान विसरून अतिशय भ्रमानें भुलला आहे. असें समजावें. २७ तुमच्या प्रश्नाच्या अर्थाचा विचार केला असतां इतका अनर्थ दिसतो. त्यांत कांहींच परमार्थ भासत नाहीं. तेव्हां तूं कोण हा तुमचा प्रश्न व्यर्थ आहे. २८ आत्मा स्वतःच जर देहाला 'तूं कोण' असें विचारूं लागला तर आत्म्यालाच वेड लागलें आहे, तो अतिशय भ्रांतीनें भ्रमांत पडला आहे, असेंच म्हणावें लागेल. २९ दोरीच्या अंगीं सर्पपणा मुळींच नसतो. पण भ्रमानें ती दोरी सर्पच भासते. त्या सर्पाला जर दोरीनें 'तूं कोण' असें विचारिलें, तर तें विचारिणें, मिथ्याच होणार ! ३३० उद्धवा ! याप्रमाणें मी त्याच्या प्रश्नाचें खंडन केलें व त्यायोगें द्वैताचें निरसन करून दाखविलें. ३१ प्रश्नखंडनाच्या निमित्तानें इंद्रियें कोठचीं व भूतें कोठचीं ! जीव-शीव यांत भेद मुळींच नाहीं, हेहि त्यांना सुचविलें. ३२ परमकारणाहून अभिन्न अशी जी याहिपेक्षां गहन कथा म्ह० आत्मज्ञान तेंहि हे उद्धवा ! सावधान चित्तानें ऐक. ३३३.

—पण हे प्रपंचात्मकत्व प्रत्यक्षादिकांनीं सिद्धच आहे, म्हणून परम कारणाच्या अभेदाचेंच उपपादन करितात—

मनसा वचसा दृष्ट्या अन्यैः अपि इंद्रियैः गृह्यते–मन, वचन व दृष्टि आणि इतर इंद्रियेंहि यांच्यायोगानें जें जें ग्रहण केलें जातें, **तत् अहं एव**–तें मीच आहे. **मत्तः अन्यत् न**–माझ्याहून पृथक नाहीं, **इति अंजसा बुध्यस्व**–असें तत्त्वसाक्षात्कारानें जाण.[या कथनानेंच मी सर्वात्मक आहें हेंहि साक्षात् सांगितल्यासारखें होतें.] २४.

माझ्यावांचून तीळभरहि रिकामी जागा कोठें सांपडणार नाहीं. त्यामुळें व्यापक व व्यापणारा यांचें ऐक्यच होतें. ३४ जें मनाच्या संकल्पांचा विषय होतें त्याला केवल शब्दमात्र भिन्न म्हणतात. कारण मन हा माझ्याच स्वरूपाचा अन्यथा परिणाम आहे. परंतु ही एकत्वाची खूण त्यांना कळत नाहीं. ३५ सावधान चित्तानें मन काय

परब्रह्महीं अलक्ष्य पूर्ण । दोनी समान चिद्रूपें ।। ३६ ।। शिंपीच्या अंगी रुपें आभासे । तेंचि तेथें साचें नसे । माझ्या स्वरूपीं मन तैसें । मिथ्या भासे कल्पनामात्र ।। ३७ ।। विचारितां शब्दमहिमान । शब्द-स्वरूपे ज्ञानघन । ज्ञानार्थेंवीण वचन । अल्पही जाण असेना ।। ३८ ।। वक्ता वाच्य वचन । तीनी मीचि आहे जाण । बोलु बोलका मजवीण । दुसरा जगीं कोण असे ।। ३९ ।। मी वेद जाण पां वेदांचा । प्रणवरूप मीचि साचा । मुख्य वाचेची मीचि वाचा । वेगळा शब्दाचा ठावो नाहीं ।। ३४० ।। दृष्टीचें जें देखणेंपण । देखणें तेंचि मुख्य ज्ञान । तेंचि जाण ब्रह्म पूर्ण । चैतन्यघन निजदृष्टीं ।। ४१ ।। मीचि डोळा मीचि देखता । दृश्य द्रष्टा मीचि तत्त्वतां । मजवेगळी देखणी अवस्था । नाहीं सर्वथा तिहीं लोकीं ।। ४२ ।। मीच डोळियांचा निजडोळा । मी सर्वांगदेखणा सोज्ज्वळा । मजवेगळी देखणी कळा । नाहीं जिव्हाळा आणिकांचा ।। ४३ ।। मीचि शब्दांतें शद्बविता । मीचि श्रवणांमाजीं श्रोता । ऐशिया एकात्मता पाहतां । शद्ब निःशद्बता परब्रह्म ।। ४४ ।। कान वचन मीचि श्रोता । मीचि जाणता शद्बार्था । ऐकणाही मजपरता । नाहीं तत्त्वतां श्रवणांचा ।। ४५ ।। मीचि घ्राण मीचि वास । मीचि जाणता सुवास । मजवेगळा रहिवास । परिमळास असेना ।। ४६ ।। रसना रसज्ञत्वें चोखडी । परी ते केवळ चामडी । कापून सोडिल्या बापुडी । गोडी अगोडी ते नेणे ।। ४७ ।। मीचि रस मीचि रसना । स्वादु सेविता मीचि जाणा । मजवेगळा चवीचाखणा । रसज्ञपणा आन नाहीं ।। ४८ ।। इतर इंद्रियप्रवृत्ती । त्याही मद्रूप जाण निश्चितीं । मी सर्वात्मा आत्ममूर्ती । क्रियाशक्ती तेही मीचि ४९ ।। पांचभौतिक देहाचा गोळा । भ्रांत म्हणती मजवेगळा । चुकोनि व्यापका सकळा । तो कोठें निराळा राहों लाहे ।। ३५० ।। जैसे जळींचे जळतरंग । जळरूपें जळीं क्रीडती चांग । तैसे माझ्या स्वरूपीं सांङ्ग । देह अनेग मद्रूपें ।। ५१ ।। हो कां घृताची पुतळी । थिजोनि जाली एके काळीं । परी ते नव्हे घृतपणावेगळी । तेवीं भूतें

आहे हें पाहूं लागलें तर तें कांहीं केल्या दिसत नाहीं. परब्रह्महि स्वभावतः अलक्ष्य आहे. त्यामुळें चिद्रूपानें तीं दोन्हीं सारखींच आहेत. ३६ शिंपीवर रुपें भासतें. परंतु वास्तविक तें नसतें, त्याप्रमाणें माझ्या स्वरूपांत कल्पनेनें मन मिथ्याच भासतें. ३७ शब्दाच्या माहात्म्याचा विचार केला असतां तो स्वरूपानें ज्ञानघनच आहे. ज्ञानार्थावांचून वचन मुळींच संभवत नाहीं. ३८ वक्ता, वाच्य व वचन हीं तिन्हीं मीच आहें. भाषण व बोलणारा माझ्यावांचून जगांत दुसरें कोणीहि नाहीं. ३९ वेदांचा वेद मीच आहें.ओंकाररूप मीच आहें, वाचेची वाचा मीच आहें. शब्दाला दुसरें वेगळें ठिकाणच नाहीं. ३४० डोळ्यांची जी पहाण्याची शक्ति, तेंच मुख्य ज्ञान व पूर्ण ब्रह्म आहे. आत्म-दृष्टिच चैतन्यघन आहे. ४१ डोळाहि मीच व पहाणाराहि मीच. दृश्य व द्रष्टा वास्तविक मीच आहें. माझ्या-वांचून सगळ्या त्रिभुवनांत दुसरी पहाण्याची शक्ति नाहीं. ४२ मीच डोळ्यांचा डोळा आहें. मी सर्वांगानें सोज्वल देखणा आहें. माझ्याहून भिन्न देखणी कळा नाहीं. तिच्यांत दुसरा कसलाहि संपर्क नाहीं. ४३ शब्दांना बोलविणारा मीच आहें. श्रवणांतील ऐकणारा मीच आहें. अशी एकात्मता पाहिली कीं, शब्द व निःशब्द हीं दोन्हीं परब्रह्मच आहे. ४४ कान, शब्द ऐकणारा व शब्दार्थ जाणणारा मीच आहें. माझ्यावांचून दुसरा कोणीहि भाषण ऐकणारा नाहीं. ४५ नाक व वास दोन्हीं मीच आहे. सुगंध जाणणाराहि मीच आहें. माझ्या वांचून सुवासाचा दुसरा आश्रय नाहीं. ४६ जीभ रस जाणणारी म्हणून प्रसिद्ध आहे. परंतु ती केवल कातड्याची बन-विलेली, तिला कापून टाकल्यावर ती बिचारी गोडी, अगोडी काय जाणणार ! ४७ मीच रस, रसना व रसाचें सेवन करणारा आहें. माझ्यावांचून चव जाणणारा दुसरा कोणी रसज्ञ नाहीं. ४८ इतर सर्व इंद्रियांची प्रवृत्तिहि मद्रूपच आहे. मी सर्वात्मा, आत्ममूर्ति व क्रियाशक्ति आहें, ४९ पंचमहाभूतांपासून झालेला हा देहाचा जड गोळा माझ्याहून वेगळा आहें, असें भ्रांत लोक बोलतात. परंतु मज सर्व व्यापकाला चुकवून तो निराळा कोठें राहूं शकणार ! ३५० पाण्यावरील तरंग जसे पाण्यावर अनेक आकारानें क्रीडा करितात तशीं ही अनेक प्रकारचीं शरीरें माझ्याच स्वरूपांत मद्रूपानेंच लीला करीत असतात. ५१ तुपाची बाहुली बनविली तर ती थिजून कांहीं वेळ तुपाहून वेगळी भासेल,

झालीं मजमाजीं ॥ ५२ ॥ जळीं जळाची जळगार । जळामाजीं भासली साकार । तैसें मजमाजीं चराचर । अभिन्न साचार मद्रूपीं ॥ ५३ ॥ जैसा एकला एक तंतू । सुतेंचि विणिला सुताआंतू । त्यां वेगळाले म्हणती तांतू । तैसें मजआंतू जग भासे ॥ ५४ ॥ तंतू पाहतां वस्त्र न दिसे । आत्मा लक्षितां जगचि नसे । येणें अद्वैततत्त्वसौरसें । आहे अनायासें परब्रह्म ॥ ५५ ॥ ऐसा अद्वैतबोधें मी एकू । सर्वात्मा सर्वात्मकू । हा निश्चयेंसीं विवेकू । बुद्धिबोधें निष्टंकू जाणावा ॥ ५६ ॥ मीचि एक सर्वां ठायीं । हेंचि दृढ धरिल्या पाहीं । मग साधनाचें कार्य नाहीं । ठायींच पाहीं नित्यमुक्त ॥ ५७ ॥ सर्वात्मा चैतन्यघन । अतिसुलभ हें निजज्ञान । उद्धवा म्यां हें सांगोन जाण । भेदखंडण केलें त्यांचें ॥ ५८ ॥ सनकादिकांचा पूर्वील प्रश्न । जो ब्रह्मादिकां अटक जाण । त्याचेंही म्यां प्रतिवचन । विवंचूनि ज्ञान सांगीतलें ॥ ५९ ॥

गुणेष्वाविशते चेतो गुणाश्चेतसि च प्रजाः । जीवस्य देह उभयं गुणाश्चेतो मदात्मनः ॥ २५ ॥

तुम्हीं ब्रह्मयासी पुसिलें पाहीं । विषय रिघाले चित्ताच्या ठायीं । चित्त जें रिघालें विषयीं । तें वेगळें कांहीं निवडेना ॥ ३६० ॥ विषयत्यागेंविण । कदा नव्हे ब्रह्मज्ञान । त्याही त्यागाची त्यागिती खूण । ऐका संपूर्ण सांगेन ॥ ६१ ॥ चित्त विषय दोनी पाहें । तें जीवाचें निजस्वरूप नव्हे । हे उपा-

---

पण ती तूपपणापासून कांहीं वेगळी नसते. त्याप्रमाणें सर्व भूतें माझ्यापासून झालीं आहेत. ५२ पाणी गोठून त्याचें बर्फ बनलें तर तें पाण्यांत आकारयुक्त भासतें. त्याप्रमाणें माझ्यामध्यें ही सर्व चराचर सृष्टि मद्रूपानेंच अभिन्न आहे. ५३ कापसाचा एकच एक तंतु असतो. तो सुताच्या रूपानें सुतांतच विणलेला असतो. पण त्यालाच वेगळाले तंतु म्हणतात. त्याप्रमाणें हें सर्व जगत् माझ्यामध्यें भासतें. ५४ तंतु पाहूं गेलें असतां वस्त्र जसें दिसत नाहीं, त्याप्रमाणें आत्मा प्रतीत झाला कीं, जगत् दिसत नाहीं. याप्रमाणें अद्वैत ऐक्यभावानें अनायासानें परब्रह्मच आहे. ५५ अशा अद्वैत बोधानें मी एक आहें, सर्वात्मा व सर्वरूप आहें. हाच निश्चित विवेक आहे. आपल्या बुद्धीनेंच तो निश्चयानें जाणावा. ५६ सर्व ठिकाणीं मीच एक आहें, अशी दृढ बुद्धि केली असतां मग साधनांचें कांहीं कारणच उरत नाहीं. जागच्याजागीं नित्य मुक्ति मिळते. ५७ उद्धवा ! त्यांच्या द्वैतबुद्धीचें मीं खंडन केलें. चैतन्यघन परमात्म्याचें आत्मज्ञान अति सुलभ आहे. तें मी तुला आतां सांगतों. ५८ सनकादिकांच्या ज्या पहिल्या प्रश्नानें ब्रह्मदेवादिकांची मति कुंठित झाली, त्या प्रश्नांचेंहि उत्तर ज्ञानाचें विवरण करून मीं त्यांस सांगितलें. ३५९.

—याप्रमाणें प्रश्नाच्या खंडन-मिषानेंच आत्मस्वरुपाचें निरूपण करून ब्रह्मदेवालाहि ज्याचा परिहार करितां येणार नाहीं असा जो सनकादिकांनीं प्रश्न केला होता, त्याचें उत्तर येथून अध्यायसमाप्तीपर्यंत देतात. त्याचा भावार्थ असा —' कर्तृत्व-भोक्तृत्वादि रूपत्वानेंच विषयांनीं संग्रथित झालेलें बुद्ध्याधि-शब्दवाच्य चित्त हेंच जर जीवाचें स्वरूप असेल, तर त्यापासून त्याचा वियोग होणार नाहीं. पण जीवाचें स्वरूप मी परब्रह्मच आहें व चित्ताच्या अध्यासानें तत्स्वभावत्वानें विषयांनीं संग्रथित आहें म्हणून ' मी ब्रह्म आहें ' या भावनेनें व विषयांच्या मिथ्यात्वानुसंधानानें सर्व विषयांविषयीं विरक्त होऊन भगवानाचें भजन करणाऱ्या पुरुषाचें परिपूर्ण स्वरूपानें अवस्थान होतेंच. यास्तव —

प्रजाः-हे पुत्रांनो ! गुणेषु चेतः आविशते-गुणांमध्यें चित्त प्रवेश करितें, चेतसि च गुणाः-आणि चित्तांत गुण प्रवेश करितात हें खरें आहे. एवं गुणाः च चेतः उभयं मदात्मनः जीवस्य देहः-याप्रमाणें परस्पर ग्रथित झालेले गुण व चित्त हीं दोन्ही मिळून मद्रूप म्ह० ब्रह्मरूप असलेल्या जीवाचा देह म्ह० अध्यस्त-आरोपित उपाधि आहे. तें त्याचें स्वरूप नाहीं. २५.

तुम्ही ब्रह्मदेवाला विचारिलेंत कीं, एकदा विषय चित्तांत शिरले व चित्त विषयांत गुंतलें म्हणजे त्यांना एकमेकांपासून दूर करितां येत नाहीं. ३६० विषयांचा त्याग केल्यावांचून ब्रह्मज्ञान केव्हांहि प्राप्त होत नाहीं. यास्तव त्या त्यागाचेंहि लक्षण सविस्तर सांगतों, ऐक. ६१ चित्त आणि विषय यांतील एकहि जीवाचें आत्मस्वरूप

धिवशें दोनीं देहें । लागलीं पाहें प्रवाहरूपें ॥ ६२ ॥ कर्तृत्वभोक्तृत्वरूपें जाण । विषयी जाहलें अंतःकरण । तेणें उभय देहांचें कारण । अहंकारू जाण खवळला ॥ ६३ ॥ तेणें भुलविलें चित्त विषयांसी । विसरला निजात्मस्वरूपासी । तेणें तदात्मता जीवामनांसी । अतिशयेंसी दृढ झाली ॥ ६४ ॥ चित्त जीवाचें स्वरूप होतें । तरी विषयीं लोलुप नव्हतें । हा उभय उपाधी जीवातें । अभिमानें तेथें वाढविला ॥ ६५ ॥ जेवीं कां विसरोनी आपणासी । स्वप्नींचिया स्वप्नदेहासी । अतिप्रीति वाढे पुरुषासी । तैशी दशा जीवासी येथ झाली ॥ ६६ ॥ नित्य शुद्ध मुक्त जाण । जीवाचें स्वरूप चैतन्यघन । त्यासी अभिमानें हें जाण । मिथ्या बंधन लाविलें ॥ ६७ ॥ यालागीं सांडावा अभिमान । तैं तुटे सकळ बंधन । अभिमान निरसावया जाण । माझें भजन करावें ॥ ६८ ॥ परी वैराग्येंवीण माझी भक्ती । पोंचट जाण पां निश्चितीं । जैं वैराग्ययुक्त उपजे भक्ती । तैं मद्रूपप्राप्ती जीवासी ॥ ६९ ॥ हृदयीं विषयांचा अभावो । आणि सर्वांभूतीं भगवद्भावो । वैराग्ययुक्ती पहा हो । तैं जीवासी निर्वाहो मद्रूपीं ॥ ३७० ॥ जीव मद्रूपचि तत्त्वतां । त्यासी देहाभिमान जीविता । सदा भूतीं मद्भावो पाहतां । सिद्ध मद्रूपता उद्बोधे ॥ ७१ ॥ जीवासी जाहल्या मद्रूपता । सहजें त्यागू विषयचित्ता । देखें उभयांसी मिथ्यता । न त्यागितां हा त्यागू ॥ ७२ ॥ चित्तविषयांचा त्यागू । पुत्र हो तुम्हीं पुशिला चांगू । तो म्यां सांगितला अव्यंगू । हा ज्ञानमार्गू अतिशुद्ध ॥ ७३ ॥ म्हणाल मिथ्या उभयांचें भान । तरी एवढें जीवासी बंधन । लागावया कांहीं कारण । ऐसें कांहीं मन कल्पील जरी ॥ ७४ ॥ गगनसुमनांची माळा । कधीं कोणीं लेइली गळां । तारू बुडे मृगजळां । हें कोणीं तरी डोळां देखतें काय ॥ ७५ ॥ सत्यासी बाधक । कदा बाधूं न शके लटिक । ऐसें कल्पाल तुम्ही कल्पक । तोही परिपाक अवधारा ॥ ७६ ॥ तरी परिसा सावधान । तें मी सांगेन निरूपण । जेणें जीवासी बंधन । लटिकेंचि जाण दृढ झालें ॥ ७७ ॥

नाहीं. मायेच्या उपाधीमुळें सूक्ष्म व स्थूल या दोन्हीं शरीरांस तीं प्रवाहरूपानें लागलीं आहेत. ६२ कर्तृत्व व भोक्तृत्व या रूपानें अंतःकरण विषयी बनलें. त्यामुळें दोन्ही देहांना कारण होणारा अहंकार खवळला. ६३ त्या अहंकारानें चित्ताला विषयांमध्यें भुलविलें. जीव आत्मस्वरूपाला विसरला व जीव आणि मन यांचें दृढ एकीकरण झालें. ६४ चित्त जर जीवाचें स्वरूप असतें तर तें विषयांत आसक्त झालें नसतें. अहंकारानें ही दोन प्रकारची उपाधि वाढविली. ६५ ज्याप्रमाणें एखाद्यानें स्वप्नांत पाहिलेल्या देहावर अत्यंत प्रेम करावें, त्याप्रमाणें आपल्याला विसरून जीवाची स्थिति झाली. ६७ नित्य-शुद्ध-मुक्त, चैतन्यघन असें जीवाचें स्वरूप असतां त्याला अभिमानानें मिथ्या बंधनांत टाकिलें. ६७ यास्तव अभिमान सोडावा म्हणजे सर्व बंधनें तुटतात. अभिमान नाहींसा होण्यासाठीं माझें भजन करावें. ६८ परंतु विरक्तीवांचून माझी भक्ति करणें पोकळ आहे, हें खात्रीनें जाण. जेव्हां माझी वैराग्ययुक्त भक्ति करावी तेव्हां जीवाला माझ्या स्वरूपाची प्राप्ति होते. ६९ हृदयांत विषयासक्ति नसणें व सर्व प्राणिमात्रांत भगवद्भाव ठेवणें हेंच वैराग्याचें स्वरूप आहे. त्यामुळें जीवाची माझ्या स्वरूपांत स्थिर स्थिति होते. ३७० जीव वस्तुतः माझेंच स्वरूप आहे. त्याला देहाभिमानानें जीवत्व आलें आहे. पण भूतांमध्यें सर्वदा मद्भाव पाहिला असतां त्याची स्वाभाविक मद्रूपता जागृत होते. ७१ जीव मद्रूप झाला असतां विषय व चित्त या दोहोंचा स्वभावतःच त्याग घडतो. त्या दोहोंनाहि मिथ्या समजणें, हा त्याग न करितांच त्याग आहे. ७२ मुलांनो ! चित्त व विषय यांचा त्याग तुम्ही फार चांगला विचारलांत व त्याचें मीं यथार्थ उत्तर दिलें. हा ज्ञानमार्ग अतिशुद्ध आहे. ७३ 'दोहोंचेंहि भान जर मिथ्या तर जीवाला एवढें बंधन लागण्याचें काय कारण !' असें कदाचित् तुम्ही म्हणाल. ७४ तसेंच आकाशपुष्पांची माळ कधीं कोणीं गळ्यांत घातली आहे का ! किंवा नौका कधीं मृगजळामध्यें बुडाली आहे का ! ७५ सत्याला मिथ्या कधीं बाधूं शकत नाहीं, असेंहि तुम्हांला वाटेल. ७६ तर त्याचाहि निश्चय सावधानपणानें ऐका. जीवाचें खोटेंच बंधन दृढ कसें झालें तेंहि मी तुम्हांला सांगतों. ३७७.

गुणेषु चाविशच्चित्तमभीक्ष्णं गुणसेवया। गुणाश्च चित्तप्रभवा मद्रूप उभयं त्यजेत् ॥ २६ ॥

अनादिसंसारमाळेच्या ठायीं । नित्य विषय भोगिले पाहीं । ते ठसावले चित्ताच्या ठायीं । वारंवार देहीं सेवितां ॥ ७८ ॥ चित्तासी विषयांची अतिप्रीती । तेणें वाढली विषयासक्ती । तें प्रवेशलें विषयांप्रती न निघे मागुती सर्वथा ॥ ७९ ॥ बुद्धीसी विषयांचें ध्यान । चित्तीं विषयांचें चिंतन । विषयांलागीं तळमळी मन । विषयाभिमान तेणें झाला ॥ ३८० ॥ विषयीं खवळल्या अभिमान । देहद्वयाचें दृढ बंधन । जीवासि लागलें अति कठिण । परम दारुण दुस्तर ॥८१॥ मग त्या देहाचे विकार । ते आपुले मानी साचार । अंध पंगू मी कुष्ठी नर । स्वरूपें सुंदर मी ज्ञाता ॥ ८२ ॥ मी देह हें मानोनि चित्तें । निजरूप विसरला भावार्थें । हें मिथ्याबंधन जीवातें । सत्यत्वें त्यातें अभिमानू ॥ ८३ ॥ मिथ्या बुद्धिबळाचा खेळ । हारी जैती ही निष्फळ । तरी खेळत्या अभिमान प्रबळ । तैंसे देहबळ जीवासी ॥ ८४ ॥ त्या खेळाचे घोडे हस्ती । पहिलें काय जीत होती । मारिलें म्हणोनि भांडती । तेवीं जन्मपंक्ती जीवासी ॥ ८५ ॥ हें निरसावया जीवबंधन । निःशेष सांडावा देहाभिमान । अभिमान सांडितांचि जाण । मद्रूपपण सहजेंचि ॥ ८६ ॥ जीवें साधिल्या मद्रूपता । सहजेंचि त्याग विषयचित्ता । माझे स्वरूपीं अहंता । नाहीं वार्ता विषयांची ॥ ८७ ॥ जेवीं बुद्धिबळांचा खेळ मोडे । जेवीं राजप्रधानादि लांकुडें । तेवीं अहंकारू निमाल्यापुढें । प्रपंच उडे मिथ्यात्वें ॥ ८८ ॥ जेवीं स्वप्नींचा स्वप्नाभिमान । दारा पुत्र स्वजन धन । स्वदेहेंसीं मिथ्या जाण । जागेपण झालिया ॥ ८९ ॥ तेवीं पावलिया माझी सरूपता । कैंचा देह कैंची अहंता । विषयचित्तांची वार्ता । नाहीं अवस्था गुणत्रया ॥ ३९० ॥ तिहीं अवस्थीं अवस्थाभूत । जागृतिस्वप्नसुषुप्तिमंत ।

—म्हणून—

अभीक्ष्णं गुणसेवया गुणेषु च आविशत् चित्तं चित्तप्रभवाः च गुणाः—वारंवार गुणांच्या सेवनानें म्ह० त्यांच्या संस्कारानें गुणांमध्यें प्रवेश करणारें चित्त व पुनरपि वासनारूपानें चित्तांत रहाणारे गुण, **उभयं मद्रूपः त्यजेत्**—असा या दोहोंचाहि मद्रूप होऊन त्याग करावा. २६.

अनादि संसारमालिकेंत नित्य विषयसेवन केलें व वारंवार देहानें त्यांचा भोग घेतल्यामुळें ते चित्तांत ठसले. ७८ चित्ताला विषयांची अतिशय आवड असल्यामुळें विषयासक्ति वाढली व तें विषयांत शिरलें. तेथून परत येईनासें झालें. ७९ बुद्धीला विषयांचें ध्यान, चित्तांत विषयांचें चिंतन व मन विषयासाठीं तळमळ करूं लागलें, त्यामुळें विषयाभिमान उत्पन्न झाला. ३८० विषयांचा अभिमान खवळला म्हणजे जीवाला अति कठिण, भयंकर व दुस्तर असें देहद्वयाचें बंधन लागतें ८१ व मग तो जीव मी आंधळा, मी पांगळा, मी कोड फुटलेला, मी सुंदर, मी विद्वान् इत्यादि सगळे देहाचे विकार आपलेच मानूं लागतो. ८२ 'मी देह' असें मनानें मानून तो आत्मस्वरूपाला विसरतो. जीवाचें जें मिथ्याबंधन तें सत्य समजून त्यांवर अभिमान ठेवितो. ८३ बुद्धिबळाचा डाव मिथ्या असतो. त्यांतील हरणें व जिंकणें निष्फळ असतें. तरीहि खेळणाराला त्याचा मोठा अभिमान असतो! त्याप्रमाणें जीवाला देहाविषयीं अभिमान असतो. ८४ बुद्धिबळांतील हत्ती, घोडे पाहिले तर ते कांहीं सजीव थोडेच असतात; पण त्यांना मारिलें म्हणून खेळणारे काय भांडत असतात! त्याप्रमाणें जीवाला जन्मपरंपरा आहे. ८५ जीवाचें हें बंधन नाहींसें करण्यासाठीं देहाभिमान सर्वथा टाकावा. एकदां अभिमान सोडला कीं, सहज तो मद्रूप होतो. ८६ जीवानें मद्रूपता साधिली कीं, चित्त व विषय यांचा त्याग सहजच घडतो. माझ्या स्वरूपांत अहंकार व विषय यांची गंधवार्ताहि नाहीं. ८७ बुद्धिबळांचा खेळ जसा मोडतो, किंवा त्यांतील राजा, प्रधान वगैरे सर्व जसे लाकडाचेच असतात, त्याप्रमाणें अहंकार नाहींसा होतांच प्रपंच मिथ्यात्वामुळें नाश पावतो. ८८ स्वप्नांतील स्त्री, पुत्र, आप्त, द्रव्य, आपला देह यांवरील स्वप्नाभिमान जागेपणीं जसा मिथ्या ठरतो, ८९ त्याप्रमाणें माझ्या स्वरूपाला प्राप्त झाल्यावर देह कोठचा व अहंकार कोठचा! विषय व चित्त यांची वार्ता कोठची! गुणत्रयांची स्थितिहि नाहीं. ३९० 'पण तीन्ही अवस्थांत अवस्थावान् होणारा,

तो होऊनि जीव निरवस्थ । परमात्म्यांत मिळे कैसा ॥ ९१ ॥ ऐसा कांहीं कल्पाल भावो । त्या जीवासी अवस्थांचा अभावो । त्रिगुणगुणांचा स्वभावो । या वृत्ति पहा वो बुद्धीच्या ॥ ९२ ॥

जाग्रत्स्वप्नः सुषुप्तं च गुणतो बुद्धिवृत्तयः । तासां विलक्षणो जीवः साक्षित्वेन विनिश्चितः ॥ २७ ॥

तिन्ही गुणांच्या तिन्ही वृत्ती । सत्वगुणाची जागृती । रजोगुणें स्वप्नप्राप्ती । केवळ सुषुप्ती तमाची ॥ ९३ ॥ या तिनी अवस्था पाहीं । दृढ जडल्या बुद्धीच्या ठायीं । जीवासी यांचा संबंध नाहीं । तो वेगळा पाहीं साक्षित्वें ॥ ९४ ॥ जैं जीवाअंगीं अवस्था जडे । तैं तो अवस्थेमाजीं बुडे । तिहींचें साक्षित्व त्यासी न घडे । ऐक निवाडें अवस्था ॥ ९५ ॥ जागृतीमाजीं नाहीं स्वप्न । स्वप्न जागृतीसी नेणे जाण । सुषुप्ती नेणे जागृतिस्वप्न । सुषुप्तीचें भान त्या नेणती ॥ ९६ ॥ जीवू अवस्थांचा अभिमानी । हेंही न घडे जीवालागुनी । विश्व तैजस प्राज्ञ तिन्ही । अवस्थाभिमानी हे तिहींचे ॥ ९७ ॥ जो जे अवस्थेचा अभिमानी । तो ते अवस्थेंसवें जाय निमोनी । जीव वेगळा साक्षिपणीं । अवस्थाभिमानी तो नव्हे ॥ ९८ ॥ देहातीत गुणातीत । तिहीं अवस्थां अतीत । द्रष्टा साक्षी निश्चित । जाणता येथ तो जीवू ॥ ९९ ॥ अवस्थाभिमान नाहीं जीविता । तरी कवण भोगी तिनी अवस्था । मी निजलों मीचि जागता । म्यां स्वप्नावस्था देखिली ॥ ४०० ॥ ऐसा प्रत्यक्ष अनुभवू । स्वयें बोलताहे जीवू । हा म्हणाल जीवाचा स्वभावू । ऐक अभिप्रावु सांगेन ॥ १ ॥

जागृति-स्वप्न-सुषुप्ति यांनीं युक्त असलेला जीव अवस्थातीत होऊन परमात्म्यांत कसा मिळेल !' ९१ अशी कांहीं कल्पना कराल तर जीवाच्या ठिकाणीं वस्तुतः अवस्था नाहीं. तीन गुणांचा स्वभाव अशाच त्या बुद्धिवृत्ति आहेत. ३९२.

—अहोपण, जाग्रदादि अवस्थांनीं युक्त असलेल्या जीवाला निर्विकाररूपत्व कसें असेल ! उत्तर—

जाग्रत् स्वप्नः सुषुप्तं च बुद्धिवृत्तयः गुणतः—जाग्रदवस्था, स्वप्न व सुषुप्त या बुद्धीच्या वृत्ति आहेत; पण त्या स्वाभाविक नव्हेत, तर सत्त्वामुळें जागृति, रजामुळें स्वप्न, तमामुळें सुषुप्ति व या तीन्हींमध्यें तुरीय अनुवृत्त आहे, असा पुढें जो क्रम सांगावयाचा आहे, त्याच्या अनुरोधानें या अवस्था तीन गुणांमुळेंच आहेत. जीवः तासां साक्षित्वेन विलक्षणः विनिश्चितः—पण जीव त्या अवस्थांच्या साक्षित्वानें विलक्षण म्ह० अवस्थारहित असाच सर्वथा निश्चित आहे. २७.

सत्त्वगुणाची जागृति, रजोगुणाची स्वप्न, तमोगुणाची केवल सुषुप्ति अशा या तीन गुणांच्या तीन वृत्ति आहेत. ९३ या तीन अवस्था बुद्धीला दृढ जडतात. जीवाचा व यांचा संबंध नाहीं. तो साक्षिरूपानें वेगळाच असतो. ९४ जीवाला जेव्हां ती अवस्था प्राप्त होते, तेव्हां तो त्या अवस्थेंतच बुडून जातो. तीन्ही अवस्थांचें साक्षित्व त्याला घडत नाहीं. त्या अवस्थांचा स्पष्ट निर्णय ऐक. ९५ जागृतींत स्वप्न नसतें. स्वप्नांत जागृति नसते. सुषुप्तींत म्ह० गाढ झोंपेंत जागृति किंवा स्वप्न हीं दोन्हीं नसतात व त्या दोन अवस्थांमध्यें सुषुप्तीचें भान नसतें. ९६ बरें, जीव या तीन अवस्थांचा अभिमानी आहे, असें म्हणावें तर तेंहि घडत नाहीं. कारण विश्व, तैजस व प्राज्ञ हे तिघे त्या तीन अवस्थांचे क्रमानें अभिमानी आहेत. (जागृतीचा अभिमानी विश्व, स्वप्नाचा अभिमानी तैजस व सुषुप्तीचा प्राज्ञ. याविषयीं सविस्तर वर्णन मुंडक भाष्यार्थ पृ. ३६ यांत आहे.) ९७ ज्या अवस्थेचा जो अभिमानी असतो, तो त्या अवस्थेशीं तद्रूप होतो. जीव साक्षित्वानें वेगळाच असतो. तो अवस्थांचा अभिमानी नव्हे. ९८ देहातीत, गुणातीत व तीन्ही अवस्थांहून अतीत, केवळ द्रष्टा, साक्षी, ज्ञाता असा जीव असतो. ९९ ' जीवाला जर अवस्थांचा अभिमान नाहीं, तर मग या तीन अवस्था कोण भोगितो ! मी निजलों, मीं जागा आहें, मी स्वप्न पाहिलें, ४०० असें जीव स्वतः बोलत असल्याचा प्रत्यक्ष अनुभव येतो. तेव्हां हा जीवाचाच स्वभाव आहे ' असें जर म्हणाल तर त्याविषयींचा निर्णय सांगतों, ऐक. ४०१.

यर्हि संसृतिबन्धोऽयमात्मनो गुणवृत्तिदः । मयि तुर्ये स्थितो जह्यात्त्यागस्तद्गुणचेतसाम् ॥ २८ ॥

जो डोल्हारां बैसे यथासुखें । तो न हालतां हाले तेणें हरिखें । उंच नीच खाय झोंके । निजकौतुकें हिंदोळे ॥ २ ॥ हिंदुळतांही प्रबळ । डोल्हाराचि अतिचंचळ । बैसला तो निजनिश्चळ । मानी केवळ मी हालतों ॥ ३ ॥ जीवासी झाली तैशी वाणी । अहंममतेच्या अभिमानीं । तिनी अवस्था स्वयें मानी । जेवीं का स्वप्नीं गृहदारा ॥ ४ ॥ हो कां लोखंडकाम घडतां । लोहाचे घाय अग्नीचे माथां । प्रत्यक्ष दिसती वाजतां । लोहतादात्मतासंयोगें ॥ ५ ॥ तेणें अग्निसंगें वाडेंकोडें । लोहकामचि घडे मोडे । परी अग्नीस घडमोड न घडे । तेणें पडिपाडें जीवू येथें ॥ ६ ॥ जेवीं अग्निवीण लोह न घडे । तेवीं आत्मसंयोगेंवीण पुढें । बुद्धि केवळ जड वेडें । कर्मक्रिया नातुडे सर्वथा ॥ ७ ॥ लोह घडवूनि अग्नि न घडतां । कर्म करवूनि जीवात्मा अकर्ता । तरी वृत्तिसंगें तदात्मता । अहंकर्ता हें मानी ॥ ८ ॥ जीव आपुले प्रकाशता । झाला वृत्तीतें प्रकाश करिता । वृत्ति जीवासी नानावस्था । निजस्वभावतां देतसे ॥ ९ ॥ सूर्यें प्रकाशिलें जळ । जळें केलें प्रतिमंडळ । खळाळ चंचळ निश्चळ । कांपे चळजळ जळकंपें ॥ ४१० ॥ सूर्याची गगनीं नित्य वस्ती । जो जळीं आणिला अधोगती । तेवीं वृत्तीचिया निजख्यातीं । मुक्तातें दाविती बद्ध करूनी ॥ ११ ॥ आत्म्यानें प्रकाशिली वृत्ती । वृत्तीनें आत्म्यासी जीवप्राप्ती । जीवा जीवत्वें देहासक्ती । सुखदुःखप्राप्ती तेणें भोगी ॥ १२ ॥ एवं वृत्तीचिया संगती । वाढली विषयांची आसक्ती । तेणें संसारबंधप्राप्ती । झाली निश्चितीं जीवासी ॥ १३ ॥ हो कां गुणचित्तविषयासक्ती । जरी

——तर मग ' मी जागतों ' इत्यादि प्रत्यय कसा येतो ! उत्तर——

यर्हि अयं संसृतिबंधः आत्मनः गुणवृत्तिदः—जिच्यायोगानें संसार प्राप्त होतो, त्या बुद्धीनें होणारा हा बंध ज्याअर्थी आत्म्याला या गुणवृत्ति देतो, **तस्मात्**—त्याअर्थी, **मयि तुर्ये स्थितः जह्यात्**—मज तुर्यात्म्यामध्यें स्थित होऊन संसृतिबंधाचा त्याग करावा. **तत् गुणचेतसां त्यागः**—असें केल्यानें गुण व चित्त यांचा परस्पर त्याग होतो. २८.

जो सुखानें झोंपाळ्यावर बसलेला असतो, तो स्वतः हलल्यावांचून झोंपाळयाच्या हेलकाव्यानेंच हालतो व आनंदानें मागेंपुढें झोके घेत असतो. २ जोरानें झोंके घेत असतां झोंपाळाच अति वेगानें हालत असतो व त्यावर बसलेला मनुष्य अगदीं निश्चल असतो. तथापि ' मी हालतों ' असें तो केवळ मिथ्याच समजतो. ३ त्याचप्रमाणें जीवाचीहि स्थिति झाली आहे. स्वप्नांत घर, स्त्रीपुत्रादि जसें खरें भासतें त्याचप्रमाणें अहं-ममतेच्या अभिमानानें जीव तीन्ही अवस्था स्वतःच्याच मानितो. ४ लोखंडाचें काम घडत असतां, घणाचे घाव अग्नीच्या डोक्यावर पडतात, असें लोखंड व अग्नि यांच्या संयोगामुळें प्रत्यक्ष दिसतें. ५ अग्निसंयोगानेंच लोखंडाचें काम तत्काल घडवितां किंवा मोडितां येतें. परंतु त्या घडामोडीनें अग्नि लिप्त होत नाहीं. त्याप्रमाणेंच जीव या तीन्ही अवस्थांनीं अलिप्त असतो. ६ अग्निसंयोग झाल्यावांचून लोखंड जसें घडवितां येत नाहीं, त्याप्रमाणें आत्मसंयोगावांचून बुद्धि केवळ जड मूढ असते. तिला कर्म-क्रिया सर्वथा कळत नाहीं. ७ लोखंडाला घडवून अग्नी जसा स्वतः विकारशून्य रहातो, तसाच जीवात्मा कर्म करवून अकर्ता असतो; तो वृत्तीशीं तादात्म्य पावून ' मी कर्ता ' असें मानितो. ८ जीव आपल्या प्रकाशानें वृत्तींना प्रकाशित करितो व वृत्ति आपल्या स्वभावानुसार जीवाला अनेक अवस्था देतात. ९ सूर्यानें जलावर प्रकाश पाडितांच, जल सूर्याचें प्रतिबिंब धारण करितें व तें बिंब जल हलतांच चंचल, जल स्थिर होतांचे निश्चल व जल उचंबळतांच चळचळा कांपत असलेलें भासूं लागतें. ४१० सूर्य नित्य आकाशांत रहाणारा पण त्याला जलानें अधोगतीला नेला, त्याप्रमाणेंच या वृत्तींची प्रसिद्धि आहे. त्या मुक्तांनाहि बद्ध करून दाखवितात. ११ आत्म्यानें अंतःकरणावर प्रकाश पाडितांच, त्यांत त्याचें प्रतिबिंत पडलें व त्यामुळें आत्म्याला जीवत्व प्राप्त झालें. जीवत्वामुळें जीवाला देहाची आसक्ति वाटून त्यायोगें तो सुखदुःख भोगूं लागला. १२ याप्रमाणें वृत्तीच्या संगतीमुळें विषयांची आसक्ति वाढली व जीवाला संसारबंध प्राप्त झाला. १३ सत्त्व-रज-तम हे गुण, चित्त व हे विषय यांवरील आसक्तीमुळें जरी जीवाला बंधप्राप्ति झाली, तरी गुरुकृपेनें विरक्तीचा उपाय योजून विषयवृत्ति

झाली जीवासी बंधप्राप्ती । तरी आवरावी विषयवृत्ती । वैराग्ययुक्तीं गुरुकृपा ।। १४ ।। ऐक गुरुकृपेची मातू । तिहीं अवस्थांमाजीं सततू । जो मी तुरीय गुणातीतू । ते अभ्यासीं लावितू निजबोधें ।। १५ ।। नवल अभ्यासाची कोटी । विषयवृत्तीच्या पाठींपोटीं । मज तुरीयातें दावी दिठी । बोधपरिपाटी निजबोधें ।। १६ ।। मी तुरीया तंव संततु सर्वां असें सर्वगतु । शिष्यवृत्तीसी मजआंतु । गुरु निजस्वार्थु दाखवी ।। १७ ।। सुतावेगळें लुगडें । करूं जातां गा उघडें । तेथ क्रियाचि लाजोनि बुडे । मागें पुढें सूतचि ।। १८ ।। तेवीं साधकासी जाण । विषयांचें विषयभान । माझे स्वरूपीं नव्हेचि भिन्न । चैतन्यघन मीचि मी ।। १९ ।। तेथ नामरूपवर्णभेद । नाहीं कर्म कर्ता विधिवाद । बुडाले प्रणवेंसीं वेद । केवळ शुद्ध मी एक ।। ४२० ।। तेथें भ्रमेंसहित पळाली भ्रांती । क्रियेसहित पळाली प्रवृत्ती । लाजा विराली निवृत्ती । स्वस्वरूपीं वृत्ती विनटली ।। २१ ।। सूर्योदयो जाहल्यापाठीं । समूळ अंधारातें घोंटी । खद्योताची नळी निमटी । नक्षत्रकोटी तत्काळ गिळी ।। २२ ।। तेवीं माझी स्वरूपप्राप्ती । मायेची मावळे स्फूर्ती । लाजा विसरे प्रवृत्तिनिवृत्ति । नित्यतृप्ती स्वानंदें ।। २३ ।। ऐशी माझ्या स्वरूपाची गोडी । जैं साधकां लागे धडफुडी । तैं चित्त विषयातें सांडी । विषयो वोसंडी चित्तातें ।। २४ ।। जीं देंठीं वाढलीं फळें । तींचि परिपाकाचे वेळे । होती देंठावेगळें । देंठू तो फळें धरीना ।। २५ ।। कां मंथूनि काढिलें नवनीत । तें परतोनि घातल्या ताकाआंत । तें ताकेंसीं होय अलिप्त । तैसें चित्त विषयांसी ।। २६ ।। पावल्या माझी स्वरूपता । दैवबळें विषयो देतां । चित्तासी नुपजे विषयावस्था । स्वभावतां अलिप्त ।। २७ ।। एवं साधिल्या माझा योगू । चित्तविषयांचा वियोगू । सहजेंचि होय चांगू । हा सुगम सांगूं उपावो ।। २८ ।। येथें ह्मणें आशंका धराल देख । स्वरूप शुद्ध अवघें एक । तेथें कैंचें बाध्यबाधक । काय

आवरावी. १४ आतां गुरुकृपेचा प्रभाव ऐक. तो तीन्ही अवस्थांमध्यें मी जो गुणातीत तुरीय-साक्षी त्या माझ्या आत्मबोधाचा अभ्यास करावयास लावितो. १५ अभ्यासाचें सामर्थ्य विचित्र आहे. तो विषयवृत्तींच्या मागें व पुढें असलेल्या मज तुरीय आत्म्याचें ज्ञान करून देतो. १६ ज्ञानस्वरूप मी सर्वत्र व सर्वांच्या आंत आहे. गुरु शिष्याच्या वृत्तीमध्यें असलेला जो निजस्वार्थ तो त्याला दाखवितो. १७ आपण लुगड्याला जर सुताहून निराळें करूं लागलों तर तें आपलें करणें हास्यास्पद होईल. कारण त्यांत उभें व आडवें केवल सूतच विणलेलें असतें. १८ त्याप्रमाणें साधकाला विषयांचें भान असतें. पण तें माझ्या स्वरूपाहून भिन्न नाहीं तर मीच चैतन्यघन आहे. १९ त्यांत नाम-रूप-वर्ण हा भेद नाहीं. कर्म व कर्ता हा वेदवाद नाहीं. प्रणवामध्यें सर्व वेद बुडाले व केवळ शुद्ध मीच एक राहिलों. ४२० तेथें भ्रमासह भ्रांति पळून गेली. प्रवृत्ति म्ह० कर्ममार्ग क्रियेसह पळाला, निवृत्ति लाजेनें लपली व आत्मस्वरूपांतच ती लीन झाली. २१ सूर्योदय होतांच तो सगळ्या अंधकाराला जसा गिळून टाकितो, काजव्याचें लुकलुकणें नाहींसें करितो व कोट्यवधि नक्षत्रांची पंक्ति तत्काळ लोपवितो, २२ तशी माझी स्वरूपप्राप्ति झाली असतां मायेची स्फूर्ति मावळते. प्रवृत्ति-निवृत्ति लाजेनें नाहींशा होतात व स्वानंदानें नित्यतृप्ति होते. २३ अशी माझ्या स्वरूपाची गोडी जेव्हां साधकाला लागते, तेव्हां चित्त विषयांना टाकितें व विषय चित्ताला सोडितात. २४ जीं फळें, झाडाच्या देंठाला चिकटूनच वाढतात, तीं पक्व झालीं म्हणजे आपणच त्या देंठांपासून गळून पडतात, देंठ त्या फळांना धरून ठेवीत नाहीं. २५ किंवा दहीं घुसळून एकदां लोणी काढिलें कीं तें ताकापासून वेगळें होतें, व पुनः ताकांत घातलें तरी जसें त्यांत मिसळत नाहीं, त्याप्रमाणें चित्त विषयांना सोडून त्यापासून अलिप्त होतें. २६ यास्तव एकदां माझ्या स्वरूपाची प्राप्ति झाली कीं, मग दैवयोगानें विषय जरी पुढें आले तरी चित्ताला त्याची आसक्ति वाटत नाहीं. तें स्वभावतःच त्यापासून अलिप्त होऊन रहातें. २७ याप्रमाणें माझा योग साधिला असतां चित्त-विषयांचा वियोग सहजच घडतो, हा अतिशय सुलभ व पूर्ण उपाय आहे. २८ यावर कदाचित् तूं अशी शंका घेशील कीं, आत्म-

साधक साधिती ॥ २९ ॥ ऐशाही संधीमाजीं जाण । अहंता बंधाचें कारण । त्याचें सांगेन मी लक्षण । सावधान परियेसीं ॥ ४३० ॥

अहंकारकृतं बन्धमात्मनोऽर्थविपर्ययम् । विद्वान्निर्विद्य संसारचिन्तां तुर्ये स्थितस्त्यजेत् ॥ २९ ॥

जेथ मुहूर्तमात्र वसती घडे । त्या ठायाचा अभिमान चढे । ऐसें अभिमानाचें सांकडें । पाहें पां रोंकडें कौतुक त्याचें ॥ ३१ ॥ बुद्धि अहंकार अळुमाळ । उठतां शुद्धासी करी शबळ । तेणें देहयोगें धरिल्या बळ । करी तत्काळ विपरीत ॥ ३२ ॥ अहंकार खवळल्या जाण । करी आनंदाचें आच्छादन । बुडे परमात्मस्फूर्तीचें स्फुरण । देहाचें मीपण वाढवी ॥ ३३ ॥ जेवीं कूर्मीच्या पिलियां । चक्षुरमृतें तृप्ती तयां । तेंचि मातेसि चुकलिया । मग भुकेलिया कर्दमू सेवी ॥ ॥ ३४ ॥ तेवीं खुंटलिया आनंदअभिव्यक्ती । जीवासी वाढे विषयासक्ती । कामिनीकामापंगिस्त होती । चिंता चित्तीं विषयांची ॥ ३५ ॥ विसरला आपुलें पूर्णपण । धनालागीं अतिहीन दीन । मी देहवंत परिच्छिन्न । ऐसा देहाभिमान दृढ होय ॥ ३६ ॥ तेणें कर्माकर्मांचे आघात । नाना नरकयातना होत । जन्ममरणादि आवर्त । तेणें दुःखी होत अतिदुःखें ॥ ३७ ॥ भोगितां दुःखयातना । त्रासु उपजे ज्याच्या मना । न साहवे भववेदना । तेणें देहाभिमाना सांडावें ॥३८॥ अभिमान सांडितां न संडे । हेंचि दुर्घट थोर मांडे । यालागीं साधनाचें सांकडें । सोसणें पडे साधकां ॥ ३९ ॥ जें जें करावें साधन । साधनीं रिघे साधनाभिमान । धांवणें नागवी संपूर्ण । साधनीं विघ्न होय तैसें ॥ ४४० ॥ ऐक साधकांचें साधन । वेदोक्त स्वधर्माचरण । साधावें

स्वरूप शुद्ध व सर्वत्र एकच आहे, तेथें बाध्यबाधकता कोठची! व साधक काय साधितात! २९ परंतु या संधींतहि अहंकार बंधाला कारण होतो. त्याचें लक्षण मी आतां सांगतों, तें लक्षपूर्वक ऐक. ४३०.

—संसृतीचें निमित्त अशा बुद्धीनें बंध कसा होतो व त्याचा त्याग कसा करावा ? उत्तर—

अहंकारकृतं बन्धं आत्मनः अर्थविपर्ययं विद्वान्—अहंकारानें केलेला बंधच आत्म्याच्या आनंदादिकांना आच्छादित करून अनर्थाला कारण होतो; असें जाणून, निर्विद्य—हें सर्व दुःख आहे असा निश्चय करून, तुर्ये स्थितः— तुरीयामध्यें स्थित होऊन, संसारचिन्तां त्यजेत्— संसारचिंतेचा त्याग करावा. [म्ह० संसार हीच दुर्बुद्धि आहे, तिच्या ठिकाणचा अभिमान व विषयभोगाचें चिंतन हीं दोन्हीं टाकावींत.] २९.

आपण एखाद्या जागीं एक घटकाभर जरी राहिलों तरी त्या जागेविषयीं अभिमान उत्पन्न होतो, असें हें अभिमानाचें संकट मोठें कौतुक करण्यासारखें आहे. ३१ अभिमानानें एवढीशी उचल खाली पुरे, कीं, तो पवित्र मनुष्याची बुद्धीहि मलीन बनवितो व देहाच्या संगतीनें ती एकदां प्रबल झाली कीं, मग विपरीत प्रकार घडवितें. ३२ अहंकार खवळला कीं, तो आनंदावर आवरण घालितो. परमात्मस्फूर्तीची आवडहि नाहींशी करितो व देहाचें 'मी-पण' वाढवितो. ३३ ज्याप्रमाणें कासवाच्या पिलांना त्यांची माता केवळ प्रेमदृष्टीनें पोशिते, पण तींच मातेच्या दृष्टिआड झालीं कीं, चिखल सेवितात. ३४ त्याप्रमाणें आनंदाचा सुखानुभव अंतरतांच जीवाची विषयासक्ति वाढते. पुरुष स्त्रीच्या अधीन होतो व मनांत विषयांचेंच चिंतन करूं लागतो. ३५ तो आपला पूर्णपणा विसरतो. द्रव्यासाठीं तो अत्यंत दीन होतो व मी देहवान्, मर्यादित आहें, असा त्याचा देहाभिमान वाढतो. ३६ त्यामुळें त्याच्यावर कर्म-अकर्मांचे प्रहार होतात. त्याला अनेक प्रकारच्या नरकयातना सोसाव्या लागतात. तो जन्म-मरणाच्या भोंवऱ्यांत सांपडतो व त्या क्लेशामुळें अत्यंत दुःखी होतो. ३७ त्या दुःखयातना भोगीत असतां त्याच्या मनाला उद्वेग उत्पन्न होतो. त्याला संसाराचें दुःख सहन करवत नाहीं. त्यानें वस्तुतः देहाभिमानाला सोडावें. ३८ परंतु तो अभिमान सुटतां सुटत नाहीं. हीच गोष्ट दुर्घट होऊन बसते. त्यामुळें साधकाला साधनाचें संकट सोसणें भाग पडतें. ३९ जें जें साधन करावें त्या त्या साधनाचा अभिमान उत्पन्न होतो व साह्यासाठीं धांवून येणाराच पुरता नागविला जातो, अशी स्थिति होते. ४४० आतां साधकाचें साधन ऐक. वेदोक्त स्वधर्माचरण करावें, पूर्ण वैराग्य साधावें व अत्यंत प्रीतीनें

वैराग्य पूर्ण । माझें भजन अतिप्रीतीं ॥ ४१ ॥ तत्काळ जावया देहाभिमान । अखंड माझें नामस्मरण । गीत नृत्य हरिकीर्तन । सर्वांभूतीं समान मद्भावो ॥ ४२ ॥ मद्भावें भूतें समस्त । सर्वदा पाहतां सतत । मी तुरीय जो सर्वगत । ते ठायीं चित्त प्रवेशे ॥ ४३ ॥ तिहीं अवस्थामाजीं मी सतत । तिहीं अवस्थांतें मी प्रकाशित । तिहीं अवस्थांहूनि अतीत । तो जाण निश्चित तुरीयू ॥ ४४ । तिहीं गुणांहूनि परता । चौथेपणेंवीण चौथा । तो मी तुरीय जाण तत्त्वतां । ते ठायीं चित्ता जो ठेवी ॥ ४५ ॥ तेथें ठेवितां चित्ता । जीवू पावे मद्रूपता । निमाली सांसारिक चिंता । विषयावस्था बुडाली ॥ ४६ ॥ तेव्हां चित्त चिंता चिंतन । विषयवासना अभिमान । या अवघियांचें होय शून्य । मी स्वानंदघन स्वयें प्रकटें ॥ ४७ ॥ न तुटतां भेदाचें भेदभान । जो म्हणवी मी सज्ञान । वृथा धरी ज्ञानाभिमान । तोही अज्ञान तें ऐका ॥ ४८ ॥

यावन्नानार्थधीः पुंसो न निवर्तेत युक्तिभिः । जागर्त्यपि स्वपन्नज्ञः स्वप्ने जागरणं यथा ॥ ३० ॥

नाना वर्ण नाना व्यक्ती । नाना गोत्रें नाना जाती । अधमोत्तमविधानस्थिती । भेदु चित्तीं दृढ भासे ॥ ४९ ॥ मी काळा गोरा सांवळा । मी सज्ञानत्वें आगळा । माझी उत्तम पवित्र लीळा । मीं कुळें आगळा सत्कुलीन ॥ ४५० ॥ ऐशी झाल्या भेदप्राप्ती । पाहतां अभेदपरा श्रुती । साधकां शास्त्रार्थ-युक्तीं । भेदनिवृत्ती ज्यां नव्हेचि ॥ ५१ ॥ त्याचा व्यर्थ ज्ञानाभिमान । त्याचें व्यर्थ कर्माचरण । तो जागाचि निजेला जाण । जागेपण त्या नाहीं ॥ ५२ ॥ दृढ जो कां देहाभिमान । तेंचि कनकबीजसेवन ।

माझें भजन करावें. ४१ देहाभिमान तत्काल नाहींसा होण्यासाठीं माझें अखंड नामस्मरण, गीत, नृत्य व हरिकीर्तन करावें व सर्व प्राणिमात्रांत समान मद्भाव ठेवावा. ४२ सर्व प्राण्यांना मद्भावानें निरंतर पाहिलें असतां मी जें तुरीय म्ह० ब्रह्मस्वरूप त्यांत चित्ताचा प्रवेश होतो. ४३ तीन्ही अवस्थांमध्यें मी रहातों, तीन्ही अवस्थांना प्रकाशितों व तीन्ही अवस्थांहून अतीत असतों, तोच मी तुरीय आहें, असें समज. ४४ तीन गुणांहून निराळा, पण वस्तुतः मला चौथेपणा नसतांहि तीन अवस्थांच्या अपेक्षेनें जो चवथा तोच मी तुरीय आहें असें जाणून त्यांत चित्त ठेवावें. ४५ त्यांत चित्त ठेविलें कीं, जीव मद्रूप होतो. त्याची प्रपंचाविषयींची चिंता नाहींशी होते व विषयावस्था बुडून जाते. ४६ त्यावेळीं चित्त, चिंता व चिंतन, विषयवासना, अभिमान, हें सर्व शून्य होऊन स्वानंदघन स्वतः प्रकट होतो. ४७ द्वैताचें भान टाकिल्यावांचून जो स्वतःला सज्ञान समजतो व व्यर्थ ज्ञानाभिमान धरितो, तोहि अज्ञान होय. तेंहि आतां ऐक. ४४८.

—जोंवर पुरुष अभिमान व विषयचिंतन यांचा त्याग करीत नाहीं, तोंवर त्याचें कर्मज्ञानादि सर्व व्यर्थ आहे, असें आतां सांगतात—

पुंसः नानार्थधीः युक्तिभिः यावत् न निवर्तेत—पुरुषाची द्वैतबुद्धि पुढें सांगितलेल्या उपपत्तींनीं जोंवर निवृत्त होत नाहीं तोंवर, **जागर्ति अपि स्वपन्**—कर्मादिकांमध्यें तो जरी दक्ष असला तरी झोंपलेला व त्यामुळें जणूंकाय स्वप्नच पहात असतो. (**यतः**) **अज्ञः**—कारण तो अज्ञ म्ह० अयथार्थदर्शी असतो. (अज्ञाचें जागरण हें स्वप्न आहे, याविषयीं दृष्टान्त—) **यथा स्वप्ने जागरणं**—जसें स्वप्नांतील जागरण. [ज्याप्रमाणें निजलेला मनुष्य स्वप्नांत ' मी जागत आहें ' असें पहातो त्याप्रमाणें अज्ञ अज्ञाननिद्रेंत स्वस्थ घोरत असूनहि व्यवहाररूप स्वप्न पहातो.] (गु. गी. २–६९ पृ. ५३.) ३०.

अनेक वर्ण, अनेक व्यक्ति, अनेक गोत्रें, अनेक जाति, अधम-उत्तम-विधानांच्या स्थिति, हे सर्व भेद चित्तांत दृढ भासतात. ४९ मी काळा, मी गोरा, मी सांवळा, मी ज्ञानामुळें श्रेष्ठ आहें, माझें चरित्र मोठें पावन आहे, माझें कुल सत्कुलामुळेंच श्रेष्ठ आहे, ४५० असा भेद मनावर ठसला असतां एकत्वप्रतिपादक कितीहि अभेद श्रुति, शास्त्रार्थ व युक्ति यांचें पर्यालोचन केलें तरी साधकाची भेदनिवृत्ति कदापि होत नाहीं. ५१ त्याचा ज्ञानाभिमान व कर्माचरण व्यर्थ आहे. तो जागेपणींच निजलेला असतो. त्याला जागृति कधींच नसते. ५२ दृढ देहाभिमान, हेंच

करूनि थोर भ्रमला जाण । अविद्या दीर्घ स्वप्नभेदु देखे ॥ ५३ ॥ बोंसणतां बोली न लभे अर्थू । तेवीं पठणमात्रे परमार्थू । श्रुतिशास्त्राचा निजशास्त्रार्थू । नव्हेचि प्राप्तु तयासी ॥ ५४ ॥ वेदाध्ययन नित्य करिती । अरण ब्राह्मण सूत्र निरुक्ती । नव्हेच कामक्रोधानिवृत्ती । पठणें परमप्राप्ती कदा न घडे ॥ ५५ ॥ देहाभिमानें भेददृष्टी । पढतां श्रुतिशास्त्राच्या कोटी । परमार्थेसीं नव्हे भेटी । भेददृष्टी न वचतां ॥ ५६ ॥ जो कां स्वप्नींचें स्वप्नीं जागा जाहला । स्वप्नीं वेदशास्त्र पढिन्नला । जागा म्हणतां असे निजेला । तैसा व्यवहारू झाला शास्त्रज्ञांसी ॥ ५७ ॥ देहाभिमानेंसीं भेदभान । निःशेष जंव न वचे जाण । तंववरी नव्हे निजज्ञान । अत्यंत बंधन तो भेद ॥ ५८ ॥ सनकादिकांची आशंका । घेऊनि देव बोले देखा । वेदविभाग नेटका । सकळ लोकां कळे तैसा ॥ ५९ ॥ स्वयें प्रकाशोनि सकळ भेदू । गर्जत उठी तुझा वेदू । भेद वेदेंचि प्रतिपाद्यू । वेदानुवादू नव्हे मिथ्या ॥ ४६० ॥ वेदवचन तें तात्त्विक । मानावें पैं आवश्यक । हे तुझीच शिकवण देख । तो वेदु लटिक म्हणावा कैसा ॥ ६१ ॥ वेदाज्ञेचा परम नेम । वेदें प्रतिपाद्य क्रियाक्रम । वेदबळें वर्णाश्रम । निज स्वधर्म चालविती ॥ ६२ ॥ वेद म्हणे जो लटिक । तो वेदबाह्य आवश्यक । हें तूंचि बोलिलासी देख । तो वेद लटिक केवीं मानूं ॥ ६३ ॥ ऐशी मानाल आशंका । तेहींविषयीं मीचि देखा । वेदवादाच्या विवेका । विभाग नेटका सांगेन ॥ ६४ ॥ अविद्याभेद सबळ ज्यासी । वेदू नियामक म्यां केला त्यासी । मद्रूपीं अभेदता ज्या भक्तासी । मिनधा त्यापाशीं वेदवादु ॥ ६५ ॥ वेद तितुकाही त्रिगुण । अभेदभजनें भक्त निर्गुण । त्यासी वेदाचें नियामकपण । न चले जाण ममाज्ञा ॥ ६६ ॥ रायाचा जिवलग सेवकू । त्यासीं द्वारपाळ नव्हे नियामकू । कां दासीस लागल्या राजांकू । तीस मानी लोकू प्रधानादि ॥ ६७ ॥ निजकन्येसी

धोत्र्याचें बीं खाऊन त्याला उन्माद होतो व दीर्घ अज्ञानामुळें तो हा स्वप्नवत् भेद खरा समजतो. ५३ मनुष्य कांहीं तरी बरळूं लागला कीं, त्याच्या भाषणांत अर्थ निष्पन्न होत नाहीं. श्रुति-शास्त्रांचा खरा अर्थ त्याला कधींच अवगत होत नाहीं. ५४ नित्य वेदाध्ययन, अरण, ब्राह्मण, सूत्र, निरुक्त यांचा पाठ केला व काम-क्रोध निवृत्त झाला नाहीं, तर त्या पठणानें त्यास परमपदाची प्राप्ति कदापि घडत नाहीं. ५५ देहाभिमानानें भेददृष्टि झालेली असते. ती द्वैतभावना जोंपर्यंत गेली नाहीं, तोंपर्यंत शास्त्र व श्रुति पढून ढीग पाडला तरी परमात्म्याची ओळख होत नाहीं. ५६ एखादा मनुष्य स्वप्नांतील स्वप्नांत जागा झाला व स्वप्नांतच त्यानें वेदशास्त्राचा अभ्यास केला, म्हणून त्याला जागें म्हणावें तर तो खरोखर निजलेलाच असतो, त्याप्रमाणें शास्त्रवेत्त्या विद्वानांची स्थिति झाली आहे. (सु. गी. २–६९ पृ. ५३) ५७ जोंपर्यंत देहाभिमानी पुरुषाचा द्वैतभाव सुटला नाहीं तोंपर्यंत त्याला आत्मज्ञान होत नाहीं. ५८ आतां स्वतः देवच सनकादिकांची आशंका घेऊन सर्व लोकांना वेदविभाग चांगल्याप्रकारें कळेल, अशा रीतीनें सांगत आहे. ५९ "तुझा वेद स्वतःच सगळ्या भेदाला प्रकाशित करून गर्जना करीत उठला आहे. वेदानेंच भेदाचें प्रतिपादन केलें आहे. वेदाचें प्रतिपादन मिथ्या नाहीं. ४६० वेदवचन अवश्य तात्त्विक मानावें अशी तुझीच शिकवण आहे. तेव्हां त्या वेदाला खोटें कसें म्हणावें ! ६१ वेदाज्ञा अत्यंत नियत आहे. वेदानेंच कर्मांचा क्रम सांगितला आहे. वेदबळानेंच वर्णाश्रम आपला स्वधर्म चालवितात. ६२ 'जो वेदाला खोटा म्हणतो तो सर्वथा वेदबाह्य पाखंडी आहे.' असें तूंच सांगितलें आहेस. तेव्हां आम्ही वेदाला मिथ्या कसें मानावें," ६३ अशी जर शंका घ्याल तर मीच वेदवादाचा विचार योग्य विभाग करून सांगतों. ६४ ज्याचा द्वैतभाव प्रबल असतो त्याचें नियमन करण्यासाठीं मीं वेद केला आहे. जो माझ्या स्वरूपाशीं तादात्म्य पावतो, त्याचा वेदच मिंधा होऊन रहातो. ६५ सर्व वेद त्रिगुण आहेत. (सु. गीता २–४५ पृ. ४०) भक्त अभेदभजनानें निर्गुण आहे. त्याच्या ठिकाणीं वेदाचें नियामकत्व चालत नाहीं, अशी माझी आज्ञा आहे. ६६ राजाचा आवडता सेवक असला म्हणजे द्वारपाल त्याला प्रतिबंध करूं शकत नाहीं. किंवा एखादी दासी राजाची पट्टराणी झाली कीं, प्रधानादिक सर्व लोक तिला मान देऊं लागतात. ६७

शिकवी माता । लाज धरावी लोकांदेखतां । एकांतीं मीनल्या कांता । लाज सर्वथा सोडावी ॥ ६८ ॥ सबळ भेदांचें भेद भान । तंव दुर्लंघ्य वेदवचन । अभेद भक्त माझे जाण । वेदविधान त्यां न बाधी ॥ ६९ ॥ आशा तेचि अविद्याबाधू । छेदिल्या बाधीना वेदवादू । जेवीं सूर्योदयापुढें चांदू । होय मंदु निजतेजें ॥ ४७० ॥

असत्त्वादात्मनोऽन्येषां भावानां तत्कृता भिदा । गतयो हेतवश्चास्य मृषा स्वप्नदृशो यथा ॥ ३१ ॥

गुरुकृपें जो सज्ञान । त्यासी देहाचें अबाधित भान । मिथ्या प्रपंचाचें दर्शन । कर्मे कर्तेपण त्यां नाहीं ॥ ७१ ॥ अविद्या द्योतिले वर्णाश्रम । तेथींचें आविद्यक क्रियाकर्म । तेथील जो वेदोक्त धर्म । तो अविद्याभ्रम अज्ञाना ॥ ७२ ॥ सज्ञान भक्तांच्या ठायीं । ते अविद्या निःशेष नाहीं । मा वेदविधान तेथें पाहीं । रिघावया कायी कारण ॥ ७३ ॥ आंबा सफळित जंव असे । तंव नेटेंपाटें राखण बैसे । फळ हाता आल्या आपैसें । राखण वांयसें राहेना ॥ ७४ ॥ तेवीं अविद्येचें जंव बंधन । तंव वेदाचें वेदविधान । अविद्या नाशिलिया जाण । विधीनें तें स्थान सोडिलें ॥ ७५ ॥ अविद्या जाऊनि वर्ततां देहीं । देहाचा देहत्वें हेतु नाहीं । हें म्हणाल न घडेच कांहीं । ऐक तेंही सांगेन ॥ ७६ ॥ स्वप्नींचें देहादि प्रपंचभान । स्वप्नाचमाजीं सत्य जाण । जागें होता तें अकारण । संस्कारें स्वप्न दिसतांही ॥ ७७ ॥ स्वप्नीं राज्यपद पावला । का व्याघ्रमुखीं सांपडला । अथवा धनादि लाभ झाला । रत्नें पावना अनर्घ्यें ॥ ७८ ॥ तेथींचें सुख दुःख हरिख । जागत्यासी नाहीं देख । तेवीं सज्ञानासी आविद्यक ।

माता आपल्या मुलीला शिकवीत असते कीं सर्व लोकांच्या समोर पतीला लाजावें. पण एकान्तांत त्याची लाज सर्वथा सोडावी. ६८ यास्तव द्वैताचें भान जोंपर्यंत आहे तोंपर्यंत वेदवचनाप्रमाणें वागावें. पण माझे भक्त द्वैतरहित झाले कीं, मग त्यांना वेदविधान बाधत नाहीं. ६९ आशा हेंच अविद्येचें बंधन आहे. तिला छेदून टाकिले कीं, सूर्योदय झाल्यावर चंद्र जसा निस्तेज होतो, तसा वेदवाद फिका पडतो. ४७०.

—अहोपण, वेद या प्रमाणानें ज्ञात झालेली वर्णाश्रम-कर्मादि द्वैतबुद्धि निवृत्त कशी होईल ? उत्तर—

आत्मनः अन्येषां भावानां असत्त्वात्—आत्म्याहून भिन्न असलेल्या देहादि पदार्थांना मिथ्यात्व असल्यामुळें, अस्य तत्कृता भिदा गतयः हेतवः यथा स्वप्नदृशः (तथा) मृषा—या आत्म्याचा देहादिकांमुळें होणारा वर्णाश्रमादिरूप भेद स्वर्गादि फलें व त्याचे हेतु शुभाशुभ कर्मे हीं सर्व स्वप्न पहाणाऱ्या पुरुषाच्या भेदादिकांप्रमाणें मिथ्या आहेत. [वेद व शास्त्रें हा अविद्यावान पुरुषाचा विषय आहे. (ब्र. सू. भाष्यार्थ. भाग १ला पृ. ३९.)] ३१.

गुरुकृपेनें जो सज्ञान असतो त्याला देहाचें भान बाधक होत नाहीं. तो प्रपंच मिथ्या मानितो त्यामुळें त्याच्याकडे कर्माचा कर्तेपणा येत नाहीं. ७१ वर्णाश्रम अविद्येनें झालेले आहेत. त्यांतील क्रिया-कर्महि अविद्येनेंच आहेत. त्यामुळें त्यांत सांगितलेला जो वेदोक्त धर्म तो अज्ञ लोकांचा अविद्याभ्रम आहे. ७२ ज्ञानी भक्तांत ती अविद्या मुळींच नसते. तेव्हां मग तेथें वेदविधानाचा प्रवेश होण्याचें काय कारण ! ७३ आंब्याच्या झाडाला जोंवर फळ लागलेलें आहे तोंवरच त्याला राखण ठेवावी लागते. पण एकदा कां सर्व आंबे आपल्या हातीं आले कीं, मग जशी क्षणभरहि राखण ठेवावी लागत नाहीं, ७४ त्याप्रमाणें जोंपर्यंत अज्ञानाचें बंधन आहे, तोंपर्यंतच वेदविधानाचें पालन करावें लागतें. एकदा तें नाहींसें झालें कीं, मग वेदविधानाची गरजच उरत नाहीं. ७५ अविद्या गेल्यावर भक्त जरी देहांतच रहात असला तर तो देहत्वानें देहाचा स्वामी नाहीं. आतां ही गोष्ट घडणें कधीं शक्यच नाहीं, असें जर म्हणशील तर त्यांचेंहि कारण सांगतों, ७६ ऐक. स्वप्नांतील देहादि संसाराचा भास स्वप्नांतच खरा असतो. संस्कारानें स्वप्न प्रपंच दिसत असतांहि जागें होतांच तो सर्व मिथ्याच भासतो. ७७ स्वप्नांत राज्यपद प्राप्त झालें, किंवा वाघाच्या तोंडांत सांपडला किंवा धनादिकांचा लाभ झाला किंवा अमूल्य रत्नें सांपडलीं, ७८ तर तें स्वप्नांतील सुख-दुःख किंवा आनंद जागणाराला नाहीं. त्याप्रमाणें आत्मज्ञान झाल्यावर ज्ञानी मनुष्याला अज्ञानाचें कार्य

नोहे बाधक निजबोधें ॥ ७९ ॥ देहीं असोनि विदेहस्थिती । ऐशा बोधसाधिका ज्या युक्ती । स्वयें सांगेन म्हणे श्रीपती । भेदाची उत्पत्ती छेदावया ॥ ४८० ॥

यो जागरे बहिरनुक्षणधर्मिणोऽर्थान् भुङ्क्ते समस्तकरणैर्हृदि तत्सदृक्षान् ।
स्वप्ने सुषुप्त उपसंहरते स एकः स्मृत्यन्वयात्त्रिगुणवृत्तिदृगिन्द्रियेशः ॥ ३२ ॥

तिहीं अवस्थांच्या ठायीं । आत्मा एकचि असे देहीं । तोचि देहाच्या ठायीं विदेही । साक्षी पाहीं सर्वांचा ॥ ८१ ॥ मी बाळ तोचि झालों तरणा । आतां आलों म्हातारपणा । ऐशा वयसांचे साक्षीपणा । आपण आपणा देखतू ॥ ८२ ॥ जागृतीसी नाना भोग । सविस्तर भोगी अनेग । तेचि स्वप्नामाजीं साङग । निजहृदयीं चांग विस्तारी ॥ ८३ ॥ जागृती भोगाचा संस्कारू । तोचि स्वप्नामाजीं विस्तारू । मनोमय विश्वाकारू । निजहृदयीं वेव्हारू वाढवी ॥ ८४ ॥ गज तुरंग खर नर । गिरि दुर्ग पुर नगर । विशाळ सरिता समुद्र । वासनेचें वैचित्र स्वप्नीं देखे ॥ ८५ ॥ नाहीं जागृती नाहीं स्वप्न । अंतःकरणही करोनि लीन । सुषुप्तिकाळीं तोचि जाण । अहंकारेंवीण उरलासे ॥ ८६ ॥ विश्वभिमानी इंद्रियवृत्ती । तेणें तो देखतसे जागृती । तैजस अभिमानी अविद्यावृत्ती । स्वप्नस्थिती तो देखे ॥ ८७ ॥ प्राज्ञ अभिमानी मूढवृत्ती । तो देखतसे सुषुप्ती । एक आत्मा तिहींप्रती । न घडे निश्चितीं म्हणाल ॥ ८८ ॥ तिहीं अवस्थांचे अभिमानी । म्हणाल देखणे भिन्न तिनी । तरी एक आत्मा द्रष्टेपणीं । उरला निदानीं तें

बाधत नाहीं. ७९ द्वैताच्या उद्भवाचा नाश करण्यासाठीं देहांत असून विदेह स्थिति होण्याचा ज्ञानदायक उपाय 'मी आतां सांगतों' असें स्वतः श्रीपति म्हणाला. ४८०.

—तिसाव्या श्लोकांत 'युक्तिभिः' म्ह० उपपत्तींनीं असें म्हटलें आहे, आतां त्या युक्तीच सांगतात—

यः—जो, **जागरे बहिः अनुक्षणधर्मिणः अर्थान् समस्तकरणैः भुङ्क्ते**—जागरावस्थेंत बाह्य देहादि स्थूल व क्षणिक बाल्य-तारुण्यादि धर्मांनीं युक्त अशा विषयांना चक्षुरादि सर्व इंद्रियांनीं अनुभवितो, **स्वप्ने हृदि तत्सदृक्षान्** [**भुङ्क्ते**]—व जो स्वप्नांत आपल्या हृदयामध्येंच जागृतींत पाहिलेल्या विषयांसारख्या वासनामय विषयांना भोगितो, **सुषुप्ते उपसंहरते**—व जो सुषुप्तींत त्या सर्वांचा उपसंहार करितो, **सः एकः**—तो एक आहे, (कोणत्या कारणानें ?—) **त्रिगुणवृत्तिदृक्**—कारण कीं, तो त्रिगुणवृत्तीचा म्ह० तीन अवस्थांचा द्रष्टा आहे. (अहोपण, जाग्रदेवस्थेला सर्व इंद्रियें पहातात, स्वप्नाला मन पहातें व सुषुप्तीला त्यांच्या संस्कारानें अवशिष्ट राहिलेली बुद्धि पहाते. तेव्हां आत्मा त्यांचा द्रष्टा आहे असें कसे म्हणतां ! उत्तर—] **इंद्रियेशः**—कारण तो सर्व इंद्रियांचा स्वामी आहे. [अहोपण, विश्व, तैजस व प्राज्ञ हे इंद्रियांचे स्वामी आहेत व ते परस्पर भिन्न आहेत उत्तर—नाहीं. ते परस्पर भिन्न नाहींत. कारण ज्या मीं स्वप्नें पाहिलीं, तोच मी नंतर कांहीं न जाणतां निजलों व तोच मी आतां जागा झालों आहें, अशी द्रष्टयाच्या एकत्वाची प्रतीति येत असल्यामुळें विश्वादिव्यवहार उपाधिभेदामुळें होतो, याच न्यायानें बाल्य-तारुण्यादि अवस्थांमध्येंहि आत्म्याच्या एकत्वानुसंधानानें त्याचें एकत्व आहे, असा निश्चय करावा. ३२.]

तिन्ही अवस्थांत देहामध्यें आत्मा एकच असतो. तोच देहांत राहून विदेह स्थितींत सर्वांचा साक्षी होतो. ८१ मी लहान मूल होतों, तोच तरुण झालों व आतां मला म्हातारपण आलें; अशा अवस्थांच्या साक्षित्वानें तो आपणच आपल्याला पहातो. ८२ जागृतींत अनेक प्रकारचे भोग पूर्णपणें भोगितो व स्वप्नांत तेच भोग आपल्या हृदयांत विस्तारितो. ८३ जाग्रदावस्थेचा साक्षी स्वप्नांत काल्पनिक सृष्टि निर्माण करून तिचाच आपल्या मनांत विस्तार वाढवितो. ८४ हत्ती, घोडे, गाढव, मनुष्य, पर्वत, किल्ले, गांवें, शहरें, मोठाल्या नद्या, समुद्र इत्यादि वासनांच्या विविध कल्पनांप्रमाणें स्वप्न पहातो. तोच जीव सुषुप्तींत ८५ जागृति व स्वप्न यांनीं रहित होऊन, अंतकरणालाहि लीन करून अहंकारावांचून रहातो. ८६ विश्वाभिमानी इंद्रियाधीन वृत्तीमुळें जागृति पहातो. स्वप्नाचा अभिमानी तैजस अविद्यावृत्तिमुळें स्वप्नस्थिति पहातो. ८७ प्राज्ञ म्ह० गाढ झोंपेचा अभिमानी सुषुप्तीचा अनुभव घेतो. तुम्हीं कदाचित् म्हणाल कीं, एकच आत्मा जागृति, स्वप्न व सुषुप्ति या तिन्ही अवस्थांचा साक्षी असणें संभवत नाहीं. ८८ तीन्ही अवस्थांचें साक्षी जर भिन्न भिन्न आहेत, तर मग शेवटीं, एकच आत्मा साक्षित्वानें कसा उरेल ! तर याचें

ऐका ॥ ८९ ॥ पहिला जो कां मी जागता । तेणें म्यां देखिलीं स्वप्नावस्था । तोचि मी सुखे निजेला होता । या तिनी अवस्था स्वयें मी जाणें ॥ ४९० ॥ जेणें जे देखिली नाहीं । तो ते अवस्था सांगेल कायी । यालागीं तिहीं अवस्थांचें ठायीं । आत्मा पाहीं अनुस्यूत ॥ ९१ ॥ जागृतीं इंद्रियां देखणेपण । स्वप्नीं देखणें तें तंव मन । सुषुप्ति गाढ मूढ अज्ञान । कैंचें देखणेपण आत्म्यासी ॥ ९२ ॥ येही आशंकेचें वचन । ऐका द्विज हो सावधान । मन इंद्रियें जडे जाण । देखणेपण त्यां कैंचें ॥ ९३ ॥ जो मनाचा चाळकू । जो इंद्रियांचा प्रकाशकू । जो सुषुप्तीचा द्योतकू । साक्षित्वे एकू तो आत्मा ॥ ९४ ॥ म्हणाल सुषुप्ती आत्मा नाहीं । हे बोलणें न घडे कांहीं । मी सुखे निजेलो होतों पाहीं । हें कोणाचे ठायीं जाणावे ॥ ९५ ॥ प्रकृतिकार्याहूनि परता । देहादि अवस्थांतें प्रकाशिता । गुण इंद्रियाचा नियंता । जाण तत्त्वतां तो आत्मा ॥ ९६ ॥ इंद्रियें आत्मा नव्हती हा नेम । त्यांचें सदा एकदेशी कर्म । आत्मा सर्वकर्ता सर्वोत्तम । करोनि निष्कर्म सर्वदा ॥ ९७ ॥ मन आत्मा नव्हे तें ऐक वर्म । संकल्पविकल्प त्याचें कर्म । आत्मा निर्विकल्प निरूपम । विश्रामधाम जगाचें ॥ ९८ ॥ जो सुषुप्तिसुखभोगसाक्षी । जो देखणेपणें तिहीं लोकीं । तो मी आत्मा गा एकाकी । जाण निष्टंकीं निश्चित ॥ ९९ ॥ एवं युक्तीचिया विभागलीला । परमात्मा जो एकू साधिला । तो साधकांसी उपयोगा आला । योग सिद्धी नेला तेणें बळें ॥ ५०० ॥

एवं विमृश्य गुणतो मनसस्त्र्यवस्था मन्मायया मयि कृता इति निश्चितार्थाः ।
संछिद्य हार्दमनुमानसदुक्तितीक्ष्णज्ञानासिना भजत माऽखिलसंशयाधिम् ॥ ३२ ॥

उत्तर ऐका. ८९ पहिल्यानें जो जागा असतो, तोच निजतो व स्वप्न पहातो व नंतर 'मी गाढ निजलों होतों' असें म्हणतो. ४९० ज्यानें जी अवस्था पाहिलीच नाहीं, तो ती कशी सांगणार! तेव्हां तीन्हीं अवस्थांमध्यें एकच आत्मा सारखाच व्यापक असतो. ९१ 'जागेपणीं इंद्रियें पहातात, स्वप्नांत मन पहातें व गाढ झोंपेंत तर पूर्ण अज्ञानमूढत्व असतें. तेव्हां आत्म्याकडे साक्षित्व कसें येणार!' ९२ या आशंकेचेंहि समाधान सांगतों, तरी हे ब्राह्मणांनो! लक्ष देऊन ऐका. ९३ जो मनाला चालन देणारा, इंद्रियांना प्रकाशित करणारा, सुषुप्तीला पहाणारा तो साक्षित्वानें एकच आत्मा आहे. ९४ सुषुप्तींत आत्मा नसतो असें जर म्हणाल तर तें बरोबर नाहीं. कारण 'मी सुखानें निजलों होतों.' हा अनुभव साक्षीवांचूनच कसा येईल! ९५ जो प्रकृतिकार्याहून भिन्न, देहादि अवस्थांना प्रकाशित करणारा व इंद्रियें यांचें नियमन करणारा, तोच खरोखर आत्मा असें समजावें. ९६ इंद्रियें आत्मा नव्हे हें उघडच आहे. कारण त्यांचें सर्व कर्म एकदेशी असतें. आत्मा सर्वकर्ता, सर्वोत्तम असून सर्वदा निष्कामच आहे. ९७ आतां मन आत्मा नव्हे, यांतील रहस्य ऐक. संकल्प-विकल्प हें मनाचें कार्य आहे व आत्मा तर निर्विकल्प, निरुपम व सर्व जगाचें विश्रांतिस्थान आहे. ९८ जो सुषुप्तीमधील सुखभोगाचा साक्षी, त्रैलोक्यांतील सर्व पहाणारा, तो एक अद्वितीय आत्मा मीच आहें, असें खात्रीनें जाण. ९९ याप्रमाणें युक्तीच्या विभागानें सिद्ध केलेला जो एक परमात्मा तोच साधकाच्या उपयोगी पडतो व त्याच्याच सामर्थ्यानें योगसिद्धि प्राप्त होते. ५००.

—मग पुढें काय करावें तें सांगतात—

एवं विमृश्य—असा विचार करून, **गुणतः याः एताः मनसः त्र्यवस्थाः**—गुणामुळें होणाऱ्या या ज्या मनाच्या तीन **अवस्था, ताः मन्मायया मयि कृताः**—त्या माझ्या अविद्येनें माझ्या ठिकाणीं आरोपित आहेत, [तत्त्वतः नाहींत] **इति निश्चितार्थाः**—असा ज्यांनीं आत्मरूप अर्थ निश्चित केला आहे ते तुम्ही, **अखिलसंशयाधिं अनुमानसदुक्तितीक्ष्णज्ञानासिना संछिद्य हार्दं मा भजत**—ज्यामध्यें संशय स्थापिलें जातात, त्या अहंकाराला अनुमान, संताचा उपदेश व श्रुति या तीक्ष्ण ज्ञानखड्गानें पूर्णपणें तोडून टाकून स्थिर असलेल्या मला भजा. ३२.

म्यां सांगीतल्या ज्या युक्ती । ज्या का श्रुतिशास्त्रार्थसंमती । त्या विचारूनि परमार्थगतीं । संसारगुंती उगवावी ॥ १ ॥ संसारगुंतीसी कारण गुण । गुणावस्थीं व्यापिलें मन । त्यांसी माझी माया मूळ जाण । जिया केलें आवरण माझेंचि ॥ २ ॥ माझी माया माझेनि सबळ । त्या मजाचि आवरिलें तत्काळ । जैसें डोळ्याचें डोळां जळ । गोठूनि पडळ होऊनि ठाके ॥ ३ ॥ कां पूर्णचंद्र अतिनिर्मळ । तेथ पृथ्वी बिंबली सकळ । तेणें सलांछन चंद्रमंडळ । लोक सकळ देखती ॥ ४ ॥ पृथ्वीचंद्रासी अंतर । विचारितां दूरांतर । मिथ्या बाधिला रजनीकर । ते लोक साचार मानिती ॥ ५ ॥ यापरी माया माझ्या ठायीं । आतळली नाहीं कहीं । मिथ्याभासें लोक पाहीं । तिच्याठायीं भूलले ॥ ६ ॥ तेणें नाथिली गुणावस्था अहंकर्तृत्वें घेतली माथां । विषयभोगअवस्था । वासनायुक्त वाढविल्या ॥ ७ ॥ एवं उभय देहबंधन । मिथ्या जीवत्वें लागलें जाण । त्याचें करावया छेदन । माझ्या युक्ती जाण विवराव्या ॥ ८ ॥ करितां युक्तींचें अनुमान । तेणें अनुमानिक होय ज्ञान । न तुटे अविद्याबंधन । यालागीं साधुसज्जन सेवावें ॥ ९ ॥ साधूंमाजीं साधुत्व पूर्ण । सेवावे सद्गुरुचरण । तेणें निरसे भवबंधन । साधुसज्जन सद्गुरु ॥ ५१० ॥ त्या साधूंचिया सदुक्ती । श्रुत्यर्थें उपदेश करिती । तेणें होय ज्ञानखड्गप्राप्ती । जे बुद्धीच्या हाती हातवशी ॥ ११ ॥ तेंही वैराग्यनैराश्य साहाणें । लावूनि सतेज शस्त्र करणें । धृतीच्या धारणा दृढ करणें । सावधपणें निःशंक ॥ १२ ॥ शस्त्रासी आणि आपणा । एकपणाची धारणा । दृढ साधूनि साधना । देहाभिमाना छेदावें ॥ १३ ॥ जो सकळ संशयाचा कंदू । जेणें देहदुःखाचा उद्बोधू । ज्याचेनि सदा विषयसंदू । जो कामक्रोधपोषकू ॥ १४ ॥ जो वाढवी तिनी गुण । जो शुद्धासी आणी जीवपण । ज्याचेनि जीवा जन्ममरण । दुर्निवार जाण लागले ॥ १५ ॥ जो सकळ अनर्थांचा दाता ।

श्रुति-स्मृतींना संमत अशा ज्या युक्ति मीं तुला सांगितल्या, त्यांचा परमार्थ दृष्टीनें विचार करून हें संसाराचें कोडें सोडवावें. १ या संसारबंधाचें कारण गुण आहेत, गुणावस्थांनीं मन व्यापिलें आहे व त्या सर्वांचें मूळ कारण, जिनें मजवरच आवरण घातलें, ती माझी मूळ माया आहे. २ माझी माया माझ्यामुळेंच प्रबल झाली आहे. ज्याप्रमाणें डोळ्यांतील अश्रु डोळ्यांतच गोठून त्यांचें पटल डोळ्यांवर येतें, त्याचप्रमाणें माझ्यापासूनच उत्पन्न झालेली माया मजवर आवरण घालितें. ३ किंवा पौर्णिमेचा चंद्र स्वभावतः अगदीं स्वच्छ असतो, पण त्यांत पृथ्वीचें प्रतिबिंब पडलें कीं, सर्व लोक चंद्रालाच लांछित म्हणतात. ४ पण विचारपूर्वक पाहिलें तर चंद्र व पृथ्वी यांतील अंतर किती तरी मोठें आहे, पण चंद्रावर मिथ्याच होणारा भास लोक जसा खरा मानितात, ५ त्याप्रमाणें वास्तविक माझ्यामध्यें माया नसून लोक मात्र मिथ्याभासानें तिच्यावर भाळतात. ६ त्यांनीं अहंकारामुळें मिथ्याच गुणावस्था आपल्या मस्तकावर लावून घेतली व त्यायोगें वासनायुक्त विषययोगावस्था वाढविल्या. ७ याप्रमाणें सूक्ष्म व स्थूल या दोन्हीं देहांचें बंधन मिथ्या जीवत्वामुळें लागलें आहे. त्याचा छेद करण्यासाठीं माझ्या युक्तींचें विवरण करावें. (म्ह० सत्त्व, रज व तम या त्रिगुणांमुळें मनाच्या तीन अवस्था होतात व अविद्येमुळें त्यांचा मजवर आरोप होतो. परंतु त्या मिथ्या आहेत, असा निश्चय करून निरंतर माझें चिंतन करावें.) ८ युक्तींचें अनुमान करूं लागलें असतां त्यांचें अनुमानिक ज्ञान होतें, पण त्यानें अविद्येचें बंधन तुटत नाहीं. यास्तव साधु-सज्जनांचा सहवास करावा. ९ साधूंमध्यें जेथें पूर्ण साधुत्व असतें, त्या सद्गुरुचरणांचा आश्रय करावा. त्यायोगें संसारबंधन नाहींसें होतें. कारण सद्गुरुच साधु व सज्जन आहे. ५१० त्या सद्गुरूचें वचन श्रुतीच्या अर्थाचा उपदेश करितें. त्यायोगें वेद-वचनानें तीक्ष्ण केलेलें ज्ञानखड्ग प्राप्त होतें. ११ तें वैराग्यरूपी सहाणेवर घांसून त्याला धार चढवावी. धृतीच्या धारणेनें निःशंकपणानें तें दृढ धरावें आणि सावधान चित्तानें निःशंक व्हावें. १२ तें शस्त्र व त्याच्या एकत्वाची धारणा याच दृढ साधनाला संपादन करून देहाभिमानाचा छेद करावा. १३ जो सगळ्या संशयाचा गड्डा, ज्याच्यामुळें देहदुःखाचा विकास होतो, ज्याच्यामुळें सर्वदा विषयांचा छंद लागतो, जो काम-क्रोधांस वाढवितो, १४ जो सत्त्व-रज-तम या तीन गुणांची वाढ करितो, जो निरुपाधिक आत्म्याला जीवपणा आणितो, ज्याच्यामुळें जीवाच्या पाठीस अनिवार्य जन्म-मरण लागतें, १५ जो सगळे अनर्थ देणारा, ज्याची ममता ही लाडकी कन्या आहे, जिला तिची

ज्याची लडिवाळ कन्या ममता। तियेसी वाढवी माया माता। तिच्या सत्ता हा दाटुगा ॥ १६ ॥ तेथें शस्त्राचेनि लखलखाटें। राहोनियां नेटेंपाटें। समरांगणीं सुभटें। घावो येणें नेटें हाणावा ॥१७॥ एकेचि घायें जाण। माया ममता अभिमान। त्रिपुटीचें होय छेदन। येणें बळें जाण छेदावा ॥ १८ ॥ भोग्य भोगू भोक्ता। कर्म कार्य कर्ता। ध्येय ध्यान ध्याता। त्रिपुटी तत्त्वतां छेदावी ॥ १९ ॥ अहं कोहं सोहं स्वभावो। हाही छेदूनि अहंभावो। साधकां निजपदीं ठावो। ब्रह्म स्वयमेवो होऊनि ठेले ॥ ५२० ॥ ह्मणाल सांगतां जो प्रकारू। तो शब्द ज्ञानवेव्हारू। बोलांचा कडकडाट थोरू। कैसेनि अहंकारू मारवे ॥ २१ ॥ शब्दमात्रें अभिमान। जरी पावता निर्दळण। तरी कां पां विद्वज्जन। अभिमानमग्न होताती ॥ २२ ॥ अभिमान सन्मुख दिसता। तरी धांवोनि करूं ये घाता। तो अतर्क्य जी सर्वथा। शब्दें अहंता मरेना ॥ २३ ॥ घडे अपरोक्षसाक्षात्कारू। तो शब्दमात्रें नव्हे प्रकारू। ऐसा आशंकेचा विचारू। ऐक निर्धारू सांगेन ॥ २४ ॥ जो अनन्यभावें माझें भजन। सर्वदा करी सावधान। का सद्गुरूचें श्रीचरण। मद्भावें जाण जो सेवी ॥ २५ ॥ मज आणि सद्गुरु-मूर्ती। भेद नाहीं गा कल्पांतीं। येणें अभेदभावें जे भजती। ते ज्ञान पावती सहजचि ॥ २६ ॥ त्यांसी स्वभावें भजनस्थिती। ज्ञानखड्गाची होय प्राप्ती। सहजेंचि सांपडे हातीं। ज्या शस्त्रदीप्तीं काळ कांपे ॥ २७ ॥ ज्या शस्त्राच्या धाकाभेणें। माया ममता अभिमान। सांडूनियां जीवपण। समूळ जाण पळाली ॥ २८ ॥ हाणावया पुरता घावो। अहंममतेसी नाहीं ठावो। अविद्येचाही अभावो। आपभयें पहा वो आपणचि ॥२९॥ सद्भावें जें माझें भजन। करितां एवढें होय ज्ञान। येथ आशंका करील मन। कोठें भजन करावें ॥ ५३० ॥ तुझें स्वरूप अतर्क्य जाण। अतिसूक्ष्म आणि निर्गुण। तुज भजावया कवण स्थान।

माता माया वाढविते, जिच्या सत्तेमुळें हा प्रबल होतो, १६ त्या अहंकारावर या लखलखीत तीक्ष्ण धारेच्या शस्त्रानें मोठ्यानें धैर्यानें रणांगणांत उभे राहून मोठ्या नेटानें घाव घालावा. १७ त्या एकाच घावानें माया, ममता व अभिमान या तीहींचा छेद होईल अशा सामर्थ्यानें त्यांवर प्रहार करावा. १८ भोग्य, भोग, भोक्ता, कर्म; कार्य, कर्ता; ध्येय ध्यान, ध्याता; ह्या सर्व त्रिपुटींचा तत्त्वतः छेद करावा. १९ हा मी; मी कोण! तोच मी; याहि अहंभावाचा छेद करून साधक निजपदारूढ होत्साते साक्षात् ब्रह्मच होऊन राहिले आहेत. ५२० यावर तुम्ही कदाचित् म्हणाल कीं, हा जो प्रकार सांगतां तो केवळ शब्दज्ञानाचा व्यवहार आहे. बोलांचा मोठा कडकडाट आहे. अहंकाराला कसा मारितां येईल! २१ केवळ शब्दपांडित्यानें जर अभिमानाचा नाश झाला असता तर मग विद्वान् लोक अभिमानांत एवढें मग्न कशाला झाले असते! २२ अभिमान जर खरोखरच डोळ्यापुढें दिसता, तर त्याच्या अंगावर धांवून त्याचा नाश करितां आला असतां; तो सर्वथा अतर्क्य असल्यामुळें केवळ शब्दानें अहंता घालवितां येत नाहीं. २३ आत्मानुभव कांहीं केवळ शब्दज्ञानानें प्राप्त होत नाहीं. या तुमच्या आशंकेचें समाधान सांगतों, तें ऐका. २४ जो अनन्यभावानें निरंतर माझें भजन सावधान मनानें करितो, किंवा जो सद्गुरूच्या चरणांची सेवा मद्भावानेंच करितो, २५ किंवा जो माझ्यांत व सद्गुरूंत कल्पांतीं भेदभाव न पहातां भजतो त्यांस सहजच ज्ञानप्राप्ति होते. २६ त्यांना स्वभावतःच भजनस्थिति हें ज्ञानरूपी खड्ग प्राप्त होतें. तें शस्त्र सहजच हातीं येतांच त्याच्या तीक्ष्ण धारेला काळहि कांपूं लागतो. २७ त्या शस्त्राच्या धाकानें माया, ममता, अभिमान हीं सर्व जीव घेऊन पळत सुटतात २८ व अहं-ममतेवर घाव घालावयास पुरता अवकाशहि रहात नाहीं; अविद्येचा तर आपो-आपच नुसत्या भीतीनेंच पुरता अभाव होतो. २९ सद्भावानें माझें भजन केलें असतां एवढें ज्ञान होतें. पण याविषयीं तुमच्या मनांत अशी आशंका येईल कीं, तुझें भजन कोठें करावें! ५३० कारण तुझें स्वरूप अतर्क्य, अतिसूक्ष्म

आम्हांसी जाण कळेना ॥ ३१ ॥ ऐसें कल्पील जरी मन। तरी ऐक सावधान। अतिसुगम भजनस्थान। मी सांगेन तें ऐक ॥ ३२ ॥ नुल्लंघितां पर्वतकोटी। न रिघतां गिरिकपाटीं। दूरी न करितां आटाटी। जे स्थानी भेटी सदा माझी ॥ ३३ ॥ भजनस्थान निरुपम। जेथ मी वसें पुरुषोत्तम। प्राप्तीलागीं अतिसुगम। विश्रामधाम भक्तांचें ॥ ३४ ॥ सर्व सुखांचा आराम। निजहृदयीं आत्माराम। सर्वदा असे सम। भजावें सप्रेम ते ठायीं ॥ ३५ ॥ आदि ब्रह्मा अंतीं मशक। सर्वांचे हृदयीं मीचि एक। ऐसें पाहे तो सभाग्य देख। हें भजन चोख मत्प्राप्ती ॥ ३६ ॥ ज्या मज हृदयस्थाचे दीप्तीं। मनबुद्ध्यादिकें वर्तती। ज्या माझिये स्फुरणस्फूर्ती। ज्ञानव्युत्पत्ती पायां लागे ॥ ३७ ॥ त्या मज हृदयस्थाच्या ठायीं। भजनशीळ कोणीच नाहीं। शिणतां बाह्य उपायीं। जन अपायीं पडताती ॥ ३८ ॥ ऐशांत सदैव कोणी एक। निजभाग्यें अत्यंत चोख। मज हृदयस्थाचा विवेक। करूनि निष्टंक मद्भजनीं ॥ ३९ ॥ करितां हृदयस्थाचें भजन। माझें पावे तो निजज्ञान। वैराग्ययुक्त संपूर्ण। जे ज्ञानीं पतन रिघेना ॥ ५४० ॥ ज्या ज्ञानाभेणें जाण। धाकेंचि पळे अभिमान। तें मी आपुलें त्यांसी दें ज्ञान। जे हृदयस्थाचें भजन करिती सदा ॥ ४१ ॥ ज्या ज्ञानाचिये ज्ञानसिद्धी। अखिल जाती आधिव्याधी। संशय पळती त्रिशुद्धी। भक्त निजपदीं पावती ॥ ४२ ॥ सबळ बळें सुभटें। शस्त्राचेनि लखलखाटें। संशयो छेदावा कडकडाटे। हें म्यां नेटेंपाटें सांगीतलें ॥ ४३ ॥ यावरी असें गमेल चित्तीं। संसाराची सत्यप्राप्ती। त्यासी शस्त्र घेऊनि हातीं। कोणे युक्तीं छेदावा ॥ ४४ ॥ तरी संसार तितुकी भ्रांती। हेंचि सांगावया दृष्टांतीं। पुढील श्लोकाची श्लोकोक्ती। स्वयें श्रीपती सांगतू ॥ ४५ ॥

व निर्गुण आहे. तेव्हां तुझें भजन करण्याचें स्थान तरी कोणतें, हेंच आम्हांला कळत नाहीं. ३१ अशी जर तुमचें मन कल्पना करील तर लक्ष देऊन ऐका. भजनाचें अति सुलभ स्थान मी सांगतों. ३२ कोट्यवधि पर्वतांचें उल्लंघन केल्यावांचून, पर्वताच्या गुहेंत गेल्यावांचून, कांहीं यातायात न करितां ज्या स्थानांत माझी सर्वकाळ भेट होते, ३३ जेथें मी पुरुषोत्तम रहातों, तें अद्वितीय, अतिशय सोपें, भक्ताच्या विश्रांतीचें घरच असें भजनस्थान आहे. ३४ सर्व सुखाचें उद्यानच अशा आपल्या हृदयांत सदा-सर्वदा मी आत्माराम समत्वानें रहातों. तेथेंच माझें अत्यंत प्रेमानें भजन करावें. ३५ ब्रह्मदेवापासून क्षुद्र कीटकापर्यंत सर्वांच्या हृदयांत मीच एक आहें, असें जो जाणतो तो खरोखर मोठा भाग्यवान् होय. माझ्या प्राप्तीचा ह्याच सर्वांत श्रेष्ठ उपाय आहे. ३६ पण ज्या मज हृदयस्थाच्या प्रकाशानें मन-बुद्धि इत्यादि सर्व वागतात, ज्या मज स्फुरणाच्या स्फूर्तीनें ज्ञानाची व्युत्पत्ति पायावर लोटांगण घालीत येते, ३७ अशा मज हृदयस्थ परमात्म्याचें भजन करणारें कोणीच नाहीं. सर्व लोक बाह्य उपायांची व्यर्थ दगदग करतात व अनर्थांत पडतात. ३८ अशा लोकांत कोणी एखादाच दैववान् आपल्या थोर भाग्यामुळें मज हृदयस्थ आत्मारामाचा विवेक करून माझ्या भजनांत निमग्न होतो. ३९ हृदयस्थाचें भजन केल्यानें आत्मज्ञान होतें, तें वैराग्यपूर्ण ज्ञान झालेलें असल्यामुळें त्यापासून च्युत होण्याची भीति रहात नाहीं. ५४० ज्या ज्ञानाला भिऊन अभिमान घाबरून पळून जातो तें माझें ज्ञान, जे मज हृदयस्थाचें निरंतर भजन करितात त्यांस मी देतों. ४१ तें ज्ञान प्राप्त झालें असतां सर्व आधि-व्याधि तत्काल नाहींशा होतात, संशय तत्क्षणीं पळून जातात व भक्त परम-पदाला पावतात. ४२ यास्तव पराक्रमी वीरानें लखलखीत ज्ञानरूपी शस्त्र पाजळून संशयाचें तडातड तुकडे करावे, असें मीं निक्षून सांगितलें. आतां यावर असा संशय येईल कीं, संसार खरोखर अनुभवास येत असतां, त्याला हातांत शस्त्र घेऊन कोणत्या युक्तीनें तोडावें! ४४ याचें उत्तर देण्यासाठीं संसार ही केवळ भ्रांति आहे, हें पुढील श्लोकांत दृष्टान्त देऊन श्रीपति स्वतः सांगत आहे. ५४५.

ईक्षेत विभ्रममिदं मनसो विलासं दृष्टं विनष्टमतिलोलमलातचक्रम् ।
विज्ञानमेकमरुधेव विभाति माया स्वप्नस्त्रिधा गुणविसर्गकृतो विकल्पः ।। ३४ ।।

देहादिअहंकारपर्यंत । पिंड ब्रह्मांड जें भासत । तें मनोमात्र विलसत । मिथ्याभूत संसारू ।। ४६ ।। जैसें स्वप्नीं निद्रेमाजीं मन । स्वयें देखें त्रिभुवन । तैसेंचि हें दीर्घस्वप्न । अविद्या जाण विकाशी ।। ४७ ।। आन असूनि आन देखती । त्या नांव आभास म्हणती । शुक्तिकेमाजीं रजतभ्रांती । दोरातें म्हणती महासर्पू ।। ४८ ।। सूर्याचे किरण निखळ । ते ठायीं देखती मृगजळ । तैशी शुद्ध वस्तु जे केवळ । तो संसार बरळ ह्मणताती ।। ४९ ।। तया आरोपासी अधिष्ठान । मीचि साचार असें आपण । जेवीं कां कोलिताचे कांकण । अग्नितेजें जाण आभासे ।। ५५० ।। अलातचक्रींचा निर्धार । अग्नि सत्य मिथ्या चक्र । तेवीं निर्धारितां संसार । ब्रह्म साचार संसार मिथ्या ।। ५१ ।। तेथ आधिदैव आधिभौतिक । आध्यात्मादि सकाळिक । अलातचक्राच्याऐसे देख । त्रिगुणमायिक परिणाम ।। ५२ ।। कोलिताचेनि भ्रमभासें । भ्रमणबळें तें चक्र दिसे । क्षणां दिसे क्षणां नासे । तैसा असे हा संसारू ।। ५३ ।। जंव भ्रमणाचे दृढपण । तंव कोलिताचें कांकण । भ्रम गेलिया जाण । कांकणपण असेना ।। ५४ ।। तेवीं जंव जंव भ्रम असे । तंव तंव दृढ संसार भासे । भ्रम गेलिया अनायासें । संसार नसे पाहतांही ।। ५५ ।। मी देहो माझे कलत्र पुत्र । हें भ्रमाचें मुख्य सूत्र । तें न छेदितां पामर ।

पूर्वोक्त अनुमान दाखवितात—

इदं विभ्रमं ईक्षेत—हे जगत् हा विभ्रम आहे असें पहावें [ही अनुमानांतील प्रतिज्ञा आहे, जगत् हा पक्ष, विभ्रम-दर्शन हें साध्य आतां हेतु सांगतात–] **मनसः विलासं दृष्टं विनष्टं स्वप्नः**—कारण ते मनस्पंदनरूप आहे, दृढ आहे विनाशी आहे. (दृष्टान्त–) स्वप्नाप्रमाणें. [आणखी एक हेतु.] **अतिलोलं अलातचक्रं**—कारण तें अतिचंचल आहे. [दृष्टान्त–] अलातचक्राप्रमाणें. [अतिचंचल कोलित जसें नाना आकाराचें भासतें, तसें मनच जगदाकार भासतें. अहोपण, जगद्भ्रमहि निर्विषय कसा होईल ! उत्तर–] **एकं विज्ञानं उरुधा इव विभाति**—एकच विज्ञान अनेकाकार भासतें [निगमन करितात–] **तस्मात् त्रिधा यः गुणविसर्गकृतः विकल्पः [सा] माया**—म्हणून जो हा त्रिविध गुणपरिणामकृत भेद प्रतीत होतो, ती माया आहे. ३४.

देहादिकांपासून अहंकारापर्यंत जें पिंड-ब्रह्मांड भासतें, तो सर्व मनाचा खेळ आहे. म्हणून संसार मिथ्या भूतच आहे. ४६ ज्याप्रमाणें निजलें असतां मन स्वप्नांत त्रिभुवन पहातें, त्याचप्रमाणें हें संसाररूपी दीर्घ स्वप्न आहे. अविद्या त्याचा विकास करिते. ४७ एक असतां जें भलतेंच भासतें, त्याला आभास असें म्हणतात. शिंपी असतां रुप्याचा भास होतो; दोरी महासर्प असल्यासारखी दिसते, सूर्यकिरणांच्या प्रकाशाला आपण मृगजळ समजतो. त्याप्रमाणें जी केवळ शुद्ध आत्मवस्तु तिला वाचाळ लोक संसार असें म्हणतात. ४९ ज्याप्रमाणें पेटलेलें कोलित गरगर फिरविलें असतां अग्नीचें लाल कडेंच दिसतें, त्याप्रमाणें मीच या आरोपाचा आधार आहें. ५५० या अलातचक्राचा म्हणजे फिरत्या कोलिताचा निर्णय केला असतां, त्यांतील अग्नि तेवढा खरा व चक्र जसें मिथ्या, तसेंच संसाराचा विचार केला असतां ब्रह्म तेवढें सत्य व संसार मिथ्या ठरतो. ५१ संसारांतील आधिदैविक, आधिभौतिक व आध्यात्मिक हे सर्व अलातचक्रासारखेच मिथ्या, त्रिगुणात्मक मायेचे परिणाम आहेत. ५२ कोलित फिरत असतां भ्रमानें चक्र दिसतें. क्षणांत दिसतें व क्षणांत नाहींसें होतें. तसाच हा संसार आहे. ५३ कोलिताचें फिरविणें जेव्हां वेगांत असतें तेव्हां कांकणाचा भास होतो. तो भ्रम गेला कीं, कांकणहि गेलें, ५४ त्याप्रमाणें जोंपर्यंत भ्रम असतो तोंपर्यंत संसार भासतो. भ्रम जातांच संसार अनायासानेंच नाहींसा होतो. पाहूं गेल्यास दिसत नाहीं. ५५ परंतु अज्ञजन 'मी देह, माझी स्त्री, माझा पुत्र' हें भ्रमाचें मुख्य सूत्र तोडिल्यावांचून 'मी मुक्त' असा अहंकार

मुक्ताहंकार मिरविती ॥ ५६ ॥ एवं मायामय संसारू । ऐसा जाणोनि निर्धारू । तेथील सांडूनि अत्यादरू । उपरमप्रकारू सांगत ॥ ५७ ॥

दृष्टिं ततः प्रतिनिवर्त्य निवृत्ततृष्णस्तूष्णीं भवेन्निजसुखानुभवो निरीहः ।
सन्दृश्यते क्व च यदीदमवस्तुबुद्ध्या त्यक्तं भ्रमाय न भवेत्स्मृतिरानिपातात् ॥ ३५ ॥

पूर्विल्या भजनपरिपाटीं । सहजें निर्मळ झाली दृष्टी । मिथ्या सांसारिक त्रिपुटी । हा निर्धार पोटीं दृढ होय ॥ ५८ ॥ तेथें सांसारिक त्रिपुटी । सांडूनि उपरमवितां दृष्टी । मज हृदयस्थासी होय भेटी । जेवीं सुवर्णदृष्टीं अळंकारू ॥ ५९ ॥ तेथ दृश्य द्रष्टा दर्शन । मोडूनि त्रिपुटीचें भान । तेचि धारणा तेंचि ध्यान । तेथ समाधान धरावें ॥ ५६० ॥ तेंचि अंगें व्हावया आपणा । सांडावी सकळ तृष्णा । वाचेसी धरावें महामौना । देहचेष्टा जाणा आवराव्या ॥ ६१ ॥ सांडावी वेदशास्त्रव्युत्पत्ति वाड । सांडावी वाग्वादबडबड । भगवद्भावो धरावा दृढ । जेणें आशेचें बूड समूळ छेदे ॥ ६२ ॥ काया वाचा आणि मन । दृढ आवरावें आपण । तुटों नेदावें अनुसंधान । सदा सावधान निजरूपीं ॥ ६३ ॥ ते स्वरूपसुखीं लाधल्या जाण । देहाचें स्फुरेना देहपण । अहंकारेंसीं मावळे मन । स्वानंद पूर्ण वोसंडे ॥ ६४ ॥ तेथ संमुख ना पाठिमोरें । एकपण ना दुसरें । देवो भक्त हेंही नुरे । सुखें सुखभरें सुखरूप ॥ ६५ ॥ मी एक सुखरूप आहें । वेगळेपणें ठावें नोहे । येणें आत्मानुभवें राहे । एवढी प्राप्ती होये मद्भक्तां ॥ ६६ ॥ म्हणाल काष्ठाच्या परी त्यासी । पडला असेल अहर्निशीं । हेंही न

मिरवितात. ५६ याप्रमाणें हा संसार मायावी आहे, असा निश्चय करून त्याविषयीं आसक्ति टाकून मायेपासून सुटण्याचा प्रकार आतां सांगतात. ५५७.

—म्हणून—

ततः दृष्टिं प्रतिनिवर्त्य निजसुखानुभवः भवेत्–दृश्यापासून दृष्टि परतवून स्वतः निजसुखानुभव व्हावें. [त्या अनुभवाच्या स्थैर्यासाठी] निवृत्ततृष्णः तूष्णीं निरीहः भवेत्–तृष्णाशून्य, इंद्रियव्यापाररहित व निरिच्छ व्हावें. [मन, वाक्, व शरीर यांचे व्यापार सोडावे असा याचा भावार्थ. अहोपण, देहवान् म्ह० जिवंत मनुष्याची द्वैतदृष्टि सर्वथा निवृत्त होणें शक्य नाहीं. त्यामुळें पुनः संसार प्राप्त होईलच. उत्तर–] क्व च यदि इदं सन्दृश्यते–आहारादि कांहीं अवश्य व्यापारांमध्यें हे शरीरादि द्वैत प्रवृत्त होत असलेलें जरी दिसलें तरी, अवस्तुबुद्ध्या यत् त्यक्तं तत् भ्रमाय न भवेत्–मिथ्याबुद्धीनें टाकिलेलें जें शरीरादि द्वैत तें पुनः मोहाला कारण होणार नाहीं. तर, आनिपातात् स्मृतिः–वर्तमान शरीर पडेपर्यंत केवळ संस्कारांनीं त्याचा अवभास होईल. ३५.

पूर्वीच्या भजनाच्या संवयीमुळें दृष्टि सहजच शुद्ध होते व ही संसाराची त्रिपुटी मिथ्या आहे हा निश्चय मनांत दृढ होतो. ५८ याप्रमाणें संसारात्मक त्रिपुटी सोडून दृष्टि शांत केली असतां निरनिराळ्या आकाराचे सर्व दागिने जसे एकाच सोन्याचे दिसतात त्याप्रमाणें मज हृदयस्थाची भेट होते. ५९ तेव्हां दृश्य, द्रष्टा व दर्शन हें त्रिपुटीचें भान नाहींसें करून तीच धारणा, तेंच ध्यान समजून तेथेंच चित्त स्थिर करावें. ५६० आपण स्वतः तेंच होण्यासाठीं सगळी तृष्णा टाकून द्यावी. वाचेनें महामौन स्वीकारावें आणि देहाचे व्यापार आंवरून धरावे ६१ वेद-शास्त्र व व्युत्पत्ति यांचा हव्यास सोडावा. वाद-विवाद टाकावा व ज्याच्या योगानें आशेचें मूळ पूर्णपणें तुटेल असा भगद्भाव दृढ करावा. ६२ काया, वाचा व मन यांस स्वाधीन ठेवावें. आत्मस्वरूपाचें अनुसंधान तुटूं देऊं नये; व आत्मस्वरूपांत सर्वदा सावधान रहावें. ६३ तें स्वरूपसुख एकदां प्राप्त झालें कीं, मग देहाचें देहपण स्फुरत नाहीं. अहंकारासह मन लीन होतें व स्वानंद पूर्णपणें भरून येतो. ६४ मग मागें व पुढें, एकत्व व द्वित्व, देव व भक्त ही भावनाच नाहींशी होते. ६५ मीच एक 'आनंद-'स्वरूप आहे; मला वेगळेपणा ठाऊक नाहीं, अशा आत्मानुभवांत तो रहातो. माझ्या भक्तांना एवढी प्राप्ति होते. ६६ तुम्ही

घडे गा तयासी । सांडूनि हेतूसी देहीं वर्ते ॥ ६७ ॥ तोही प्रारब्धाचेनि बळें । आहारनिद्रादि खेळेंमेळें । देहींचीं कर्मे करितां सकळें । सर्वथा नातळे देहबुद्धी ॥ ६८ ॥ दंड काढोनि नेलिया कुंभारें । पहिले भवंडीं चक्र फिरे । तेवीं प्रारब्धाचेनि संस्कारें । कर्मानुसारें देह वर्ते ॥ ६९ ॥ कुलालचक्रीं बैसली माशी । न हालतां भोंवे चक्रासरसी । कोटी फेरे म्हणती तिसी । तेवीं मुक्तासी देहकर्मे ॥ ५७० ॥ यापरी देहकर्मी वर्ततां । ज्ञाता न म्हणे अहं कर्ता । जेवीं वाऱ्याचिया स्वभावता । दिसे चपळता गलितपत्रीं ॥ ७१ ॥ जेवीं कां पुरुषासवें छाया असे । परी ते छायेसी पुरुष न बैसे । तेवीं ज्ञात्यासवेंही देह दिसे । परी तो देहदोषें मैळेना ॥ ७२ ॥ निजछायेसी बैसों जातां । छायाचि पळे तत्त्वतां । तेवीं मद्भक्तीं माया पाहतां । देह स्वभावतां मिथ्यात्वें पळे ॥ ७३ ॥ हो कां मुक्ताफळांची माळा । भ्रमें सर्परूप भासे डोळां । तेचि भ्रमांतीं घालितां गळां । नुपजे कंटाळा सर्पभयाचा ॥ ७४ ॥ तेवीं अधमोत्तम योनी । कां वंद्यानिंद्य जे जनीं । ते मी म्हणतां ज्ञानी । शंका न मानी देहमिथ्यात्वें ॥ ७५ ॥ यापरी ते अतिसज्ञान । जाणोनि देहाचें मिथ्याभान । देहकर्मी वर्ततां जाण । देहाचें देहपण स्फुरेना ॥ ७६ ॥ तो देहो सर्वांगीं तोडितां । कां वृकव्याघ्रादिकीं फाडितां । कां अग्निमाजीं धडाडितां । त्यासी देहअहंता स्फुरेना ॥ ७७ ॥ आपुली छाया देखिली शूळीं । तीलागीं पुरुष न तळमळी । तेवीं देहाची होत होळी । ज्ञाता न डंडळी निजबोधें ॥ ७८ ॥ म्हणाल देहसंगें वर्ततां । केवीं बाधीना देहअहंता । सांडूनि अंगींची क्षारता । लवण वर्ततां उरे कैसें ॥ ७९ ॥ हिंग सांडूनि आपुली घाणी । केवीं राहेल सुगंधपणीं । निःशेष सांडूनि अंगींचें पाणी । केळीं केळीपणें उरे कैंची ॥ ५८० ॥ न झुंझें म्हणोनि रणीं रिघतां ।

कदाचित् म्हणाल कीं, तो आत्मज्ञानी भक्त रात्रंदिवस लांकडासारखा पडत असेल, परंतु तसें घडत नाहीं. तो आसक्ति सोडून देहांतच रहात असतो. ६७ तो आपल्या कर्मानुसार आहार, निद्रा इत्यादि देहाचीं सर्व आवश्यक नित्य कर्मे गोडीगुलाबीनें करीत असतो व तीं देहकर्मे करीत असतां देहबुद्धीचा मात्र स्पर्शहि होऊं देत नाहीं. ६८ घट बनविल्यावर कुंभारानें लांकडाचा दांडा जरी काढून घेतला तरी गतीचा वेग संपेपर्यंत जसें चक्र फिरतच रहातें, त्याप्रमाणें कर्मानुसार देह वागतच असतो. ६९ कुंभाराच्या चक्रावर एखादी माशी बसली तर ती जागेवरून न हालतांहि चक्राबरोबर फिरत असते, त्यामुळें तिनें कोट्यवधि फेरे घेतले असें म्हणतात व वस्तुतः ती एकहि फेरा घेत नाहीं. तशींच मुक्ताचीं देहकर्मे आहेत. ५७० गळालेलीं पानें जशीं वाऱ्याच्या स्वाभाविक गतीनें उडत असतात, तसा ज्ञानी देहाचीं कर्मे करीत असतो. पण तीं करिते वेळीं 'मी कर्ता' असें म्हणत नाहीं. ७१ मनुष्याची छाया त्याच्याबरोबर असते, परंतु स्वतःच्याच सांवलींत जसें कोणाला बसतां येत नाहीं त्याप्रमाणें आत्मवेत्त्याबरोबर त्याचें शरीर जरी दिसत असलें, तरी तो शरीरदोषानें लिप्त होत नाहीं. ७२ स्वतःच्याच छायेंत जर बसावयास गेलें तर ती छाया जशी आपल्यापुढें पळूं लागते, तशी माझ्या भक्तामध्यें माया पाहूं गेलें असतां देह स्वभावतःच मिथ्यात्वानें पळून जातो. ७३ किंवा मोत्यांची माळ भ्रमानें सर्पासारखी जरी भासली, तरी तो भ्रम घालवून ती गळ्यांत घातली असतां जशी सर्पाची भीति उरत नाहीं, ७४ त्याप्रमाणेंच लौकिकांत अधम व उत्तम योनींत जन्मलेलें, किंवा जगांत वंद्य व निंद्य झालेले लोक 'मी ज्ञानी' असें म्हणतांना देहाच्या मिथ्यात्वामुळें मनांत आपल्या ज्ञानित्वाची शंकाहि आणीत नाहींत. ७५ याप्रमाणें तें अत्यंत ज्ञानी होऊन शरीराचीं कर्मे जरी करीत असले तरी, त्यांना देहाचें देहत्व स्फुरत नाहीं. ७६ त्यांच्या देहाचे तुकडे केले, किंवा त्यांस वाघ, लांडगे यांनीं फाडिलें, किंवा जळजळीत अग्नींत त्यांचा देह होरपळत असला, तरी त्यांचा देहाभिमान जागृत होत नाहीं. ७७ आपलीच छाया जर सुळावर चढविलेली कोणीं पाहिली, तर तिच्यासाठीं त्याचा जीव जसा तळमळत नाहीं, त्याप्रमाणें ज्ञानी मनुष्य देहाची होळी होत असली तरी आत्मबोधानें डगमगत नाहीं. ७८ यावर तुम्ही असें म्हणाल कीं, देहांत राहून देहाभिमान कसा बाधत नाहीं ! मीठ आपल्या अंगचा खारटपणा टाकून कधीं रहातें कां ! ७९ किंवा

जेवीं कां घाय वाजती माथा । तेवीं देहासंगें वर्ततां । देहअहंता सोडीना ॥ ८१ ॥ येविषयीं ऐका सावधान । ज्ञात्यासी देहाचें बाधित भान । तेथें स्फुरे जो अभिमान । तो भर्जित जाण बीज जैसें ॥ ८२ ॥ भर्जित बीजें जाण । हों शके क्षुधाहरण । परी करितां बीजारोपण । अंकुर जाण त्या नाहीं ॥ ८३ ॥ चित्रामाजीं व्याघ्र दिसे । परी बाधकत्व त्यासी नसे । तेवीं भर्जित अभिमानशेषें । बाधा नसे ज्ञात्यासी ॥ ८४ ॥ चित्रींच्या वाघासी जाण । निःशेष नाहीं व्याघ्रपण । तेवीं मुक्तांच्या देहासी जाण । देहपण असेना ॥ ८५ ॥ दृढ ठसावल्या चैतन्यघन । स्वरूपीं वृत्ति होय निमग्न । तेव्हां दिसतेंही भर्जित भान । तेंही स्फुरण निमालें ॥ ८६ ॥ ऐशी मावळल्या स्मृती । ज्ञात्याची वर्तेती स्थिती । स्वयें सांगतु श्रीपती । यथानिगुतीं निजबोधें ॥ ८७ ॥ सर्व कर्मीं वर्ततां जाण । देहाचें स्फुरेना देहपण । तें मुख्य समाधिलक्षण । स्वयें श्रीकृष्ण सांगत ॥ ८८ ॥

देहं च नश्वरमवस्थितमुत्थितं वा सिद्धो न पश्यति यतोऽध्यगमत्स्वरूपम् ।
दैवादुपेतमुत दैववशादपेतं वासो यथा परिकृतं मदिरामदांधः ॥ ३६ ॥

जया देहाचेनि मद्भजनें । माझें शुद्ध स्वरूप पावणें । या देहासी विसरिजे तेणें । मी माझेपणें देखेना ॥ ८९ ॥ जेवीं कां भाडियाचें घोडें । जेणें आणिलें निजधामा रोकडें । तें आहे कीं गेलें कोणीकडे । हें स्मरेना पुढें तो जैसा ॥ ५९० ॥ हो कां भेटावया भ्रतारासी । सवें मजुर आणी विश्वासी ।

हिंग आपला उग्र वास सोडून सुवासिक होऊन कधीं रहातो का ! ५८० किंवा आपल्या अंगांतील पाणी पूर्णपणें टाकून केळ आपलें केळीपण सोडून रहातें कां ! मी युद्ध करीत नाहीं, असें म्हणून जरी रणांगणांत गेलें तरी मस्तकावर घाव बसणारच. त्याप्रमाणें देहांत राहून देहाभिमान सुटणें शक्य नाहीं. ८१ तर या तुमच्या आशंकेचें उत्तर सावधानपणानें ऐका. ज्ञानी माणसाला देहाचें जें बाधित झालेलें भान होतें व त्यांत जो देहाभिमान स्फुरतो तो भाजलेल्या बीजाप्रमाणें निर्बीज असतो. ८२ भाजलेल्या बीजानें भुकेचें निवारण होतें, परंतु तें बीज पेरलें तर त्याला अंकुर फुटत नाहीं. (सु. पंचदशी तृप्तिदीप ६५ पृ. ३७८) ८३ चित्रांतील वाघ दिसतो, पण तो जसा बाधक नसतो, तसा निर्बीज झालेल्या अभिमानाचा अवशेष ज्ञानी मनुष्याला बाधत नाहीं. ८४ चित्रांतील वाघाला जसें पूर्णपणें व्याघ्रत्व नसतें, तसें मुक्तांच्या देहाला देहपण नसतें. ८५ हृदयांत चैतन्यघन दृढ ठसला म्हणजे त्याच्याच स्वरूपांत वृत्ति निमग्न होते. मग आभासमात्र प्रतीत होणारेंहि भान रहात नाहीं. ८६ याप्रमाणें स्मृति नाहींशी झाल्यावर ज्ञानी कसा वागतो हें स्वतः श्रीपति आतां आत्मबोधानें चांगल्या प्रकारें सांगत आहे. ८७ सर्व कर्में करीत असतां देहाचें देहपण स्फुरत नाहीं. हेंच समाधीचें मुख्य लक्षण आहे. असें श्रीकृष्ण स्वतः सांगत आहे. ५८८.

—याचेंच उपपादन करितात—

यतः स्वरूपं अध्यगतम्–ज्याअर्थीं स्वरूपाला जाणलें आहे त्या अर्थीं, सिद्धः उत्थितं अवस्थितं वा क्वचित् दैवात् अपेतं च उत दैववशात् उपेतं नश्वरं देहं न पश्यति–सिद्ध आसनावरून उठलेल्या किंवा उठून पुनः तेथेंच बसलेल्या अथवा दैववशात् तेथून कोठें गेलेल्या किंवा पुनः यदृच्छेनें तेथेंच आलेल्या नश्वर देहाला पहातहि नाहीं. [मग इतर द्वैताला कोठून पहाणार ! याविषयीं दृष्टान्त–] यथा मदिरामदांधः परिकृतं वासः–मदिरा प्राशन करून मदांध झालेला मद्यपी जसा आपल्या शरीरावरील वस्त्रालाहि विसरतो, त्याप्रमाणें. ३६.

ज्या देहानें माझें भजन करून माझ्या शुद्ध स्वरूपाला प्राप्त व्हावयाचें त्या देहाला विसरावें. त्यावर 'मी व माझें' हा भाव ठेवूं नये. ८९ भाड्याच्या घोड्यावर बसून आपल्या स्वस्थानीं जाऊन पोंचल्यानंतर मग तें घोडें आहे कीं गेलें, याची जशी आठवणहि रहात नाहीं, ५९० किंवा पतिगृहीं जाणारी स्त्री सोबतीला

ते पतीसीं पहुडल्या राणिवसीं । त्या मजुरासी विसरली ॥ ९१ ॥ कां जो दैवयोगें पालखीं चढे । तो पूर्वील तुटके मोचडे । आहेत कीं गेले कोणीकडे । हें स्मरेना पुढें तेणें हरिखें ॥ ९२ ॥ हो कां बहु काळें पत्नी जैसी । भर्तारू मीनल्या निजसेजेसी । ते निःशेष विसरे लाजेसी । देहाची तैसी दशा जाहली ॥ ९३ ॥ त्या दांपत्याचे सुखभेटी । पारकें देखतां लाज उठी । तेवीं देहाचें भान द्वैतदृष्टीं । मदैक्यपुष्टीं देह कैंचें ॥ ९४ ॥ एवं पावोनि माझ्या स्वरूपासी । स्वानन्दपूर्ण साधकासी । सुखें सुखरूपता जाहली त्यासी । निजदेहासी विसरोनी ॥ ९५ ॥ मग उठलें कीं बैसलें । चालतें कीं राहिलें । जागतें कीं निजलें । हें स्मरण ठेलें देहाचें ॥ ९६ ॥ हें धालें कीं भुकेलें । हिंवलें कीं तापलें । प्यालें कीं तान्हलें । राहिलें उगलें स्मरेना तो ॥ ९७ ॥ हें येथें कीं तेथें । मुकें कीं बोलतें । होतें कीं नव्हतें । स्मरणसहितें स्मरेना तो ॥ ९८ ॥ हें ओवळें कीं सोवळें । चोखट कीं मैळें । डोळस कीं आंधळें । अंगीं पांगुळलें स्मरेना तो ॥ ९९ ॥ हें आलें कीं गेलें । होतें कीं केलें । जाहलें कीं मेलें । तटस्थ राहिलें स्मरेना तो ॥ ६०० ॥ हें बाळ कीं प्रौढ । मोठें कीं रोड । हळु कीं जड । आणणें दृढ स्मरेना तो ॥ १ ॥ हें खाटे कीं भुयीं । ठायीं कीं कुठायीं । आहे कीं नाहीं । हेंहीं पाहीं स्मरेना तो ॥ २ ॥ हें मंत्रीं कीं तंत्रीं । तीर्थीं कीं क्षेत्रीं । विष्ठीं कीं मूत्रीं । आहे पवित्रीं स्मरेना तो ॥ ३ ॥ जनीं कीं वनीं । अथवा निरंजनीं । जपीं कीं ध्यानीं । हेंहीं मनीं स्मरेना तो ॥ ४ ॥ हें सुजनीं कीं दुर्जनीं । बंदीं कीं विमानीं । मंदिरीं कीं मसणीं । पाहती कोणी स्मरेना तो ॥ ५ ॥ हें गजीं कीं तुरगीं । कीं अंगना-संभोगीं । खरीं कीं उरगीं । अंगींच्या अंगीं स्मरेना तो ॥ ६ ॥ हें काशीं कैकटीं । नरकीं कीं वैकुंठीं । घरीं कीं कपाटीं । राहिलें नेहटीं स्मरेना तो ॥ ७ ॥ हें पूजिलें कीं गांजिलें । धरिलें कीं मारिलें । देहाचें येकही केलें । अथवा काय झालें स्मरेना तो ॥ ८ ॥ मी शेषशयनावरी । कीं मातंगाच्या घरीं । कीं

बरोबर गडी घेऊन जाते, पण तिला पतीची भेट होऊन ती अंतःपुरांत गेली कीं, मग त्या गड्याला विसरून जाते, ९१ किंवा एखादा मनुष्य पालखींत बसला म्हणजे मग त्या आनंदापुढें त्याला आपले पूर्वीचे फाटके जोडे आहेत कीं हरवले याचें मानहि रहात नाहीं, ९२ किंवा पत्नीला पतीचा पुष्कळ सहवास घडला म्हणजे मग ती जशी त्याच्याशीं पूर्णपणें लाज सोडून वागते, तशी देहाची स्थिति होते. ९३ त्या दाम्पत्याला एकांतांत कोणी परकें दिसतांच जशी लाज वाटते, तशी द्वैतदृष्टि आली कीं देहभान होतें. पण पूर्ण मदैक्य झाल्यावर देहभान कोठचें ! ९४ याप्रमाणें माझ्या स्वरूपाला प्राप्त होऊन साधक देहभान विसरतो व पूर्ण स्वानंदाचा अनुभव घेतो. सुखानेंच त्याची सुखस्वरूपता होते. ९५ मग शरीर उठलें कीं बसलें, चाललें कीं स्थिर राहिलें, जागें आहे कीं निजलें, याचें त्याला स्मरण रहात नाहीं. ९६ तें तृप्त झालें कीं उपाशी राहिलें, गारठलें कीं तापलें, जल प्यालें कीं तान्हेलें, कीं उगेंच राहिलें, ९७ तें येथें कीं तेथें, मुकें कीं बोलकें, होतें कीं नव्हतें, ९८ तें ओवळें कीं सोवळें, स्वच्छ कीं मलिन, डोळस कीं आंधळें, कीं स्वतःच पांगुळलें आहे, ९९ तें आलें कीं गेलें, होतें कीं नव्हतें, जगलें कीं मेलें, कीं तटस्थ राहिलें, ६०० तें तान्हें बाळ आहे कीं प्रौढ आहे, लठ्ठ आहे कीं रोड आहे, हलकें आहे कीं जड आहे. १ तें खाटेवर आहे कीं भूमीवर आहे, चांगल्या जागीं आहे कीं वाईट जागीं आहे, तें आहे कीं नाहीं, २ तें मंत्रांत आहे कीं तंत्रांत आहे, तीर्थांत आहे कीं क्षेत्रांत आहे, घाणींत आहे कीं पवित्र जागीं आहे, ३ जनांत आहे कीं वनांत आहे, कीं निर्जनप्रदेशीं आहे, जपांत आहे कीं ध्यानांत आहे, ४ सज्जनांत आहे कीं दुर्जनांत, बंदिवासांत कीं विमानांत, देवळांत कीं स्मशानांत, ५ हत्तीवर कीं घोड्यावर, स्त्रीविलासांत कीं, सर्पविलासांत कीं गर्दभविलासांत, ६ काशींत आहे कीं कैकाड्याच्या मुलखांत आहे, नरकांत आहे कीं, वैकुंठांत आहे, घरांत आहे कीं, गुहेंत आहे, याचें त्याला मुळींच भान नसतें. ७ त्याची पूजा केली किंवा त्याला गांजिलें, त्याला धरिलें किंवा मारिलें, त्याच्या देहाचें कांहीं जरी केलें व झालें तरी त्याला त्याचें स्मरण नसतें. ८ मी शेषशायी आहें कीं मांगाच्या घरीं आहें, कीं मला सुळावर चढविलें

बैसलों शूळावरी । हेंही न स्मरी सहसा तो ॥ ९ ॥ ऐशी ज्ञात्याची निरभिमानता । माझेनि न सांगवे तत्त्वतां । जे पावले माझी सायुज्यता । त्यांची कथा न बोलवे ॥ ६१० ॥ जेथ वेदां मौन पडे । स्वरवर्णेंसी वाचा बुडे । त्या संतांचे पवाडे । माझेनिहि निवाडे न सांगवती ॥ ११ ॥ ऐकोनि सज्ञानाची स्थिति । तुम्हांसी गमेल ऐसें चित्तीं । केवळ जड मूढ झाली प्राप्ती । एकही स्फूर्ती स्फुरेना ॥ १२ ॥ जेवीं कां केवळ पाषाण । तैसें झालें अंतःकरण । एकही स्फुरेना स्फुरण । ज्ञातेपण घडे कैसें ॥ १३ ॥ ऐशी धरिल्या आशंका । तेविषयीं सावध ऐका । ज्ञानअज्ञानभूमिका । अतर्क्य लोकां निश्चित ॥ १४ ॥ केवळ जें शुद्ध ज्ञान । आणि जडमूढ अज्ञान । दोहींची दशा समान । तेथीलही खूण मी जाणें ॥ १५ ॥ निबिड दाटला अंधकारू । त्यामाजीं काजळाचा डोंगरू । तेथ आंधळा आला विभाग करूं । तैसा व्यवहारू अज्ञाना ॥ १६ ॥ शोधावया अध्यात्मग्रंथ भले । अंधमूकाहातीं दीधले । तें ऐके देखे ना बोले । तैसें जडत्वें झालें अज्ञान ॥ १७ ॥ ऐशी अज्ञानाची गती । ऐका सज्ञानाची स्थिती । अपरोक्षसाक्षात्कारप्रतीती । देहीं वर्तती विदेहत्वें ॥१८॥ जेवीं कां रत्नें आणि गारा । दोहींचा सारिखा उभारा । मोल वेंचूनि नेती हिरा । फुकट गारा न घेती ॥ १९ ॥ जैसें कण आणि फलकट । दोहींसी वाढी एकवाट । तैसें ज्ञानाज्ञान निकट । दिसे समसकट सारिखें ॥ ६२० ॥ जेवीं कां खरें कुडें नाणें । पाहतां दिसे सारिखेंपणें । खरें पारखोनि घेती देखणें । मूर्खीं नाडणें तें ठायीं ॥ २१ ॥ तेवीं ज्ञानाज्ञानाची पेंठ । भेसळली दिसे एकवाट । तेथ अणुभरी चुकल्या वाट । पाखंड उद्धट अंगीं वाजे ॥ २२ ॥ यालागीं मद्भक्तीपाशीं आले । जे माझ्या विश्वासा टेंकले । त्यांसी म्यां निजरूप

आहे, याचेंहि त्याला कधीं भान नसतें. ९ ज्ञानी भक्ताचा देहावरील निरभिमान अशा प्रकारचा असतो. त्याचें मला पूर्ते वर्णनहि करितां येत नाहीं. जे माझ्या सायुज्य मुक्तीला प्राप्त झाले त्यांची कथा सांगतां येत नाहीं. ६१० जेथें वेद मौन धरितात, स्वर-वर्ण यांची वाणी कुंठित होते त्या संतांची कीर्ति माझ्यानें निर्णय करून सांगवतहि नाहीं. ११ अशी ही ज्ञानी लोकांची स्थिति ऐकून तुमच्या मनाला असें वाटेल कीं, माझी प्राप्ति झाली म्हणजे ते केवळ जड-मूढ बनतात. त्यांना कसलीच स्फूर्ति होत नाहीं. १२ त्यांचें अंतःकरण पाषाणासारखें केवळ जड बनतें व त्यांस कशाचीच स्फूर्ति होत नाहीं. मग त्यांना ज्ञानीपणा कसा येतो ! १३ अशी जर आशंका घ्याल, तर त्याचेंहि उत्तर सावधान चित्तानें ऐका. ज्ञान व अज्ञान या अवस्था सर्व लोकांना खात्रीनें अतर्क्य आहेत. १४ जें केवळ शुद्ध ज्ञान व जें जड-मूढ अज्ञान, त्या दोन्ही अवस्था जरी सारख्याच दिसतात तरी त्यांतील खूण मी जाणतों. १५ दाट पसरलेल्या अंधारांत जसा काजळाचा डोंगर असावा व त्याचा विभाग करण्यास एखाद्या आंधळ्या माणसानें जावें, त्याप्रमाणें या अज्ञान लोकांचा व्यवहार असतो. १६ अध्यात्म शास्त्राचे मोठाले ग्रंथ आंधळ्या व मुक्या माणसापाशीं शुद्ध करावयास दिले तर त्यांना जसें ऐकूं येत नाहीं, बोलतां येत नाहीं व पहातांहि येत नाहीं, त्याप्रमाणें जडपणामुळें अज्ञानी लोकांची स्थिति झाली आहे. १७ ही अज्ञलोकांची अवस्था झाली. आतां ज्ञानी माणसांची स्थिति ऐका. त्यांना साक्षात् आत्मज्ञानाचा अनुभव आल्यामुळें ते देहांत असूनहि विदेही असल्याप्रमाणें वागतात. १८ हिरे व गारा दोन्ही दिसावयास सारखेच असतात. पण हिरा भरपूर किंमत देऊन विकत घेतात व गार कोणी मोफतहि घेत नाहीं. १९ ज्याप्रमाणें धान्य व त्यावरील फोलकट, हीं बरोबरच वाढत असतात, त्याप्रमाणें ज्ञान व अज्ञान परस्पर सादृश्यामुळें सारखेंच दिसत असतें. ६२० खरें व खोटें नाणें जसें दिसावयास सारखेंच दिसतें; पण जाणते लोक त्यांतील खरें पारखून घेतात व मूर्ख खोटें नाणें पदरांत घेऊन फसतात. २१ त्याप्रमाणें ज्ञान व अज्ञान यांची भेसळ होऊन पेठ पिकली आहे. तेथें सौदा करण्यांत अणुभरहि जर कां चूक झाली तर पूर्ण पाखंडत्व अंगीं येतें. २२ यास्तव जे माझ्या भक्तींत शिरले व ज्यांनीं मजवर पूर्ण विश्वास ठेविला त्यांना मीं

आपुलें। खरें दीधलें अतिशुद्ध ॥ २३ ॥ माझ्या नामविश्वासासाठीं। प्रल्हाद द्वंद्वें पायें पिटी। न घेतां मुक्ती लागे पाठीं। विश्वासें भेटीं माझ्या रूपीं ॥ २४ ॥ पावोनि माझ्या निज-स्वरूपासी। तेंचि तें झालें मद्भावेंसी। जेवीं लवण मीनल्या जळासी। लवणपणासी मूकलें ॥ २५ ॥ तेथ मी एक लवण। हेही विराली आठवण। स्वयें समुद्र झालें जाण। तेवीं सज्ञान मद्रूपें ॥ २६ ॥ ऐसें पावोनि माझ्या स्वरूपासी। विसरले देहअभिमानासी। झाले चैतन्यघन सर्वांशीं। आनंदसमरसीं निमग्न ॥ २७ ॥ जेवीं दोरीं सर्पू उपजला। नांदोनि स्वयें निमाला। तो दोरें नाहीं देखिला। तैसा झाला देहभावो मुक्तां ॥ २८ ॥ तेव्हां मी तूं हे आठवण। आठवितें आहे कोण। विसरोन गेलें अंतःकरण। आपण्या आपण विसरला ॥ २९ ॥ तेथ कैंचा स्वर्ग कैंचा नरक। कैंचें चोख कैंचें वोख। कैंचें चतुर्दश लोक। ब्रह्म एक एकलें ॥ ६३० ॥ कैंचें पवित्र कैंचें अपवित्र। कैंचें तीर्थ कैंचें क्षेत्र। कैंचा वेदू कैंचें शास्त्र। ब्रह्म स्वतंत्र अद्वय ॥ ३१ ॥ तेथ कैंचा उत्पत्तिविनाशू। कैंचा वैकुंठ कैलासू। कैंचा ब्रह्मा विष्णु महेशू। एक अविनाशू उरलासे ॥ ३२ ॥ तेथ कैंचा बोधू कैंची बुद्धी। देवपण बुडालें त्रिशुद्धी। लाजा निमाली मोक्षसिद्धी। कैंचा क्षीराब्धीशेषशायी ॥ ३३ ॥ तेथ माझीही भगवंतता। हारपोनि जाय तत्त्वतां। प्रणवाचा बुडाला माथा। ऐसी सायुज्यता पावले ॥ ३४ ॥ यालागीं देहाचें केलें ठेलें। अथवा आलें कां गेलें। हें स्फुरेना जें बोलिलें। तें विशद केलें या रीतीं ॥ ३५ ॥ अविद्या कारण देह कार्यें। ते अविद्या नासोनि जाये। कारण नासल्या कार्य राहे। हें न घडे पाहें म्हणाल ॥ ३६ ॥ वृक्ष समूळीं उपडिला जाये। सार्द्रता तत्काळ न जाये। पत्र पुष्प फळ सार्द्र राहे। शुष्क होये अतिकाळें ॥ ३७ ॥ तेवीं अविद्या नासोनि जाये। भोगानुरूप दैव जें राहे।

आपलें अति निर्मल आत्मस्वरूप प्राप्त करून दिलें. २३ प्रल्हादानें माझ्या नामस्मरणावरील दृढ निश्चयानें द्वंद्वाला पायांखालीं तुडविलें. त्यानें इच्छा न करितां मुक्ति त्याच्या पाठीस लागली; पण केवळ विश्वासानें त्याला माझ्या स्वरूपाची प्राप्ति झाली. २४ ज्याप्रमाणें मीठ पाण्यांत पडून विरलें कीं, त्याचा मीठपणा नाहींसा होतो, त्याप्रमाणें माझ्या स्वरूपाला प्राप्त होऊन भक्त मद्भावनेनें मद्रूप होतात. २५ पाण्यांत विरलेल्या मिठाला जशी 'मी मीठ आहें' ही आठवण नाहींशी होऊन तें स्वतःच समुद्ररूप होतें, तसा ज्ञानी माझ्या स्वरूपांत मिळून जातो. २६ याप्रमाणें माझ्या स्वरूपाला प्राप्त होऊन भक्त देहाभिमान विसरतात व सर्वप्रकारें चैतन्यरूप होऊन सच्चिदानंदांत निमग्न होतात. २७ ज्याप्रमाणें दोरीवर भासलेला सर्प उत्पन्न होतो व आपणच नाहींसा होतो, दोरीनें तो कांहीं पाहिलेला नसतो, त्याप्रमाणें मुक्तांना देहभाव भासत नाहीं. २८ त्यावेळीं 'मी-तूं' हें स्मरण तरी कोणाला होणार! अंतःकरणहि विसरलें व तो आपणच आपल्याला विसरला. २९ तेथें मग स्वर्ग कोठचा व नरक कोठचा! बरें-वाईट कोठचें व चवदा भुवनें कोठचीं! केवळ एकच ब्रह्म रहातें! ६३० पवित्र-अपवित्र, तीर्थ-क्षेत्र व वेद-शास्त्र कोठचें! एक स्वतंत्र अद्वय ब्रह्मच. ३१ तेथें उत्पत्ति-विनाश, वैकुंठ-कैलास, ब्रह्मा-विष्णु-महेश कोठचे! एक अविनाशी ब्रह्म उरतें. ३२ तेथें बोध व बुद्धि कोठची! देवपण खरोखर बुडून जातें! मोक्षसिद्धि लाजेनें नाहींशी होते! मग क्षीराब्धि शेषशायी कोठचा! ३३ तेथें माझाहि भगवान्‌पणा तत्त्वतः लोपून जातो. प्रणवाचें श्रेष्ठत्व बुडून जातें. अशा सायुज्यमुक्तीला ते प्राप्त होतात. ३४ यास्तव 'शरीरानें कांहीं केलें, तें राहिलें, आलें, गेलें यांतील कशाचेंहि त्याला भान नसतें' असें जें वर म्हटलें होतें, तें अशा प्रकारें स्पष्ट करून मीं सांगितलें. ३५ देहाचें मूळ कारण अविद्या आहे व देह अविद्येचें कार्य आहे. तेव्हां त्या अविद्येचाच नाश झाल्यावर तिचें कार्य राहील, हें संभवत नाहीं. ३६ पण असें जरी असलें तरी वृक्ष समूळ उपटून पडला असतांहि त्याची आर्द्रता तत्काळ कांहीं नाहींशी होत नाहीं. तर त्याचीं पानें, फुलें व फळें कांहीं वेळ तशींच टवटवीत राहून हळूहळू सुकतात, ३७ त्याप्रमाणें

तेणें ज्ञाता वर्तताहे । निजदेहीं पाहें विदेहत्वें ॥ ३८ ॥ म्हणाल वाढवितां वाडेंकोडें । प्रतिपाळितां सुरवाडें । राखतराखतां देह पडे । प्रत्यक्ष रोकडें दिसताहे ॥ ३९ ॥ ज्याचें देह त्यासी दृढ नव्हे । तरी तें तत्काळचि पडावें । वांचलें असे कोणभावें । ऐसें कांहीं जीवें कल्पाल ॥ ६४० ॥ ज्याचें देह तो न पुसे त्यातें । तरी तें देह केंवीं कर्मीं वर्ते । ऐशी आशंका तुम्हांतें । ऐका सावचित्तें सांगेन ॥ ४१ ॥ देहाचें उत्पत्तिस्थितिनिधन । पुरुषासी वश्य नव्हे जाण । त्यासी अदृष्टचि प्रमाण । दैवयोगें चळण देहाचें ॥ ४२ ॥ उठणें कां बैसणें । तें देहासी दैवगुणें । अदृष्टगतीं देणें घेणें । खाणें जेवणें अदृष्टें ॥ ४३ ॥ स्वदेशीं कां परदेशीं । अदृष्ट नेतसे देहासी । स्वर्ग नरक भोगासी । अदृष्ट देहासी उपजवी ॥ ४४ ॥ यश लाभ हानि मृत्यु । देहासी अदृष्टें असे होतु । ज्ञाता देहासी अलिप्तु । जैसा घटांतु चंद्रमा ॥ ४५ ॥ जैशी छाया पुरुषासरसी । तैशी काया सज्ञानासी । ते राहिली अदृष्टापाशीं । निजकर्मासी भोगावया ॥ ४६ ॥ जन्मोनि छाया सरसी वाढे । माझी ऐशी अहंता न चढे । तैसेंच देह ज्ञात्याकडे । मी म्हणोनि पुढें येवों न शके ॥ ४७ ॥ सदा छाया सरिसी असे । परी कोठें असे कोठें नसे । हें ज्याची तो न पुसे । देहाचें तैसें वर्तन झालें ॥ ४८ ॥ छाया विष्ठेवरी पडे । कां पालखीमाजीं चढे । पुरुषासी सुखदुःख न जोडे । ज्ञात्यासी तेणें पाडें देहभोग ॥ ४९ ॥ येथवरी निजदेहासी । कैसेन विसर पडिला त्यासी । ऐक त्याही अभिप्रायासी । दृष्टांतेंसी सांगेन ॥ ६५० ॥ जो मोलें मदिरा पिवोनि ठाये । तो तेणें मदें नाचे गाये । देहवंत देह विसरोनि जाये । वस्त्र नाहीं आहे स्मरेना ॥ ५१ ॥ हा तंव ब्रह्मरस प्याला । परमानन्दें तृप्त झाला । देहो झाला कीं मेला ।

अविद्या निवृत्त झाल्यावरहि भोग देणारें प्रारब्ध कर्म रहातें. त्याच्यायोगानें ज्ञाता आपल्या देहांतच विदेहत्वानें म्ह० देहाभिमान सोडून रहातो. ३८ यावर तुम्ही कदाचित् असें म्हणाल कीं, अहो, या देहाला प्रत्येक जीव मोठ्या कळकळीनें वाढवितो. मोठ्या दक्षतेनें त्याचें प्रतिपालन करितो. त्याचें रक्षण करितां करितां तो मरूनहि जातो. हें प्रत्यक्ष दिसत आहे. ३९ ज्याचा देह त्याचाहि जर तो निश्चयानें नव्हेच तर त्यानें तत्काळ पडावयास पाहिजे होतें, मग वांचतो कसा! असा कदाचित् तुम्ही आपल्या मनांत संशय आणाल, ६४० म्ह० ज्याचा देह तोच त्याला जर विचारीत नाहीं तर तो देह कर्मांत तरी कसा प्रवृत्त होतो! या तुमच्या शंकेचें समाधान सांगतों, तेंहि स्वस्थ चित्तानें ऐका. ४१ देहाचे उत्पत्ति-स्थिति-लय पुरुषाच्या स्वाधीन नाहींत. त्याला प्रारब्धच प्रमाण आहे. पूर्वकर्मानुसार देहाचा व्यापार होत असतो. ४२ देहाचें उठणें, बसणें दैवाधीन असतें. त्याचें खाणेंपिणें, देणें-घेणें हें सर्व अदृष्टाप्रमाणें घडत असतें. ४३ प्रारब्धच देहाला स्वदेशीं किंवा परदेशीं नेत असतें. अदृष्टच स्वर्ग व नरक भोगण्यासाठीं देह निर्माण करितें. ४४ यश, लाभ, हानि, मृत्यु, हीं सर्व देहाला प्रारब्धानुसारच प्राप्त होतात. परंतु भांड्यांतील चंद्रबिंब जसें त्यांतील पाण्यानें लिप्त होत नाहीं, तसा ज्ञानी या सर्वांपासून अलिप्तच असतो. ४५ छाया जशी मनुष्याच्या बरोबर असते, तसाच देह ज्ञानी माणसाबरोबर असतो. तो कर्मानुसार आपलें कर्मफळ भोगण्यासाठीं राहिलेला असतो. ४६ माणसाची छाया उत्पन्न झाल्यापासून एकसारखी वाढत असली तरी 'ती माझी' असा अभिमान तो ठेवीत नाहीं. त्याप्रमाणें देहहि ज्ञात्याकडे 'मी' असे म्हणून पुढें येऊं शकत नाहीं. ४७ छाया निरंतर देहाबरोबर असते; पण ती कोठें आहे व कोठें नाहीं, याचा ज्याचा तो विचारहि करीत नाहीं. त्याचप्रमाणें ज्ञानी आपल्या देहाशीं वागतो. ४८ आपली छाया घाणींत पडली किंवा पालखींत बसली तरी त्याचें जसें कोणाला सुख-दुःख होत नाहीं, त्याप्रमाणें ज्ञात्याला देहभोगाचें सुख-दुःख नसतें. ४९ त्याविषयीं एक दृष्टान्त सांगतों, तो ऐका. ६५० जो मोलानें मद्य विकत घेऊन पितो व त्या धुंदींत गातो व नाचतो, देहवान् असूनहि देहमान विसरतो. फार काय पण अंगावरील वस्त्राचीहि त्याला शुद्धि नसते. ५१ मग हा ज्ञानी तर ब्रह्मरस पिऊन परमानंदानें तृप्त झालेला असतो व मदानें देह आहे कीं मेला याची त्याला

आठवू ठेला तेणें मदें ॥ ५२ ॥ एवं देहाचें भरण पोषण । जन्म अथवा मरण । तें दैवयोगें जाण । तेंचि निरूपण हंस बोले ॥ ५३ ॥

देहोऽपि दैववशगः खलु कर्म यावत्स्वारम्भकं प्रतिसमीक्षत एव सासुः ।
तं सप्रपंचमधिरूढसमाधियोगः स्वाप्नं पुनर्न भजते प्रतिबुद्धवस्तुः ॥ ३७ ॥

जितुकें देहाचें वर्तन । तितुकें अदृष्टास्तव जाण । अज्ञानासी देहाभिमान । त्यातें सज्ञान न धरिती ॥ ५४ ॥ जैसें अदृष्ट पूर्वस्थित । तैसा देह उपजे येथ । सावेव प्राणेंसहित । ऐसें वर्तत जंव दैवें ॥ ५५ ॥ म्हणाल दैवयोगें देहीं असतां । अवश्य वाढेल देहअहंता । जेवीं एकत्र गमनें मार्गस्थां । येरयेरांच्या व्यथा भोगिती ॥ ५६ ॥ लवणाच्या मिळणीं पाणी । होऊनि ठाके खारवणी । तेवीं ज्ञाताही देहाचे मिळणीं । देहाभिमानी होईल ॥ ५७ ॥ जेवीं लोहसंगाचिये प्राप्ती । दुर्धर अग्नि घण वरी घेती । तेवीं देहाचिया संगतीं । ज्ञाते भोगिती सुखदुःखें ॥ ५८ ॥ ऐसा कल्पाल अभिप्रावो । तो सज्ञानासी न घडे भावो । तिंहीं निवटूनियां अहंभावो । चिदानंदें पहा वो समाधिस्थ ॥ ५९ ॥ ' अधिरूढसमाधियोग ' । हें मूळींचें पद अभंग । येणें समाधि अतिनिर्व्यंग । साधिली चांग निजबोधें ॥ ६६० ॥ तरी समाधी ते कैशी असे । तटस्थ काष्ठाचेपरी दिसे । कां समाधिस्थ केवळ पिसें । अथवा असे सज्ञान ॥ ६१ ॥ ते समाधीचीं लक्षणें । ऐक सांगेन संपूर्णें । देहीं असोनि देहबंधनें । नाहीं अडकणें

दादहि नसते. ५२ याप्रमाणें देहाचें भरण, पोषण, जन्म किंवा मरण दैवयोगानें होत असतें. आतां हंस त्याचेंच निरूपण करीत आहे. ६५३.

—' अहोपण, जो देह परिपालन केला जात असूनहि मरावयास टेंकतो, त्याला जर तो न पाहील तर तो निश्चयानें मरेलच. ' उत्तर —

दैववशगः देहः अपि खलु–दैवाधीन असलेला देहहि व्यवहार करीत असतांना, स्वारंभकं कर्म यावत् अस्ति तावत् सासुः प्रतिसमीक्षते एव–आपला आरंभ करणारे प्रारब्धकर्म जोंवर असतें, तोंवर प्राण व इंद्रियें यांसह तो जिवंत रहातो. [तर मग तो एखादेवेळीं त्यांत आसक्तहि होईल. उत्तर–] अधिरूढसमाधियोगः प्रतिबुद्धवस्तुः पुनः स्वाप्नं सप्रपंचं तं न भजते–ज्यानें समाधीपर्यंत योग संपादन केला आहे, त्यामुळेंच ज्यानें परमार्थवस्तु साक्षात् जाणिली आहे, असा तो ज्ञानी स्वप्नाप्रमाणें असलेल्या प्रपंचासह आपल्या देहावर आसक्त होत नाहीं. [याविषयीं ' आत्मज्ञानी पुरुषाच्या ब्रह्मप्राप्तीला त्याचें शरीर पडेपर्यंतच काय तो अवकाश असतो. शरीरपात होतांच तो ब्रह्मसंपन्न होतो. ' अशा अर्थाची छान्दोग्य श्रुति प्रमाण आहे. (छां. भा. अ. ६. १४. २. पृ. ४९२)] ३७.

देह सर्वथा प्रारब्धानुसार वागत असतो. पण अज्ञ लोकांना देहाभिमान असतो. सज्ञान तो धरीत नाहींत. ५४ पूर्वजन्मींच्या कर्मानुसार देह जन्म घेतो व इंद्रियांसह आपल्या प्रारब्धाप्रमाणें वागत असतो. ५५ तुम्ही यावर असें म्हणाल कीं, प्रारब्धयोगानें जरी देहांत राहिलें तरी त्या देहावरील अभिमान अवश्य वाढणारच. एकमेकांच्या सोबतीनें जाणाऱ्या प्रवाश्यांना जसें परस्परांवर आलेलें संकट भोगावें लागतें, ५६ किंवा मिठांत मिसळलेलें पाणी जसें खारट होऊन रहातें, त्याप्रमाणें ज्ञानी जीवहि देहाच्या संगतीनें देहाभिमानी होईलच. ५७ किंवा लोखंडाच्या संगतीमुळें अग्नीला जसे घणाचे दुःसह घाव सोसावे लागतात, त्याप्रमाणें देहाच्या संगतीमुळें ज्ञानी सुख-दुःख भोगितात, ५८ असा जर विचार तुमच्या मनांत येईल, तर हा नियम ज्ञानी भक्तांना लागू नाहीं. कारण त्यांनीं अहंकाराचें निर्मूलन करून ते चिदानंदांत समाधिस्थ होऊन रहातात. ५९ श्लोकांत ' अधिरूढसमाधियोगः ' असें सामासिक पद आहे. त्यावरून त्यानें आत्मज्ञानानें निर्दोष समाधि साधलेली असते, हें सिद्ध होतें. ६६० आतां ती समाधि कशी असते, समाधिस्थ मनुष्य काष्ठासारखा तटस्थ बसलेला असतो कीं, तो वेड्यासारखा दिसतो किंवा ज्ञानी असतो ! ६१ त्या समाधीचें सविस्तर लक्षण सांगतों, तें ऐका. ज्ञानी मनुष्य देहांत असून देहबंधांत अडकून पडत नाहीं. ६२ केवळ ताठरलेल्या तटस्थ वृत्तीला जर कोणी ' समाधि '

सज्ञाना ॥ ६२ ॥ केवळ ताटस्थ्या नांव समाधी । ह्मणतां ज्ञात्याची ठकली बुद्धी । ते समाधि नव्हे त्रिशुद्धी । मूर्च्छित ते संधी असे वृत्ती ॥ ६३ ॥ निरभिमान निरवधी । त्या नांव अखंड-समाधी । परी काष्ठातें त्रिशुद्धी । नव्हे समाधी सर्वथा ॥ ६४ ॥ ताटस्थ्यचि समाधि साचें । जे मानिती त्यांसी स्वरूपाचें । ज्ञान नाहीं निश्चयाचें । अनुमानाचें बोलणें ॥ ६५ ॥ प्रचंड अघाताच्या भुलीं । तत्काळ तटस्थता बाणली । तरी काय तेणें झाली । सत्यचि भली समाधि त्यासी ॥ ६६ ॥ ओंवाळणीचिया आस्था । बहुरूपी सोंग संपादितां । वायु स्तंभविला अवचितां । तेणें तटस्थता बहुकाळ ॥ ६७ ॥ परी वासना जंव उरली आहे । तंव समाधि कैसेनि हों लाहे । सावध होतांचि ह्मणे काये । ये दात्याचे रायें उचित द्यावें ॥ ६८ ॥ सर्व संकल्पांची अवधी । त्या नांव निर्विकल्प समाधी । सकळ शास्त्र हेंचि प्रतिपादी । समाधि त्रिशुद्धी त्या नांव ॥ ६९ ॥ सापु आल्या शेळीप्रती । तटस्थ होय सकळ वृत्ती । तैशी झालिया ताटस्थ्यस्थिती । नव्हे निश्चितीं ते समाधी ॥ ६७० ॥ अकस्मात् अवचितां । दिव्य स्वरूप देखतां । आश्चर्यें झाली तटस्थता । तेथ जाणावी तत्त्वतां वृत्ति आहे ॥ ७१ ॥ स्वस्वरूप देखतां प्रथमदृष्टीं । न संवरतु विस्मयो उठी । तोही जिरवूनियां पोटीं । दशा जे उठी ते समाधी ॥ ७२ ॥ निःशेष कल्पना जेथ विरे । तेथ विस्मयो कोठें स्फुरे । सूक्ष्म कल्पना थावरे । तेणें वोसरे विस्मयो ॥ ७३ ॥ जेथ साचार ब्रह्मप्राप्ती होये । तथें देहचि स्फुरों न लाहे । तेव्हां तटस्थ कीं चालताहे । हें देखणें होये पुढिलांचें ॥ ७४ ॥ एवं देहचि जेथ मिथ्यापणें । त्यासी कवण लक्षी लक्षणें । हो कां मृगजळींचेनि नाहाणें । जेवीं का निवणें सज्ञानीं ॥ ७५ ॥ मिथ्या देहासी तटस्थता । झाल्या मानावी समाध्यवस्था । ऐशीं लक्षणें सत्य

समजत असतील तर त्या ज्ञात्यांच्या बुद्धीला भ्रम झाला आहे, असें म्हणावें लागेल. कारण ती खरोखर समाधि नसून त्या स्थितींत वृत्ति मूर्च्छित असते. ६३ निरंतर निरभिमानालाच अखंड समाधि म्हणतात. पण काष्ठा-सारखें होऊन रहाणें ही खरी समाधि नव्हे. ६४ जे अशा काष्ठासारख्या तटस्थपणाला समाधि मानितात, त्यांना खऱ्या स्वरूपाचें निश्चित ज्ञान नसतें. त्यांचें तें केवळ अनुमानाचें बोलणें असतें. ६५ एखादा भयंकर आघात झाला तर मनुष्य मूर्च्छित होऊन काष्ठवत् निश्चेष्ट होऊन पडतो. पण त्या स्थितींत त्याला काय खरोखर समाधि लागलेली असते ! ६६ बक्षिसाच्या लालसेनें बहुरूपीहि सोंगाची बनावणी करून पुष्कळ वेळ वायु-निरोध करून तटस्थ होतो, म्हणून ती कांहीं त्याची समाधि नव्हे. ६७ जोंपर्यंत मनांत वासना शिल्लक आहे, तोंपर्यंत समाधि कशी प्राप्त होणार ! बहुरूपी सोंग टाकून सावध झाला म्हणजे लगेच मालकाला म्हणतो कीं, आपण केवळ कर्णाचें अवतार आहांत, आपल्या औदार्याला शोभण्यासारखें बक्षीस मला द्या. ६८ सगळ्या संकल्पाची जी परमावधि तिलाच निर्विकल्प समाधि म्हणतात. सर्व शास्त्रांनीं हेंच प्रतिपादन केलें आहे. हीच खरी समाधि होय. ६९ शेळीजवळ साप आला कीं, भीतीनें तिच्याहि वृत्ति जागच्याजागीं थिजून तटस्थ होतात. पण तशी निश्चेष्ट स्थिति म्हणजे समाधि नव्हे. ६७० अकस्मात् व अनपेक्षित एखादें दिव्य स्वरूप दृष्टीस पडतांच वृत्ति आश्चर्यानें थक्क होते व भान हरपून शरीर तटस्थ होतें. पण ती एक वृत्ति आहे, समाधि नव्हे. ७१ प्रथमच आत्मस्वरूप दृष्टीस पडतांच अनावर झालेला विस्मय दाबून टाकून निश्चल स्थित होणें हीच खरी समाधि जाणावी. ७२ जेथें कल्पना पूर्णपणें विरून जाते, तेथें विस्मय कोठून स्फुरणार ! सूक्ष्म वासना स्थिर झाल्या कीं, विस्मय आपणच नाहींसा होतो. ७३ जेव्हां खरोखर ब्रह्मप्राप्ति होते, तेव्हां देहाचेंहि भान रहात नाहीं. त्यावेळीं तो चालत आहे कीं उभा आहे, हें दुसरें लोक पहातात. ७४ याप्रमाणें जेथें देहच मिथ्या वाटतो तेथें त्याचीं लक्षणें कोण पहाणार ! ज्ञान्यानें मृगजळांत स्नान करून शांत होण्यासारखेंच हें आहे. ७५ मिथ्या देहाला काष्ठासारखें तटस्थपण आलें असतां तीच समाधि आहे, अशाप्रकारचीं समाधीचीं लक्षणें

मानितां । ठकले तत्त्वतां परीक्षक ।। ७६ ।। हो कां स्वप्नींचे सज्ञानासी । ताटस्थ्यमुद्रा लागल्या त्यासी। जरी मान्य झाल्या स्वप्नींच्यासी । तरी जागृतीसी नाहीं आला ।। ७७ ।। हो कां स्वप्नींचिया लोकांप्रती । थोर झाली समाधीची ख्याती । तरी नाहीं आला तो जागृती । जाणावा निश्चितीं निद्रितू ।।७८।। तेवीं ताटस्थ्या नांव समाधी । ते अविद्या स्वप्नमूर्च्छासिद्धी । परी स्वस्वरूपप्रबोधीं । जागा त्रिशुद्धी नाहीं झाला ।। ७९ ।। तो जागा होऊनि स्वप्न पाहे । तें मिथ्यात्वें देखताहे । त्यांतु आपुला देहो सत्य काये। मा ताटस्थ्य राहे ते ठायीं ।। ९८० ।। जो जागा होऊनि तत्त्वतां । स्वप्नदेहासी तटस्थता । साक्षेपपूर्वक लावूं जातां । लाजे परी अधिकता दशा न मनीं ।। ८१ ।। जो जागा होऊनि स्वप्न सांगे । तें मिथ्यापणेंचि अवघें । परी सत्यत्वाचेनि पांगें । कदा निजांगें नातळे ।। ८२ ।। तैशी साचार वस्तुप्राप्ती । तो नातळे देहस्थितीं । तरी देह वर्ते कोणे रीतीं । तो प्रारब्धगतीचेनि शेषें ।। ८३ ।। स्थंडिलीं अग्नि विझोनि जाये । तरी भूमिये उष्णता राहे । कर्पूर सरल्याही पाहें । सुवासु आहे ते देशीं ।। ८४ ।। पाळणा हालवितां वोसरे । तरी तो हाले पूर्वसंस्कारें । तेवीं अविद्यानाशें प्रारब्ध उरे । तेणें देहो वावरे मुक्तांचा ।। ८५ ।। लक्ष भेदोनियां तीरें । बळें चालिजे पुढारें । तेवीं अविद्यानाशें प्रारब्ध उरे । तेणें देहो वावरे मुक्तांचा ।। ८६ ।। शरीराचेनि छाया चळे । परी शरीर छायेवेगळें । तेवीं देह मिथ्या मुक्ताजवळें । चळे वळे प्रारब्धें ।। ८७ ।। हेतुवीण अनायासें । पुरुषासवें छाया असे । तेवीं सज्ञानासरिसें । देह दिसे मिथ्यात्वें ।। ८८ ।। जैसें गलित पत्र वारेनि चळे । तैसें देह वर्ते प्राचीन मेळें । परी देहकर्माचेनि विटाळें । ज्ञाता

खरीं मानून मोठे विद्वान्‌हि फसले आहेत. ७६ किंवा ज्ञान्याला स्वप्नांत सर्व व्यवहार सोडून निश्चल राहिल्याचा भास झाला व तो त्यानें स्वप्नांत खरा मानिला, तरी जागें झाल्यावर त्याला कांहीं त्या स्थितीचा अनुभव येत नाहीं. ७७ किंवा स्वप्नांतील लोकांना समाधीचा मोठा अनुभव आला, तरी जगृतींत त्याचा एक अंशहि अनुभवास येत नाहीं, तर तो स्वप्नांतील समाधीचा अनुभव म्हणजे निद्राच आहे व तो मनुष्यहि निद्रितच आहे, असें निःसंशय जाणावें. ७८ त्याच न्यायानें तटस्थपणाला समाधि म्हणणें ही अविद्या आहे. तिच्या योगानें स्वप्न व मूर्च्छा यांची सिद्धि होते. पण तिच्या योगानें स्वस्वरूपबोधांत तो केव्हांहि जागा होत नाहीं. ७९ जो जागा होऊन स्वप्न पहातो, त्याला तें सर्व मिथ्यात्वानेंच भासतें. मग त्यांत त्याला आपला देह सत्य आहे असें वाटेल तरी कसें ! तो स्वप्नदेहाविषयीं तटस्थच राहील. ९८० जो खरोखर जागा होऊन स्वप्नदेहांतील तटस्थता मोठ्या आग्रहानें स्वतःची मानूं लागतो त्याची त्यालाच मनांत लाज वाटते व त्या अवस्थेमध्यें कांहीं अधिकता आहे, असें त्याचें त्यालाच वाटत नाहीं. ८१ जो जागा होऊन स्वप्न सांगूं लागतो त्याला तें सर्व मिथ्यात्वानेंच प्रतीत होत असतें. त्यामुळें तें खरेंच आहे असें समजून तो केव्हांहि स्वतः लिप्त होत नाहीं. ८२ वस्तुतः आत्मप्राप्ति झाल्यावर तो देहस्थितीला स्पर्शहि करीत नाहीं. तर मग त्याचा देह कसा वागत असतो, असें जर म्हणाल तर तो प्रारब्धगतीच्या अवशेषामुळें चालत असतो. ८३ स्थंडिलांतील अग्नि विझला, तरी त्या भूमीवर उष्णता रहातेच; कापूर जरी जळून गेला तरी तेथें त्याचा सुवास असतोच. ८४ पाळण्याला झोंके देण्याचें थांबविलें तरी त्याची गति संपेपर्यंत तो स्वतःच हेलकावे खात रहातो; त्याप्रमाणें अविद्येचा नाश झाल्यावरहि जो प्रारब्धाचा अंश उरतो, त्यायोगें मुक्तांचा देह वागत असतो. ८५ बाण सोडल्यावर तो आपल्या लक्ष्याचा वेध करून पुढें जसा निघून जातो, त्याप्रमाणें अविद्येचा नाश होऊन उरलेल्या प्रारब्धानुसार मुक्तांचा देह वागत असतो. ८६ शरीर हालतांच त्याची छाया हालते, पण शरीर छायेहून भिन्न असते, त्याप्रमाणें मुक्तांचा देह त्यांच्याजवळ जरी असला तरी तो मिथ्याच असतो. त्याचें चलन-वलन प्रारब्धाप्रमाणें घडत असतें. ८७ पुरुषाबरोबर त्याची छाया कांहीं हेतूवांचूनच स्वभावतःच असते. त्याप्रमाणें ज्ञान्याबरोबर दिसणारा देह वास्तविक मिथ्याच होय. ८८ ज्याप्रमाणें गळून पडलेलें पान वाऱ्यानें हालत असतें, तसा देह पूर्वकर्मानुसार वागत असतो;

न मैळे निजबोधें ॥ ८९ ॥ त्या प्रारब्धाच्या पोटीं । सागों सकळ जगेंसी गोठी । कां धरोनि मौनाची मिठी । गिरिकपाटीं पडो सुखें ॥ ६९० ॥ तो आचरों सकळ कर्में । अथवा पिसा हो कां निभ्रमें । तेणें तेणें अनुक्रमें । जाण परिणामें प्रारब्धें ॥ ९१ ॥ तो चढो पालखीं गजस्कंधीं । कां पडो विष्ठामूत्रसंधीं । ते ते प्रारब्धाची सिद्धी । जाण त्रिशुद्धी ज्ञात्यासी ॥ ९२ ॥ जेथ बाध्यबाधकता फिटली । सकळ अहं अविद्या तुटली । सहज समाधी त्या नांव झाली । हे संख्या केली सिद्धांतीं ॥९३ ॥ ऐशी जे सैर समाधिअवस्था । तोचि भोग भोगोनि अभोक्ता । कर्में करोनि अकर्ता । जाण तत्त्वतां तो एक ॥ ९४ ॥ तो क्रियाकारणसंयोगें । डुलत देखिजे विषयभोगें । परी समाधिमुद्रा न भंगे । भोगसंगें अलिप्त ॥ ९५ ॥ त्यासी स्त्री म्हणे माझा भर्ता । पुत्र म्हणे माझा पिता । शिष्य म्हणे स्वामी तत्त्वतां । त्यांहूनि परता त्यांमाजीं वर्ते ॥ ९६ ॥ हो कां काष्ठास्तव उत्पत्ती । काष्ठावरी ज्याची स्थिती । तो आकळितां काष्ठीं बहुतीं । नावरे निश्चितीं अग्नि जैसा ॥ ९७ ॥ फुंकितां लखलखिला । जों फुंकास्तव प्रकटला । तो फुंक न साहतां ठेला । निर्वातींचा संचला दीप जैसा ॥ ९८ ॥ तेवीं कर्मास्तव उत्पत्ती । कर्मेंचि झाली परब्रह्मप्राप्ती । त्या कर्मामाजीं वर्तती । निष्कर्मस्थिती महायोगी ॥ ९९ ॥ तो व्यवहारीं दिसो जनीं । कीं पिसेपणीं नाचो वनीं । अथवा तटस्थ राहो विजनीं । दशा अधिकउणी बोलूं नये ॥ ७०० ॥ जें सिंहासनीं राजत्व जोडे । तें वनांत खेळतां न मोडे । कीं धांवतां व्याहाळीपुढें । राजपद चोखडें ढळूं नेणें ॥ १ ॥ रावो रानीं वशिन्नला । त्या रानासी राजभोग आला । रानीं रावो राजत्वा मुकला । मूर्खही या बोला न बोलती ॥ २ ॥ तेवीं पावोनि स्वरूपप्राप्ती । योगी प्रारब्धाच्या स्थितीं । नाना कर्में करितां दिसती । परी निजात्मस्थिती भंगेना ॥ ३ ॥ यालागीं समाधि आणि व्युत्थान । या दोहीं

परंतु ज्ञानी आत्मज्ञानामुळें त्या देहकर्मांच्या दोषाला स्पर्श करीत नाहीं. (म्ह० तो आत्मस्वरूपापासून च्युत होत नाहीं.) ८९ तो त्या प्रारब्धाच्या ओघांत सगळ्या जगाला गोष्टी सांगत बसो किंवा पर्वताच्या गुहेंत सुखानें मौन धरून बसो; ६९० तो सगळें कर्माचरण करीत असो कीं, भ्रमानें वेडा होऊन राहो; ते ते सर्व प्रारब्धाचेच परिणाम समजावे. ९१ तो पालखींत बसो किंवा हत्तीच्या अंबारींत चढो, किंवा घाणींत लोळत पडो, तो केवळ प्रारब्धयोग होय, असें ज्ञानी समजत असतो. ९२ तेथें बाध्यबाधकता संपते व 'अहं' ही सर्व अविद्या सुटते, त्याला सहजसमाधि म्हणावें, असो; शेवटीं असा सिद्धांत ठरतो. ९३ अशी जी सहजसमाधि अवस्था, तिला जो प्राप्त होतो तोच एक भोग भोगून अभोक्ता, कर्में करून अकर्ता आहे, असें समजावें. ९४ तो क्रिया कारण यांच्या संगानें होणारे विषयभोग पाहून डुलत असतो; परंतु त्याचा समाधिभंग होत नाहीं, तो भोगापासून अलिप्तच असतो. ९५ त्याला त्याची स्त्री आपला पति म्हणते; पुत्र पिता म्हणतो; शिष्य स्वामी म्हणतो; परंतु तो त्यांच्यावर आसक्त न होतां त्यांच्यामध्यें रहातो. ९६ ज्याप्रमाणें अग्नीची उत्पत्ति काष्ठापासूनच होते, काष्ठामुळेंच त्याची स्थिति होते, परंतु त्या पुष्कळ काष्ठांनीं जरी त्याला बांधून ठेवूं म्हटलें तर मात्र तो आंवरत नाहीं. ९७ अग्नीवर फुंकर घातला म्हणजे तो पेटतो. तो वायूच्या साह्यानेंच प्रकट होतो, पण निर्वात प्रदेशीं ठेवलेल्या दीपाला फुंकरहि जसा सहन होत नाहीं, ९८ त्याचप्रमाणें कर्मासाठीं ज्यांची उत्पत्ति झालेली असते व त्या कर्मांनींच ज्याला ब्रह्मप्राप्ति होते, त्याच कर्मामध्यें महायोगी निष्कर्म स्थितीनें वागत असतात. ९९ तो ज्ञानी लोकांत व्यवहार करीत असलेला दिसो; कीं वनांत जाऊन वेड्यासारखा नाचत असो; किंवा एकान्त प्रदेशांत जाऊन स्वस्थ बसलेला असो; त्याच्या वृत्तींत कांहीं अधिक उणा फरक झाला आहे, असें मुळींच समजूं नये. ७०० सिंहासनावर बसून जें राज्यपद मिळालेलें असतें, तें वनांत जाऊन खेळण्यानें किंवा शिकार करीत फिरल्यानें नाहींसें होत नाहीं. १ राजा अरण्यांत जाऊन राहिला, तर त्या वनालाच राजभोग प्राप्त होतात. राजा वनांत गेला म्हणून आपल्या राज्यपदाला मुकला असें मूर्खहि कधीं बोलत नाहींत. २ त्याप्रमाणें योगी आत्मस्वरूपाला प्राप्त झाल्यावर प्रारब्धानुसार नानाप्रकारचीं कर्में करीत असलेले जरी दिसले, तरी ते आपल्या स्वरूपावस्थेपासून ढळत नाहींत. ३ यास्तव समाधि व व्युत्थान

अवस्थांचें लक्षण । अपक्कासीचि घडे जाण । परिपूर्णासी लक्षण तें कैंचें ॥ ४ ॥ स्वरूपावेगळें कांहीं एक । पूर्णासी उरलें नाहीं देख । समाधिव्युत्थानाचें मुख । त्यासंमुख येवों लाजे ॥ ५ ॥ अर्जुना देवोनि समाधी । सवेंचि घातला महायुद्धीं । परी कृष्णकृपानिधी । तटस्थ त्रिशुद्धी न करीच ॥६॥ यालागीं समाधिव्युत्थानविधी । ताटस्थ्येंसहित निरवधी । गिळूनि झाली सैर समाधी । पूर्ण निजपदीं विलसतां ॥ ७ ॥ एवं प्रारब्ध जंव असे । तंव मुक्ताचे देह वर्ते ऐसें । परी अहंममतेचें पिसें । पूर्विल्या ऐसें बाधीना ॥ ८ ॥ जेवीं स्वप्नदेहाच्या नाना अवस्था । जागृतीं आलिया तत्त्वतां । पुरुष नेघे आपुले माथा । तेवीं समाधिस्था देहकर्में ॥ ९ ॥ हेचि परमार्थता ब्रह्मस्थिती । नाना परींच्या उपपत्ती । म्यां सांगीतल्या तुम्हांप्रती । ज्ञानसंपत्ती निजगुह्य ॥ ७१० ॥ तूं कोण हें पुसिलें होतें । सांगावया तें सनकादिकांतें । सांगतसें निजरूपातें । विश्वास त्यातें दृढ व्हावया ॥ ११ ॥

मयैतदुक्तं वो विप्रा गुह्यं यत्सांख्ययोगयोः । जानीतमागतं यज्ञं युष्मद्धर्मविवक्षया ॥ ३८ ॥

अतिगुह्य ज्ञान परात्पर । जें उपनिषदांचें भांडार । म्यां सांगीतलें साचार । योगसार योग्यांचें ॥ १२ ॥ ज्या ज्ञानालागीं साधनकोटी । मुमुक्षु करिती हटतटीं । योगी रिघोनि गिरिकपाटीं । महामुद्रा नेहटीं साधिती ॥ १३ ॥ वेदशास्त्रांचिया युक्ती । थोंटावल्या जिये अर्थी । तें निजज्ञान म्यां तुम्हांप्रती । यथा निगुतीं सांगीतलें ॥ १४ ॥ एवढिया ज्ञानाचा ज्ञानवक्ता । मी कोण हें न कळेल सर्वथा । तरी यज्ञाचा यज्ञभोक्ता । जाणा तत्त्वतां मी विष्णू ॥ १५ ॥ मज यावया हेंचि कारण । तुम्हीं ब्रह्मयाप्रति केला प्रश्न । तें उपदेशावया ब्रह्मज्ञान । स्वयें आपण येथें आलों ॥ १६ ॥ ज्या उपदेशाच्या पोटीं ।

या दोन्ही अवस्थांचें लक्षण अर्धवट साधकाला असतें. पूर्णत्वाला पोंचलेल्यास लक्षण कशाचें ! ४ पूर्णत्वास गेलेले ज्ञानी एका आत्मस्वरूपाखेरीज दुसरें कांहींहि पहात नाहींत. समाधि व्युत्थान तर त्यांच्यापुढें येऊन तोंड दाखविण्यासहि लाजतें. ५ अर्जुनाला समाधि देऊन घोर युद्धांत प्रवृत्त केलें, पण दयाळु श्रीकृष्णानीं त्याला तटस्थ केलें नाहीं. ६ यास्तव पूर्णत्वानें आत्मस्वरूपांत निमग्न झाल्यावर समाधि-व्युत्थान विधीला तटस्थपणासह गिळून टाकून सहजसमाधि प्राप्त होते. ७ याप्रमाणें जोंवर प्रारब्ध असतें, तोंवर मुक्तांचा देह तदनुरूप वागत असतो. पण 'अहं-' ममतेचें वेड त्याला पहिल्यासारखें केव्हांहि बाधत नाहीं. ८ मनुष्य जागा झाल्यावर स्वप्नांतील देहाच्या अनेक अवस्था जशा आपल्या मस्तकावर लावून घेत नाहीं, त्याप्रमाणें समाधिस्थ ज्ञानी देहकर्में स्वतःवर घेत नाहीं. ९ ही श्रेष्ठ ब्रह्मस्वरूपास्थिति मीं तुम्हांला निरनिराळ्या प्रकारें सांगितली. हीच माझी गुप्तज्ञानसंपत्ति आहे. ७१० सनकादिकांनीं 'तूं कोण ?' असा प्रश्न केला होता. त्याचें त्यांना उत्तर देण्यासाठीं व त्यांचा विश्वास दृढ होण्यासाठीं भगवान् आतां आत्मस्वरूप सांगत आहे. ७११.

—या उक्त अर्थावर सनकादिकांचा विश्वास बसण्यासाठीं हंस आपलें स्वरूप सांगतो—

विप्राः–हे सनकादिकांनो ! यत् सांख्ययोगयोः गुह्यं तत् एतत् मया वः उक्तं–सांख्य म्ह० आत्मानात्मविवेक व अष्टांग योग यांचें जें गूढ रहस्य तें मीं तुम्हांला सांगितलें, युष्मद्धर्मविवक्षया आगतं मा यज्ञं जानीत–तुम्हांला धर्माचा उपदेश करण्यासाठीं आलेल्या मला तुम्ही विष्णु जाणा. ३८.

जें उपनिषदांचें भांडार. योग्यांच्या योगमार्गाचें रहस्य, परात्पर, अति गुह्यज्ञान, तें मीं तुम्हांला यथार्थ सांगितलें. १२ ज्या ज्ञानासाठीं मुमुक्षु खडतर तपश्चर्येनें, हठयोगानें कोट्यवधि उपाय करितात, योगी पर्वतांच्या गुहेंत बसून नित्य अभ्यासानें खेचरी इत्यादि चार मुद्रा साधितात; १३ ज्या ज्ञानापुढें वेदशास्त्रांच्या युक्तींनीं हात टेकिले तें आत्मज्ञान मीं तुम्हांला योग्यप्रकारें सांगितलें. १४ एवढें ज्ञान सांगणारा ज्ञानवक्ता मी कोण आहें हें जर तुम्हांला अद्यापि कळलें नसेल, तर यज्ञांचा यज्ञभोक्ता विष्णु मी आहें, असें तुम्ही तत्त्वतः समजा. १५ तुम्ही ब्रह्मदेवाला ज्याविषयीं प्रश्न केलांत, त्या ब्रह्मज्ञानाचा उपदेश करण्यासाठीं मी स्वतः येथें प्रकट झालों. माझें येथें येण्याचें कारण हेंच आहे. १६ या उपदेशांत वर्णाश्रम धर्म न सोडितां माझी भेट होते, ही

वर्णाश्रमपरिपाटी । न सांडितां होय माझी भेटी । तेही गोष्टी ध्वनिलीसे ॥ १७ ॥ सांडावें ब्राह्मणपण । मग मांडावें संन्यासग्रहण । हे दोनी धर्म देहींचे जाण । उपदेशीं देहपण मुख्यत्वें मिथ्या ॥ १८ ॥ उपदेशू करूनि प्रमाण । सनकादिकीं ब्राह्मणपण । अद्यापि सांडिलें नाहीं जाण । माझें गुह्य ज्ञान पावले ॥ १९ ॥ तेणेंचि उपदेशें निश्चित । नारद ब्राह्मणपणें वर्तत । ब्रह्मानंदें डुल्लत । गात नाचत निजबोधें ॥ ७२० ॥ ऐसें जें चैतन्यघन । आपुलें स्वरूप आपण । स्वयें करिताहे स्तवन । निजमहिमान द्योतावया ॥ २१ ॥

अहं योगस्य सांख्यस्य सत्यस्यर्तस्य तेजसः । परायणं द्विजश्रेष्ठाः श्रियः कीर्तेर्दमस्य च ॥ ३९ ॥

सांख्य जें परम ज्ञान । योग अष्टांगादिसाधन । सत्याचें सत्यपण । सत्यस्वरूप जाण मी एक ॥ २२ ॥ पहा पां ज्या सत्याच्या ठायीं । संत सद्धर्में राहिले पाहीं । सूनृत जे वाचा तेही । मजवेगळी कांहीं हों नेणे ॥ २३ ॥ तेजाची जे प्रगल्भता । ते माझेनि तेजें सतेजता । श्रियेची जे ऐश्वर्यता । जाण तत्त्वतां माझेनी ॥ २४ ॥ कीर्ति माझेनि कीर्तनें । सदा वंदिजे साधुजनें । मजवेगळें कीर्तीचें जिणें । कोणी पोसणें न घेती ॥ २५ ॥ माझेनि तेजें निग्रहता । निग्रहो करी समस्तां । अदम्या दमू दमिता । जाण तत्त्वतां माझेनि ॥ २६ ॥ येथ ध्येय आणि ध्यान । कां साध्य आणि साधन । या अवघिया मी अधिष्ठान । मजवेगळें भान यां कैंचें ॥ २७ ॥ तुम्ही ब्राह्मण अतिश्रेष्ठ । मजही पूज्यपणें वरिष्ठ । यालागीं निजज्ञान चोखट । तुम्हांसी म्यां प्रकट सांगीतलें ॥ २८ ॥

मां भजन्ति गुणाः सर्वे निर्गुणं निरपेक्षकम् । सुहृदं प्रियमात्मानं साम्यासङ्गादयो गुणाः ॥ ४० ॥

गोष्टहि ध्वनित केली आहे. १७ ब्राह्मणपण सोडावें व संन्यासग्रहण करावें, हे दोन्ही देहाचेच धर्म आहेत, पण माझ्या उपदेशांत तर देहच मुख्य मिथ्या सांगितला आहे. १८ तेव्हां उपदेश प्रमाण मानून सनकादिकांनीं अद्यापि आपलें ब्राह्मणत्व टाकिलें नाहीं. यावरूनच ते माझ्या गुह्यज्ञानाला प्राप्त झाले. १९ त्याच उपदेशानें नारदहि आपलें ब्राह्मणत्व राखून आत्मज्ञानानें ब्रह्मानंदांत गात, नाचत, डुलत असतो. ७२० असें जें चैतन्यघन आपलें स्वरूप त्याचा महिमा प्रकाशित करण्यासाठीं भगवान् स्वतः त्याचें स्तवन करीत आहे. ७२१.

द्विजश्रेष्ठाः– हे श्रेष्ठ ब्राह्मणहो ! अहं योगस्य सांख्यस्य सत्यस्य ऋतस्य तेजसः श्रियः कीर्तेः दमस्य च परायणं [अस्मि]–मी अष्टांगयोग, आत्मानात्मकविवेक, अनुष्ठान केला जाणारा धर्म, ज्ञान देणारा धर्म, प्रभाव, श्री, कीर्ति व दम यांचें परम अयन आहें. ३९.

सांख्य म्ह० आत्मनात्मविवेक या नांवाचें श्रेष्ठ ज्ञान; अष्टांगादि साधनांनीं साध्य होणारा योग; व सत्याचेंहि सत्य असें जें सत्यस्वरूप, तें सर्व मीच एक आहें, असें समजावें. २२ ज्या सत्याचा आश्रय करून संत सद्धर्मानें राहिले आहेत, ती मधुर वाणीहि माझ्याहून वेगळी नाहीं. २३ तेजाचा जो प्रभाव त्याला माझ्यामुळेंच सतेजता प्राप्त झाली आहे. श्रीमंतीचें जें ऐश्वर्य तेंहि माझ्यामुळेंच प्राप्त होतें. २४ साधु नेहमीं माझ्या कीर्तनामुळेंच कीर्तीला मान देतात. माझ्यावांचून कीर्तीचें जिणें कसलें ! तिला कोणी थाराहि देणार नाहीं. २५ माझ्या तेजानेंच निग्रहत्व सर्वांचा निग्रह करितें. ताब्यांत रहाण्यास अशक्य असलेल्यांचेंहि दमन माझ्याचमुळें होऊं शकतें. २६ येथें ध्येय आणि ध्यान; किंवा साध्य आणि साधन या सर्वांचा मीच आश्रय आहें; माझ्यावांचून त्यांचें भान कोठून होणार ! २७ तुम्ही अतिश्रेष्ठ ब्राह्मण, मलाहि पूज्यत्वानें वरिष्ठ आहांत, म्हणून मीं हें सोज्ज्वल आत्मज्ञान तुम्हांला उघड करून सांगितलें. ७२८.

साम्यासङ्गादयः गुणाः सर्वे च गुणाः निर्गुणं निरपेक्षकं सुहृदं प्रियं आत्मानं मां भजन्ति–साम्य, असंग इत्यादि नित्य गुण व इतर सामान्य गुण निर्गुण, निरपेक्ष, सुहृद् व प्रिय आत्मा अशा मला भजतात. ४०.

मी वस्तुतां निरपेक्ष निर्गुण । त्या माझ्या ठायीं भजोनि गुण । सुहृद आत्मा प्रिय जाण । ऐसें लक्षण मज करिती ॥ २९ ॥ समता आणि असंगता । याही गुणांच्या अवस्था । आणूनि ठेविती माझ्या माथां । गुणस्वभावतां लक्षणें ॥ ७३० ॥ हो कां सबळ बळें अंधकार । कैं युद्धा आला सूर्या-समोर । तरी तमारी हा बडिवार । सूर्या आंधार जेवीं देत ॥ ३१ ॥ कोणे धरोनियां आकाश । घटीं घातलें सावकाश । तरी घटयोगें घटाकाश । मिथ्या गगनास नांव आलें ॥ ३२ ॥ नाहीं घटासी आतळला । गगनींचा गगनींच संचला । तो घटे घटचंद्रमा केला । मूर्खासी मानला सत्यत्वें ॥ ३३ ॥ तेवीं मी केवळ निर्गुण । त्या माझ्या ठायीं भजोनि गुण । सुहृद आत्मा इत्यादि जाण । असंगादि लक्षण मज देती ॥ ३४ ॥ गुणासी मी नातळे जरी । तरी मज म्हणती लीलाधारी । एवं गुणचि गुणांमाझारीं । मिथ्या मजवरी आळ हा ॥ ३५ ॥ तेथ मी घेता ना देता । कर्ता ना करविता । हे माझी निजस्वभावता । येर ते अवस्था गुणांची ॥ ३६ ॥ एवं पूर्वापर अतिविचित्र । सांगोनि ज्ञान-विज्ञाननिर्धार । त्या इतिहासाचा उपसंहार । स्वयें सारंगधर करीतसे ॥ ३७ ॥

इति मे छिन्नसन्देहा मुनयः सनकादयः । सभाजयित्वा परया भक्त्यागृणत संस्तवैः ॥ ४१ ॥

आत्मज्ञानी परम दक्ष । मुमुक्षूंमाजी अतिनेटक । संदेहापन्न सनकादिक । म्यां यापरी देख निःसंदेह केले ॥ ३८ ॥ सदा सावधानें निर्मळ । माझ्या भजनीं अतिप्रेमळ । सदा मद्रूपें मननशीळ । अव्या-कुळ श्रवणार्थी ॥ ३९ ॥ उद्धवा तिंहीं ऐकतां माझी गोष्टी । माझ्या स्वरूपीं घातली मिठी । मद्रूप झाले उठाउठी । बाप जगजेठी ब्रह्मपुत्र ॥ ७४० ॥ तिंहीं दृश्य द्रष्टा दर्शन । त्रिपुटीचें केलें शून्य ।

वास्तविक मी निरिच्छ व निर्गुण आहें; पण गुण माझ्या भजनीं लागून मला सुहृद्, आत्मा, प्रिय अशा लक्षणांनीं युक्त करितात, २९ समता व असंगता याहि गुणांच्या अवस्था आहेत; पण त्याहि गुणांच्या स्वभावलक्षणांवरून माझ्याच माथीं आणून बसवितात. ७३० अंधकार आपलें सर्व सैन्य घेऊन मोठ्या सामर्थ्यानें सूर्याच्या समोर कधीं युद्धाला उभा राहिला आहे का ! तरी पण तो अंधार सूर्यालाच 'तमारी' म्ह० 'अंधारनाशक' असें मोठ्या मानाचें नांव देतो; ३१ किंवा कोणीं कधीं आकाशाला धरून घटांत कोंबलें आहे ! पण घटाच्यायोगानें आकाशाला 'घटाकाश' असें खोटेंच नांव प्राप्त झालें. ३२ चंद्र घटांत कधींहि अडकून पडलेला नाहीं, तो आकाशांतल्या आकाशांतच असतो; पण घटानें त्याचें प्रतिबिंब धारण करून त्याला 'घटचंद्रमा' नांव दिलें व मूर्खांनीं तें खरेंच मानिलें. ३३ त्याप्रमाणें मी केवळ निर्गुण असतां माझ्यावर गुण लुब्ध होतात व सुहृद्, आत्मा, असंग इत्यादि लक्षणें मला लावितात. ३४ मी गुणांना स्पर्शहि करीत नाहीं, तरी मला लीलाधारी म्हणतात. याप्रकारें गुणच गुणांत राहतात व मजवर मिथ्या आरोप मात्र करितात ३५ मी देणारा किंवा घेणारा नाहीं. कर्ता-करविता नाहीं. हाच माझा स्वभाव आहे. इतर सर्व गुणांच्या अवस्था आहेत. ३६ याप्रमाणें ज्ञानविज्ञानाचें पूर्वापर अतिशय विलक्षण स्वरूप सांगून आतां श्रीकृष्ण स्वतः या इति-हासाचा उपसंहार करीत आहे. ७३७.

इति मे छिन्नसन्देहाः सनकादयः मुनयः—याप्रमाणें मी ज्यांच्या संदेहाची निवृत्ति केली आहे, असें सनकादिक मुनि, सभाजयित्वा परया भक्त्या संस्तवैः अगृणत—परम भक्तीनें माझी पूजा करून श्रेष्ठ स्तोत्रांनीं माझी स्तुति करिते झाले. ४१.

आत्मज्ञानी, परमदक्ष, मुमुक्षूंमध्यें दृढनिश्चयी, पण संशयग्रस्त झालेल्या सनकादिकांस मीं अशाप्रकारें संशयरहित केलें. ३८ ते सर्वदा सावधान, पवित्र, माझ्या भजनांत अत्यंत प्रेमळ, निरंतर माझ्या स्वरूपाचें चिंतन करणारे व श्रवणासाठीं अत्यंत उत्सुक असे होते. ३९ हे उद्धवा ! त्यांनीं माझा उपदेश ऐकतांच तत्काळ माझ्या स्वरूपाला मिठी मारली व ते अति श्रेष्ठ ब्रह्मदेवाचे पुत्र जागच्याजागीं मद्रूप झाले. ७४० माझ्या उप-

परब्रह्मचि झाले पूर्ण । माझेनि जाण उपदेशें ॥ ४१ ॥ परम पावले समाधान । गद्यपद्यादि सुलक्षण । माझें करोनियां स्तवन । पूजाविधान मांडिलें ॥ ४२ ॥

तैरहं पूजितः सम्यक् संस्तुतः परमर्षिभिः । प्रत्येयाय स्वकं धाम पश्यतः परमेष्ठिनः ॥ ४२ ॥

जरी पूज्यपूज्यकता गेली । तरी तिंहीं गुरूची पूजा केली । सांडूनि द्वैताची भुली । पूजा मांडिली अतिप्रीतीं ॥ ४३ ॥ शिष्य झालियाही ब्रह्मसंपन्न । त्याहीवरी त्यासी गुरु पूज्य जाण । सद्गुरु तोचि ब्रह्म पूर्ण । हे पावली खूण सनकादिकां ॥ ४४ ॥ ज्याच्या बोलासरिसेंचि पाहें । अवघें ब्रह्मचि होऊनि ठाये । त्या सद्गुरूचे पूज्य पाये । सांगूं काये बोलवरी ॥ ४५ ॥ ज्यासी परब्रह्म आलें हाता । तोचि जाणे सद्गुरूची पूज्यता । इतरांसी हे न कळे कथा । अनुमानता बोलवरी ॥ ४६ ॥ ते सनकादिक समस्त । माझी पूजा करोनि यथोक्त । वारंवार स्तवन करित । चरणा लागत पुनःपुनः ॥ ४७ ॥ माझ्या भजनीं एकमुख । माझिया निजभावें अतिभाविक । मज अवाप्तकामासी सुख । त्यांचे पूजनीं देख उथळलें ॥ ४८ ॥ मग करूनि प्रदक्षिणा । ते लागले माझिया चरणा । परम सुख झालें ब्राह्मणां । वचनार्थें जाणा माझेनी ॥ ४९ ॥ पहात असतां प्रजापती । सनकादिक उभे असती । त्यांदेखतां निजधामाप्रती । शीघ्रगतीं मी आलों ॥ ७५० ॥ माझे शिष्य सनकादिक । उद्धवा या रीतीं झाले देख । तो इतिहास अलोलिक । तुज म्यां सम्यक सांगीतला ॥ ५१ ॥ ते योगियांमाजीं अतिउद्भट । भक्तांमाजीं अतिश्रेष्ठ । ज्ञानियांमाजीं अतिवरिष्ठ । शिष्य चोखट सनकादिक ॥ ५२ ॥ हंसगीत निरूपण । पुरातन जें ब्रह्मज्ञान । तें उद्धवासी श्रीकृष्ण । प्रसन्न होऊन दीधलें ॥ ५३ ॥ भागवतपंथें चालतां । हे पुरातन ब्रह्मकथा । एका एकादशू पाहतां । स्वभावें हातां पैं आली ॥ ५४ ॥ जीं

देशानें दृश्य, द्रष्टा व दर्शन ही त्रिपुटी नाहींशी करून ते पूर्ण परब्रह्मच झाले ४१ व परम समाधान पावले. त्यानीं उत्तम गद्य-पद्यांनीं युक्त असें माझें स्तवन व पूजन करण्यास आरंभ केला. ७४२.

तैः परमर्षिभिः सम्यक् पूजितः संस्तुतः च अहं–त्या परम ऋषींकडून यथाविधी पूजा केला गेलेला व स्तुति केला गेलेला मी, परमेष्ठिनः पश्यतः स्वकं धाम प्रत्येयाय–ब्रह्मदेव पहात असतांच निजधामाला परत आलों. ४२.

त्यांचा पूज्य-पूजकभाव जरी गेला होता तरी त्यांनीं गुरूंची पूजा केली. द्वैताचा भ्रम टाकून त्यांनीं अत्यंत प्रेमानें पूजेला आरंभ केला. ४३ शिष्य जरी ब्रह्मस्वरूप झाला तरी त्याला गुरु पूज्यच आहे. सद्गुरूच पूर्ण ब्रह्म आहे. ही खूण सनकादिकांना पटली होती. ४४ ज्याच्या उपदेशाबरोबर सर्वजण ब्रह्मस्वरूपच होऊन राहिले, त्या सद्गुरूच्या पवित्र पायांचें कोणत्या शब्दांनीं वर्णन करूं! ४५ ज्याच्या हातीं परब्रह्म आलें, त्यालाच सद्गुरूची पूज्यता कळणार! इतरांना ही गोष्ट काय समजणार! शब्दांनीं सांगितलें तरी तें केवळ अनुमानच! ४६ ते सनकादिक सर्वजण माझी यथासांग पूजा करून व वारंवार माझी स्तुति करून, वरचेवर माझ्या पायां पडूं लागले. ४७ माझ्या भजनांत ते एकरूप होऊन गेले. माझ्या भक्तींत रंगून गेले. तेव्हां मज पूर्णकामालाहि त्यांच्या पूजेनें अत्यंत संतोष वाटला. ४८ माझ्या उपदेशानें त्या ब्राह्मणांना अतिशय सुख झालें व त्यांनीं मला प्रदक्षिणा करून माझ्या पायांवर लोटांगण घातलें. ४९ त्यावेळीं ब्रह्मदेव हें सर्व पहात असतां व सनकादिक तेथें उभे असतां त्या सर्वांसमक्ष मी मोठ्या त्वरेनें निघून वैकुंठास आलों. ७५० हे उद्धवा! याप्रमाणें सनकादिक माझे शिष्य कसे झाले, तो अलौकिक इतिहास मीं तुला समग्र सांगितला. ५१ सनकादिक योग्यांमध्यें अतिशय श्रेष्ठ, भक्तांमध्यें अतिशय वरिष्ठ, ज्ञान्यांमध्यें अग्रगण्य असे निर्मल अंतःकरणाचे शिष्य आहेत. ५२ श्रीकृष्णानें उद्धवाला हंसगीतनिरूपणरूप जें प्राचीन ब्रह्मज्ञान, तें अत्यंत प्रसन्न होऊन दिलें. ५३ भागवतधर्मानें चालत असतां व एकादश स्कंध पहात असतां ही पुरातन ब्रह्मकथा एकनाथाच्या सहज हातीं आली. ५४ हंसमुखांतील

हंसमुखींचीं चिद्रत्नें । जीं सनकादिकां झालीं भूषणें । उद्धव अळंकारिला श्रीकृष्णें । तें शेष जनार्दनें मज दीधलें ॥ ५५ ॥ सनकादिक उद्धवाचें शेष । हातां आलें हा बोल वोस । ते गोष्टीसी झाले बहुदिवस । ह्मणाल वायस हा जल्पू ॥ ५६ ॥ कृतयुगीं शंखासुरासी । देवें मर्दिलें होतें त्यासी । ते ठायीं अद्यापि सभाग्यासी । अव्हाशंखासी पावती ॥ ५७ ॥ रामें पूर्वीं अयोध्येसी । केलें होते महायागासी । तेथें हविःशेष लोकांसीं । अद्याप हातासी येतसे ॥ ५८ ॥ तैसेंचि येथें भागवतीं । जनार्दन कृपापद्धतीं । सनकादिकांची शेषप्राप्ती । एकादशार्थीं आम्हां झाली ॥ ५९ ॥ मागेंपुढें अवघे एक । हा एकादशाचा विवेक । तेणें सनकादिक उद्धवशेख । आम्हांही देख प्राप्त झालें ॥ ७६० ॥ करूं नेदितां गयावर्जनीं । न रिघवे समर्थ जनीं । ते पदीं माशी लागुनी । निवारण कोणी करीना ॥ ६१ ॥ तेवीं नाना शास्त्रार्थ-युक्तींसी । शिणतां समर्थ साधकांसी । प्राप्ति नव्हे ज्ञानशेषासी । ते झाली आम्हांसी एकादशें ॥ ६२ ॥ हंस कृष्ण जनार्दन । स्वरूप एक नामें भिन्न । तेणें घालून बोधांजन । जुना ठेवा जाण दाखविला ॥ ६३ ॥ तेथ मी एका एकू देखतां । आणि तो एकू मातें दाखविता । हेही नुरेचि बोध्यबोधकता । पाहता पाहविता तोचि तो ॥ ६४ ॥ आरसा आलिया मुख दिसे । तो गेलिया तें न दिसे । परी येणें जाणें मुखासी नसे । तें सहजेंचि असे संचलें ॥ ६५ ॥ आरिशाचें मुख आरिसें नेलें । परी पाहातया नाहीं ऐसें झालें । जें कटकटा माझें मुख गेलें । तें असें संचलें तो जाणे ॥ ६६ ॥ तेवीं अज्ञानें न यावें । कां ज्ञान झालिया यावें । तैसें वस्तूसी न संभवे । तें असे स्वभावें संचलें ॥ ६७ ॥ तैसें देखतें आणि दाखवितें । दोनी जाऊनियां तेथें । माझें मीपण जें जुनें होतें । तें दावियलें मातें जनार्दनें ॥ ६८ ॥ जेवीं सूर्याचेनि प्रकाशें । सूर्यचि कीं सूर्यें दिसे । तेवीं माझेनि निजप्रकाशें । मज मीचि असें देखत

ज्या ज्ञानरत्नांनीं सनकादिकांना भूषविलें, श्रीकृष्णानें ज्यायोगें उद्धवाला अलंकृत केलें, त्यांतील उरलेला अंश जनार्दनस्वामींनीं मला दिला. ५५ सनकादिक व उद्धव यांच्या ज्ञानांतील वांटा मला मिळाला. हें बोलणें दांभिकपणाचें आहे. कारण त्या गोष्टीला किती तरी काळ लोटला. तेव्हां हें बोलणें व्यर्थ आहे, असें कदाचित् म्हणाल, तर ऐका. ५६ देवांनीं कृतयुगांत शंखासुराला मारिलें होतें; पण त्या ठिकाणीं अद्यापि भाग्यवानाला उजवे शंख सांपडतात. ५७ रामचंद्रानें त्रेतायुगांत अयोध्येंत अश्वमेधयज्ञ केला होता. पण त्या ठिकाणीं अद्यापिहि उरलेलीं यज्ञद्रव्यें लोकांच्या हातीं लागतात. ५८ त्याचप्रमाणें भागवतांतहि जनार्दनगुरूच्या कृपाप्रसादानें सनकादिकांच्या ज्ञानाचा अवशिष्ट भाग अकराव्या स्कंधांत आम्हांला मिळाला. ५९ मागें-पुढें सगळें एकच परब्रह्म भरलेलें आहे. याचाच अकराव्या स्कंधांत मुख्य विचार केला आहे. त्यामुळें सनकादिक व उद्धव यांच्या ज्ञानांतील भाग आम्हांलाहि मिळाला. ७६० गयावर्जनाचे वेळीं विष्णुपदाजवळ जाण्याची परवानगी असल्यावांचून मोठ्या समर्थालाहि तेथें जातां येत नाहीं. पण एखादी माशी खुशाल त्या पवित्र विष्णुपदावर जाऊन बसते. तिला कोणी मनाई करीत नाहीं. ६१ त्याचप्रमाणें अनेक शास्त्रार्थ-युक्तींनीं कितीहि परिश्रम केले तरी समर्थ साधकांनाहि ज्या ज्ञानांशाची प्राप्ति झाली नाहीं, तें ज्ञान आम्हांला अनायासें अकराव्या स्कंधांत प्राप्त झालें. ६२ हंस, कृष्ण, जनार्दन हीं नांवें तेवढीं भिन्न, पण त्यांचें स्वरूप एकच; त्यांनींच बोधरूपी अंजन डोळ्यांत घालून ही जुनी ठेव मला दाखवून दिली, हें लक्षांत ठेवा. ६३ तेव्हां मी एका म्ह० एकनाथ एकटाच पहाणारा व मला दाखविणारा एक तोच, हा बोध व बोधकताहि राहिली नाहीं. कारण पहाणारा व दाखविणाराहि तोच आहे. ६४ आरसा पुढें आला म्हणजे त्यांत मुख दिसतें व पुढून गेला कीं दिसेनासें होतें. परंतु वास्तविक मुखाला जाणें किंवा येणें कांहींच नाहीं. तें जागच्या जागींच असतें. ६५ आरशांतलें प्रतिबिंब आरशानें नेलें म्हणजे पहाणाराला तें दिसत नाहीं, इतकेंच; पण तेवढ्यावरून तो 'अरेरे, माझें मुख गेलें' असें म्हणत नाहीं. कारण तें जागेवरच आहे, हें त्याला ठाऊक असतें. ६६ त्याचप्रमाणें आत्मस्वरूप अज्ञानामुळें नाहींसें होणारें व ज्ञानामुळें प्राप्त होणारें नाहीं. तें स्वभावतः जागच्याजागींच असतें. ६७ त्याचप्रमाणें पहाणारें व दाखविणारें हीं दोन्हीं जाऊन माझा मूळचा जो मीपणा होता तोच जनार्दनस्वामींनीं दाखवून दिला. ६८ सूर्य सूर्यप्रकाशानें सूर्यामुळेंच जसा दिसतो, तसा मी माझ्याच

॥ ६९ ॥ ऐशियाही ठायीं जाण । कैंचें नवें जुनें ज्ञान । बहु काळ ठेविलें सुवर्ण । त्यासी ह्मणे कोण कुहजकु ॥ ७७० ॥ कालचाचि आजि उगवला । तो सूर्य काय म्हणावा शिळा । कीं आजिचा अग्नि सोंवळा । कालचा काय ओंवळा ह्मणों ये ॥ ७१ ॥ तेवीं सनकादिकांचें जें ज्ञान । तेंचि मराठीभाषेमाजीं जाण । येथें ठेवूं जातां दूषण । दोषी आपण होइजे ॥ ७२ ॥ कां सुवर्णाचें केलें सुणें । परी तें मोलें नव्हेचि उणें । तेवीं सनकादिकांचीं ज्ञानें । देशभाषा हीनें नव्हतीच ॥ ७३ ॥ जेवीं कां गुळाचें कारलें केलें । परी तें कडूपणा नाहीं आलें । तेवीं हंसगीत मराठें झालें । नाहीं पालटलें चिन्मात्र ॥ ७४ ॥ जें मोल मुकुटींच्या हेमासी । तेंचि मोल सुवर्णश्वानासी । जो का ग्राहिक सुवर्णासी । दोघे दोघांसी समत्वें ॥ ७५ ॥ तैसें आत्मानुभवी जे येथें । ते मानितील या ग्रंथातें । येर ते हेळसितील यातें । निजभावार्थें न घेती ॥ ७६ ॥ जे वंदिती कां निंदिती । ते दोघे आम्हां ब्रह्ममूर्ती । हे निजात्मभावाची प्रतीती । केली निश्चितीं जनार्दनें ॥ ७७ ॥ एका जनार्दना शरण । रिघतां विरालें एकपण । जेवीं कां समरसोनि लवण । स्वयें जाण समुद्र झालें ॥ ७८ ॥ तेथें एका आणि जनार्दन । एक झाले हें ह्मणे कोण । जेवीं डोळ्यांचें देखणेपण । डोळाचि आपण स्वयें जाणे ॥ ७९ ॥ डोळ्यांनीं आरिसा प्रकाशिजे । तेथें डोळेनि डोळा पाहिजे । तेवीं हें ज्ञान जाणिजे । देखणें देखिजे देखणेनी ॥ ७८० ॥ सांडोनियां एकपण । एका जनार्दना शरण । हेंचि हंसगीतनिरूपण । झालें परिपूर्ण पूर्णत्वें ॥ ७८१ ॥ इति श्रीभागवते महापुराणे एकादशस्कंधे एकाकारटीकायां श्रीकृष्णोद्धवसंवादे हंसगीतनिरूपणं नाम त्रयोदशोऽध्यायः ॥ १३ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

इति श्रीमद्भागवते महापुराणे एकादशस्कंधे श्रीकृष्णोद्धवसंवादे त्रयोदशोऽध्यायः ॥ १३ ॥

आत्मप्रकाशानें मला पहाण्यास समर्थ झालों. ६९ अशा स्थितींत ज्ञान जुनें आणि नवें कसें होणार ! पुष्कळ जुन्या काळांतील सोनें असलें म्हणून त्याला कोणी कुजलेलें म्हणेल का ! ७७० कालचाच सूर्य आज उगवला म्हणून त्याला काय शिळा म्हणावयाचें ! किंवा आजचा अग्नि जर सोंवळा तर कालचा काय ओंवळा होता ! ७१ त्याचप्रमाणें सनकादिकांचें ज्ञान मराठी भाषेंत सांगितलें म्हणून कोणी दूषण देऊं लागल्यास ते स्वतःच दोषी ठरतील. ७२ किंवा सोन्याचें कुत्रें जरी केलें तरी सोन्याची किंमत कांहीं कमी होत नाहीं, त्याचप्रमाणें सनकादिकांचें ज्ञान देशी भाषेंत आल्यानें हीन होत नाहीं. ७३ किंवा गुळाचें कारलें बनविलें तर त्याला कांहीं कारल्याचा कडुपणा येत नाहीं त्याप्रमाणें हंसगीत जरी मराठींत आणिलें तरी त्यांतील ज्ञान कांहीं पालटत नाहीं. ७४ मुकुटाच्या सोन्याचें जें मोल असतें, तेंच मोल कुत्र्याच्या सोन्यालाहि पडतें. ज्याला सोनेंच खरेदी करावयाचें त्याला दोहोंची किंमत सारखीच. ७५ त्याचप्रमाणें जे आत्मानुभवी असतील, ते या ग्रंथास मान्य करतील व इतर त्याची हेटाळणी करतील आणि आदरानें याचें ग्रहण करणार नाहींत. ७६ पण आम्हांला वंदन करणारे व निंदा करणारे दोघेहि ब्रह्मस्वरूपच आहेत. ही आत्मज्ञानाची प्रतीति जनार्दनस्वामींनीं दृढ केली आहे. ७७ ज्याप्रमाणें मीठ समुद्रांत एकरूप होतें, त्याप्रमाणें एकनाथ जनार्दनाला शरण रिघतांच त्याचा एकपणाहि नाहींसा झाला. ७८ तेथें एकनाथ व जनार्दन हे एकरूप झालें असें म्हणणारें तरी कोण राहिलें ! ज्याप्रमाणें डोळ्याची पहाण्याची शक्ति डोळ्यालाच कळत असते, ७९ डोळ्यांनीं आरसा पाहिला म्हणजे डोळ्यांनाच डोळा जसा दिसूं लागतो त्याप्रमाणें हें ज्ञान आहे, असें जाण. ज्ञानाला ज्ञानानेंच पहावें. ७८० एकनाथ आपलें एकत्व सोडून देऊन जनार्दनाला शरण गेल्यामुळें हें हंसगीतनिरूपण संपूर्ण झालें. ७८१.

इति श्रीमद्भागवतपुराणांतील एकादशस्कंधाचा परमहंससंहितेमधला श्रीधर-एकनाथविरचित टीकानुसार विष्णुशर्मकृत सान्वयार्थ-भावार्थासह श्रीकृष्ण-उद्धव-संवादांतील हंसगीतनिरूपण नांवाचा तेरावा अध्याय समाप्त झाला.